सहकार भारतीचे
मुखपत्र

बिना संस्कार नहीं सहकार, बिना सहकार नहीं उद्धार

# सहकार सुगंध

ISBN
978-81-940842-0-4

• संपादक : भालचंद्र कुलकर्णी

• पुणे • वर्ष : २० • अंक ०९ • डिसेंबर २०२४ • पृष्ठे ४४ • किंमत : रु. ३०/-

## जागतिक सहकार परिषदेचे नवी दिल्लीत यशस्वी आयोजन






### सहकार क्षेत्राच्या बळकटीसाठी नव्याने आर्थिक संरचनेच्या उभारणीची गरज - पंतप्रधान नरेंद्र मोदी



सहकार भारती आयोजित सहकार संवाद उपक्रम



कॉसमॉस बँकेचा कर्जाबाबतचा उपक्रम अभिनंदनीय - राज्यपाल

चलो अमृतसर!! चलो अमृतसर!!!



## सहकार भारती

८ वे राष्ट्रीय अधिवेशन ६, ७, ८ डिसेंबर २०२४



दि धरमपेठ महिला
मल्टी स्टेट को-ऑप. सोसायटी लि., नागपूर. (महाराष्ट्र, छत्तिसगढ व मध्यप्रदेश)
आपला परिवार, आपली संस्था !
सीताराम भवन
ऑडिटोरियम आणि गेस्ट हाऊस
वाढदिवस | मुंज | लग्न | साक्षगंध
सांस्कृतिक कार्यक्रम | कॉन्फरन्स
BANKING P.O
90 DAYS TRAINING
BANKING POINT PROGRAMME P.O.
A Bridge of Banking Career
100% Placement Guarantee*
Join The Dharampeth Mahila Society
Probationary Officer Programme P.O.
Enroll Now & Grab The Opportunity
Contact : 7888002023
Authorised
RAIL TICKET RESERVATION CENTRE
फ्लाईट
क्रूज
हॉटेल
बस
ONLINE BOOKING FACILITY AVAILABLE AT ALL BRANCHES
Contact : 7020218417
सर्व आर्थिक समाधानांसाठी एकच संस्था
LOCKERS सुविधा
NEFT, RTGS सुविधा उपलब्ध
GOLD LOAN उपलब्ध
MSEDCL विज बिल भरणा केंद्र
SMS अर्लट
MOBILE बँकिंग
CORE बँकिंग
LOAN सेवा सुविधा
DEPOSIT सुविधा
₹ 2200 कोटींच्या वर व्यवसाय
LIC पॉलिसी काढण्याची व प्रीमियम भरण्याची सुविधा
GIC पॉलिसी काढण्याची व नुतनीकरणाची सुविधा
मुख्य कार्यालय
प्लॉट नं. ४२-अ,
सीताराम भवन,
राम नगर चौक, शिवाजी नगर,
नागपूर-१०
फोन
0712-2524337 / 2520303
ई-मेल : info@dpmahila.com
संस्थेच्या शाखा
नागपूर विभाग:
• धरमपेठ 0712-2520555
• महाल 0712-2735653
• खामला 0712-2283704
• सदर 0712-2555525
• धंतोली 0712-2424918
• नंदनवन 0712-2744050
• मानेवाडा 0712-2704057
• त्रिमूर्ती नगर 0712-2243601
• मनीष नगर 0712-2782126
• हुडकेश्वर 0712-2754311
• मानकापूर 0712-2302309
• नरेंद्रनगर 0712-2782781
• बजाज नगर 0712-2241112
• शिवाजी नगर 0712-2220716
• उमरेड 07916-243275
• हिंगणा रोड 9763742291
पुणे विभाग:
• सदाशिव पेठ 020-24321933
• सिंहगड रोड 020-24347624
• कर्वे नगर 020-25439008
• कोथरुड 020-25394449
• सहकार नगर 020-24211009
• वडगांव (खुर्द) 7264068734
मध्यप्रदेश: • इंदौर 0731-2436200
विदर्भ:
• चंद्रपूर 07172-276705
• भंडारा 07184-250838
• वर्धा 07152-250002
• अमरावती 0721-2563704
• गोंदिया 07182-234199
• यवतमाळ 07232-244314
• वणी 07239-228058



कार्यक्षेत्र : महाराष्ट्र,मध्यप्रदेश
राजर्षी शाहू
राजर्षी शाहू मल्टिस्टेट को. ऑप. क्रेडिट सोसायटी लि. बुलडाणा
राजर्षी शाहू
र.नं. ८९९
कॅश काढणे व जमा करतांना विड्रॉल किंवा जमा स्लीप न भरता पेपरलेस सुविधा देणारी संस्था...!
तुमच्या धाडसाला आमची अर्थपूर्ण साथ
Shahu Pay
Payments App
Google Play
करा नविन सुरवात
विविध लोन स्कीम्स, ठेव योजना
इंटरनेट बँकिंग
डोअर स्टेप बँकिंग
मोबाईल बँकिंग
शाहू पे
RTGS
NEFT
ठेवींचे आकर्षक व्याजदर
RTGS
NEFT
सोने तारण कर्ज फक्त
10%
व्याजदरामध्ये उपलब्ध
संदीप शेळके
अध्यक्ष, राजर्षी शाहू परिवार
संस्थेची वैशिष्ट्ये
१. एकुण ६९ शाखेचा विस्तार
२. ८०० कोटींचा व्यवसाय
३. १००००० सभासद संख्या
४. 'शाहू पे' हे पेमेंट ॲप विकसित करणारी भारतातील पहिली पतसंस्था
५. महिला बचत गटाच्या माध्यमातून ३५ हजार महिलांना १२५ कोटी रू. चे कर्ज वाटप
MAHAVITARAN
MSEB
वीज बिल भरणा केंद्र
Shahu Pay
खातेदारांना पेपरलेस् सुविधा देणारी
राजर्षी शाहू एकमेव पतसंस्था
Missed Call
Balance check सुविधा
7877778870
WhatsApp Banking
ISO ९००१:२०१५ मान्यता प्राप्त संस्था
बँको पुरस्कार प्राप्त संस्था
सतत दोन वर्षापासून FCBA पुरस्कार प्राप्त संस्था
सतत दोन वर्षापासून मल्टीस्टेट फेडरेशनचा "सहकार गौरव" पुरस्कार प्राप्त संस्था
सौ. मालती शेळके
अध्यक्षा, राजर्षी शाहू मल्टीस्टेट को. ऑप क्रेडीट सोसा. लि बुलडाणा
www.rajarshishahumultistate.com
+९१ - ९५२८४१०४१०

# प्रशिक ग्रामीण सहकारी
## पतसंस्था मर्या., कारंजा (लाड)

र.नं.७६०, पुंजानी कॉम्प्लेक्स, मेन रोड, कारंजा लाड, जि. वाशिम. फोन : ०७२५६ -२२४९८३

संस्थेचे सामाजिक कार्य-कोविड-१९ मध्ये
पोलिस दलाचा भेटवस्तू देऊन सत्कार,
गोरगरीब झोपडपट्टीतील लोकांना
धान्य वाटप मुख्यमंत्री निधी- आर्थिक सहाय्य

आपणा सर्वांची आस्था
प्रशिक ग्रामीण सहकारी
पतसंस्था



### आपले स्वप्न पूर्ण करण्यासाठी स्वप्नपूर्ती कर्ज योजना

- लखपती कर्ज योजना
- ठेव तारण कर्ज
- घर दुरूस्ती कर्ज
- दीर्घ मुदती कर्ज
- वाहन कर्ज
- सोने तारण कर्ज
- अल्प मुदती कर्ज
- कॅश क्रेडीट
- सभासदांसाठी मालतारण कर्ज योजना

### सन २०२३-२४ संस्थेची स्थिती

| | | |
|---|---|---|
| सभासद | : | २६४१ |
| भागभांडवल | : | १,४०,४८,०१७ |
| ठेवी | : | ५०,१६,६२,३४८ |
| निधी | : | ३,३१,०७,६२७ |
| कर्ज | : | ४०,६८,९८,६५७ |
| गुंतवणूक | : | २०,८७,७३,६२४ |
| नफा | : | २,३५,७१,९०१ |
| ऑडीट | : | 'अ' |
| एन.पी.ए. | : | 0% |

### ठेवीवरील व्याजदर

| | | | |
|---|---|---|---|
| ४५ ते ९० दिवस | ७.००% | १ वर्षापेक्षा जास्त २ वर्षापर्यंत | ९.००% |
| १८० ते ३६५ दिवस | ८.००% | ३ वर्षांच्या वर ६६ महिन्यांपर्यंत | १०.००% |
| २ वर्षापेक्षा जास्त ३ वर्षापर्यंत | ९.५०% | मासिक ठेवीवर (ठऊ) | ९.००% |
| ९१ ते १७९ दिवस | ७.५०% | बचत ठेवीवर व्याज | ४.००% |

### सहकार्यातून विकासाकडे

- संगणीकृत शाखा
- इलेक्ट्रीक भरणा स्वीकृती केंद्र
- ATM सुविधा, QR कोड सुविधा
- RTGS, NEFT, SMS सुविधा
- ८७ महिन्यात दामदुप्पट
- १२३ महिन्यात दामतिप्पट
- ज्येष्ठ नागरिकांसाठी १% जास्त व्याजदर
- संस्थेचे स्वत:चे मालतारण गोडावून

**लवकरच प्रशिक फार्मर कंपनी आपल्या सेवेत रुजू**

### संचालक गण

ॲड. रवि काशिनाथ रामटेके — अध्यक्ष
आकाश भा. कन्हे — उपाध्यक्ष
अनिल दौ. आहुजा — मा. सचिव
पांडूरंग मो. भगत — संचालक
कृष्णा वि. राऊत — संचालक
गुलाबराव चं. साटोटे — संचालक
अशिष मा. बंड — संचालक
भास्कर द. ढोले — संचालक
मेघन म. जुमळे — संचालक
सौ. सुनिता दि. उके — संचालिका
सौ. छाया ग. गांवडे — संचालिका
सौ. आशा कृ. राऊत — व्यवस्थापक
श्री. दिपक द. ढोले — वरिष्ठ लिपीक




## QR PAYMENT SOLUTION WITH SOUND BOX

| Powerful Speaker Clear Audio | Long-lasting 10 day Battery | 4G Network Connectivity |
|---|---|---|

विविध अर्थसंस्थेसाठी विशेष ऑनलाईन / आधुनिक तंत्रज्ञानाची प्रणाली

- पतसंस्था
- को-ऑप. सोसायटी
- निधी कंपनी
- को-ऑप. बँक
- मल्टीस्टेट
- क्रेडिट को-ऑप. सोसायटी

अधिक महितीसाठी संपर्क करा

| श्री. अतुल वाकोडे | श्री. प्रविण भंडारकर | श्री. विशाल पद्मावर | हेल्पलाईन |
|---|---|---|---|
| 9552823088 | 7972680755 | 9604026006 | 9552823088 |

मुख्य कार्यालय : ए-३०३, स्वागत इन्क्लेव्ह हाऊसिंग सोसायटी, जांभुळवाडी रोड, आंबेगाव खुर्द, हवेली, पुणे. (महाराष्ट्र) ४११०४६

ऑनलाईन डेमोसाठी 96 0402 6006 | Email : info@advitacredit.in | www.advitacredit.in

कार्यक्षेत्र : • महाराष्ट्र • गोवा • मध्यप्रदेश • गुजरात • छत्तीसगड • राजस्थान • उत्तरप्रदेश • हरियाणा • कर्नाटक • तेलंगना


netwin
Ideas to Life
एकमेव उद्देश... ग्रामीण बँकिंगला भारताच्या अर्थव्यवस्थेत समाविष्ट करणे.
₹ १६.६७ कोटी
प्रति महिना IMPS व्यवहार
₹ २५० कोटी
प्रति महिना उलाढाल
३ लाख
व्यापारी डिजिटल व्यवहाराचे भागीदार
९,०७,१६८
सरासरी मासिक UPI व्यवहार
NetPay-UPI QR Code
Certification's
अधिक माहिती साठी संपर्क करा
०२५३ ६६५ १५००
sales@netwinindia.in
www.netwin.in

50 YEARS OF MOMENTUM

अर्थ सहकारेण कल्याणम्

THE KALYAN JANATA SAHAKARI BANK LTD.

MULTI-STATE SCHEDULED BANK

# Great Ventures Starts With Small Beginnings

Attractive RoI

Hassle Free Loan Processing

## BUSINESS LOAN



TOLL FREE: 1800 233 1919 kalyanjanata.in KJSBank

VISUAL

3000+ SATISFIED CLIENTS

# व्हिज्युअल इन्फोसिस्टीम्स प्रा.लि.

A Core Banking Software Solutions

छत्रपती संभाजीनगर



संपूर्ण महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेर अग्रेसर असलेले
सर्वाधिक पसंतीचे कोअर बँकिंग सॉफ्टवेअर

* ऑडीटसाठी लागणारे सर्व रिपोर्ट उपलब्ध
* डोअर स्टेप बँकिंग मोबाईल ॲप
* क्रेडिट स्कोअर रिपोर्ट * क्यू. आर. कोड कलेक्शन
* आधार/पॅन पडताळणी * इंटरनेट बँकींग
* ऑनलाईन मोबाईल बँकींग
* मॅनेजमेंट मोबाईल ॲप
* मोबाईल ॲप फॉर बँक स्टाफ
* कस्टमर ॲप
* रिकव्हरी ॲप

**CERTIFICATIONS:**
VAPT & CERT In Certification for Web and Android App Certified by TUV-SUD ISO 9001:2015 ISO/IEC 27001:2013

आजच आपल्या बँक, पतसंस्था, मल्टीस्टेट, कर्मचारी सोसायटी, एन बी एफ सी (NBFC) मध्ये कोअर बँकिंग सॉफ्टवेअर सुरु करा.

Contact Us

कॉर्पोरेट ऑफिस :
व्हिज्युअल इन्फोसिस्टीम्स प्रा.लि.
अ-२४-४, चिखलठाणा औद्योगिक क्षेत्र,
छत्रपती संभाजीनगर - ४३१००६

हेड ऑफिस :
व्हिज्युअल इन्फोसिस्टीम्स प्रा.लि.
थर्ड फ्लोर, मालन प्लाझा,
दुर्गा माता मंदिरा जवळ, आकाशवाणी रोड,
छत्रपती संभाजीनगर - 431005

+91 9423000202 +91 9209000096
+91 9763878000 +91 8080342437
+91 8080762776 +91 9763873000
+91 9545002127 +91 9730070680

Email : info@visualinfosystems.in
website : www.visualinfosystems.com

|| बिना संस्कार नहीं सहकार । बिना सहकार नहीं उद्धार ||

# सहकार सुगंध

ISBN : 978-81-940842-0-4

# अनुक्रम


* सहकार क्षेत्राच्या बळकटीसाठी नव्याने आर्थिक संरचनेच्या उभारणीची गरज – पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची अपेक्षा ........ ११
* सहकार क्षेत्रातील ग्राहक टिकला तर सहकारी संस्था तग धरू शकतील – निमकर १३
* सहकार चळवळीत युवकांचा सहभाग वाढावा– मराठे यांची अपेक्षा........ १४
* सहकार कायदा हा व्यक्तिसापेक्ष असू नये – विद्याधर अनास्कर........ १५
* सहकाराचे स्वरूप आणि कार्यपद्धतीबाबत चिंतन आवश्यक ........ १६
* कार्यकर्ता, कार्यालय आणि आधुनिक व्यवस्थापन ........ १९
* भारताच्या अर्थव्यवस्थेत सहकारी बँकांची भूमिका........ २२
* वेगवेगळ्या धान्यापासून इथेनॉल तयार करण्याची प्रक्रिया गतिमान – गडकरी..... २३
* रायगड जिल्हा 'सहकार भारती'ची कार्यकारिणी जाहीर – अध्यक्षपदी प्रा. मेघराज जाधव .. २४
* कॉसमॉस बँकेचा कर्जाबाबतचा उपक्रम अभिनंदनीय – राज्यपाल........ २५
* पूर्णवादी बँक अध्यक्ष डॉ. सुभाष जोशी यांची काळेवाडी शाखेस सदिच्छा भेट.... २६
* गार्निशी ऑर्डर आणि आयकर / विक्रीकर खात्याची टाच........ २७
* सहकारी बँकेच्या कामकाजात प्रशिक्षणाचे महत्त्व........ ३०
* 'एकविसावे शतक भारताचे' ........ ३१
* गृहरचना संस्था : शंका समाधान ........ ३५


## जानेवारी २०२५ पासून 'मॅगझीन पोस्ट' द्वारा वितरण

सहकार सुगंधचा अंक न मिळण्याच्या तक्रारी असल्याने पोस्ट खात्याच्या नवीन मॅगझीन पोस्ट यंत्रणेद्वारे वर्गणीदारांना १००% अंक मिळण्याची खात्री यापुढे राहणार आहे. या मॅगझीन पोस्टचा खर्च अधिक असल्यामुळे नाईलाजाने वर्गणीचे दर वाढवावे लागत आहेत. तरी कृपया वर्गणीदार, वाचक, जाहिरातदार यांनी आवश्यक सहकार्य करून नवीन दराप्रमाणे नोंदणी करावी, ही विनंती. – संपादक


'सहकार सुगंध' हे मासिक मालक, सहकार प्रिंटिंग अँड पब्लिकेशन्स प्रा. लि. यांचेसाठी मुद्रक व प्रकाशक भालचंद्र कुलकर्णी यांनी एन. आर. एंटरप्रायजेस, स.नं. ३९, माणिकबाग इंडस्ट्रियल इस्टेट, सिंहगड रोड, पुणे – ४११ ०५१ येथे छापून ए-१२, निखिल पार्क सी सोसायटी, माणिकबाग, सिंहगड रोड, पुणे – ४११ ०५१ येथे प्रसिद्ध केले.

**संपादक –** भालचंद्र कुलकर्णी

'Sahakar Sugandha' monthly is owned by 'Sahakar Printing & Publications Pvt. Ltd., printed & published by Bhalchandra Kulkarni, Printed at N. R. Enterprises, S.No. 39, Manikbaug Industrial Estate, Sinhgad Road, Pune - 411051 & published at A-12, Nikhil Park, 'C' Society, Manikbaug, Sinhgad Road, Pune - 411051.
Editor : Bhalchandra Kulkarni



**डिसेंबर २०२४ (वर्ष २०, अंक ०९)**

**संपादक :**
भालचंद्र कुलकर्णी (मोबाईल : ९८२२८८२५०९)

**सहसंपादक :**
विनायक कुलकर्णी (मोबाईल : ९४२२३२१६२६)



**सहकार प्रिंटिंग अँड पब्लिकेशन्स प्रा. लि.**
**संचालक मंडळ :**
डॉ. उदय जोशी (संचालक, राष्ट्रीय महामंत्री)
सीए सतीश मेढी (संचालक, राष्ट्रीय कोषाध्यक्ष)
श्री. विनय खटावकर (संचालक)
श्री. भालचंद्र कुलकर्णी (व्यवस्थापकीय संचालक)

**मार्गदर्शक : सहकार भारती पदाधिकारी**
श्री. दीनानाथ ठाकूर (राष्ट्रीय अध्यक्ष)
श्री. रमेश वैद्य (संरक्षक)
श्री. संजयजी पाचपोर (राष्ट्रीय संघटनमंत्री)
श्री. दत्ताराम चाळके (महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष)
श्री. विवेक जुगादे (महाराष्ट्र प्रदेश महामंत्री)
श्री. शरद जाधव (महाराष्ट्र प्रदेश संघटनमंत्री)
डॉ. मुकुंद तापकीर, श्री. सतीशजी मराठे,
श्री. ज्योतिंद्रभाई मेहता, श्री. विष्णूजी बोबडे,
श्री. संजय परमणे

**जाहिरात व वर्गणीदार विभाग समन्वयक :**
सौ. अंजली लागू, श्रीमती पौर्णिमा राईलकर

**मुखपृष्ठ मांडणी, अक्षरजुळणी व डिझाइन :**
सौ. अर्चना गाढवे


**दि. १ जानेवारी २०२५ पासून वर्गणीचे नवीन दर**
**वार्षिक वर्गणी :** रु. ७००/– फक्त
**त्रैवार्षिक वर्गणी :** रु. १८००/– फक्त
**खालील QR कोड स्कॅन करून ऑनलाइन पेमेंट करावे.**

**कृपया चेक / डीडी 'सहकार प्रिंटिंग अँड पब्लिकेशन्स प्रा. लि.' या नावाने पाठवावा. (पुणे येथे देय असलेला)**


**सहकार सुगंध कार्यालय :**
ऑफिस नं. १५, विष्णू प्रिया अपार्टमेंट, ५ वा मजला, ईशान रेस्टॉरंटच्यावर, गणेशमळा, सिंहगड रोड, पुणे – ४११०३०. मो. : ८८०५९८१६७३
ईमेल : sahakar.sugandha@gmail.com

# अमृतसर राष्ट्रीय अधिवेशनाच्या निमित्ताने...

सहकार भारतीचे राष्ट्रीय अधिवेशन येत्या ६-७-८ डिसेंबरला अमृतसर (पंजाब) येथे संपन्न होत आहे. त्या पार्श्वभूमीवर आताचा सहकार सुगंधचा अंकामध्ये राज्यात येत असलेले फडणवीस सरकार आणि केंद्रातील सहकार मंत्रालयाची वाढती कृतीशीलता याचा आढावा घेणे आवश्यक आहे.

नुकत्याच राज्यात झालेल्या विधानसभा निवडणुकीत महायुतीला भरघोस यश मिळाले आहे. भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी पक्षांचे सरकार सत्तेत येत आहे. भाजपचे देवेंद्रजी फडणवीस पुन्हा एकदा मुख्यमंत्री म्हणून सरकार उत्तमपणे चालवतील यात शंका नाही. सहकार, पणन, दुग्ध, साखर, पशुपालन, मत्स्य, गृहनिर्माण आणि कृषी या ८ मंत्रालयांचा थेट संबंध संपूर्ण सहकार चळवळीशी येतो. त्यामुळेच एका अर्थाने सरकार आणि सहकार यांचे जवळचे नाते आहे. सरकार ज्याप्रमाणे धोरणे आखेल, कृती करेल त्यावरच सहकार चळवळीचे भविष्य अवलंबून आहे. सहकारातील सर्वच घटकांना सामावून घेणारे आणि सर्वसामान्यांना सहकार क्षेत्राच्या सर्व सुविधा उपलब्ध करून देणारे कृतीशील सरकार असण्याची गरज आहे. सहकार चळवळीसाठी अधिकाधिक योजना, अधिकाधिक लाभ मिळावेत, या दृष्टीने देवेंद्र फडणवीस सरकार काम करेल असा विश्वास वाटतो.

केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारने स्वतंत्र सहकार मंत्रालयाच्या माध्यमातून सहकार चळवळीशी असलेले घट्ट नाते अधिकच वृद्धींगत केले आहे. अमितभाई शहांच्या नेतृत्वाखाली सहकार मंत्रालयाने अनेकविध नवनवीन योजना आणि सुविधा सुरू केल्या आहेत. नुकत्याच झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीनंतर सहकार राज्यमंत्री पदावर महाराष्ट्रातील पुण्याचे खासदार मुरलीधरजी मोहोळ यांची निवड झाली आहे. अमितभाई शहांच्या खांद्याला खांदा लावून मुरलीधरजी काम करीत आहेत. सहकार चळवळीशी या दोन्ही नेत्यांचे जवळचे नाते आहे. सहकाराच्या माध्यमातून भारताचा विकास जलद गतीने होऊ शकतो आणि सर्वसामान्यांची समृद्धी त्यातून निश्चितपणे होऊ शकते, या भावनेतूनच सहकार क्षेत्र आता अधिक गतिमान होऊ लागले आहे.

सहकार भारतीने गेल्या ४७ वर्षांत नेहमीच केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांच्यात समन्वय साधण्याचा प्रयत्न केला आहे. सहकार क्षेत्राचे सरकार दरबारी असलेले प्रश्न सोडवण्याबरोबरच सहकारात चांगली व्यवस्था निर्माण व्हावी, यासाठी अखिल भारतीय स्तरावरील हे संघटन आज प्रभावीपणे काम करीत आहे. आज संपूर्ण देशातील ६०० जिल्ह्यांपर्यंत सहकार भारती पोहोचली आहे. सर्वच राज्यांमध्ये सहकार भारतीचे कार्यकर्ते अविरत काम करीत आहेत. देशभरात चालणाऱ्या या कार्याची दर तीन वर्षांनी अधिवेशनाच्या रुपाने आढावा घेण्याची पद्धत आहे. २०२१ मध्ये लखनौ (उत्तरप्रदेश) येथे राष्ट्रीय अधिवेशन संपन्न झाले होते, या वर्षीचे अधिवेशन अमृतसर (पंजाब) येथे ६-७-८ डिसेंबर रोजी संपन्न होत आहे. या अधिवेशनात श्रद्धेय लक्ष्मणराव इनामदार स्मृती पुरस्कारदेखील प्रदान करण्यात येतो. त्याचबरोबर या वर्षीपासून सहकार भारतीचे संस्थापक अध्यक्ष ॲड. अण्णासाहेब गोडबोले यांच्या नावानेदेखील स्मृती पुरस्काराची योजना सुरू करण्यात येत आहे. या अधिवेशनाचा सचित्र वृत्तांत पुढील जानेवारीच्या अंकात सर्व वाचकांना वाचायला मिळेलच. सहकार चळवळीच्या या कार्यात आपण सर्वजण सहभागी व्हावे असे आवाहन आहे.

जय सहकार !!



## संपादकीय...

# सहकार क्षेत्राच्या बळकटीसाठी नव्याने आर्थिक संरचनेच्या उभारणीची गरज - पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची अपेक्षा

**नवी दिल्ली –** सहकार क्षेत्राला भक्कम पाठबळ देण्यासाठी आंतर राष्ट्रीय स्तरावर नवीन आणि व्यापक स्वरुपाच्या आर्थिक संरचनेची उभारणी करण्याची गरज आहे. आपल्या देशाच्या संस्कृतीमध्ये सहकार रूजला आहे असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी येथे सांगितले. पंतप्रधान मोदी यांनी आयसीए ग्लोबल कोऑपरेटिव्ह कॉन्फरन्स २०२४ चे उद्घाटन केले. त्याप्रसंगी ते बोलत होते.

पंतप्रधान मोदी यांनी सांगितले की, जागतिक सहकार्याला सहकारी संस्था नवी ऊर्जा देऊ शकतात, असा भारताला विश्वास आहे. विशेषत: दक्षिणी जगातील देशांचा विकास घडविण्यात सहकारी संस्था मोठ्या प्रमाणावर हातभार लावू शकतात. सहकार क्षेत्रातील यंत्रणा अधिक लवचिक बनवून तिला चक्रीय अर्थव्यवस्थेशी जोडणे महत्त्वाचे आहे. तसेच सहकारावर आधारलेल्या स्टार्टपला प्रोत्साहन द्यायला हवे. उर्वरित जगासाठी सहकार हे आदर्श असे प्रारूप आहे. मात्र भारतीय संस्कृतीमध्ये सहकार हे मूलभूत मूल्यांपैकी एक आहे. भारतीयांसाठी ही जीवनपद्धतीच आहे. जागतिक स्तरावर भारतीय सहकारी संस्था कार्यरत आहेत. देशातील सुमारे ९८ टक्के ग्रामीण भाग सहकार क्षेत्राशी निगडित आहे. सहकार क्षेत्राचे यश हे संख्यात्मक वाढीपेक्षा मूल्यात्मक गुणवत्तेवर अधिक प्रमाणात अवलंबून असते. तसेच सहकार क्षेत्रात काम करताना परस्परांचा सन्मान करणे आवश्यक आहे, असे ते म्हणाले.

**✻ ८ लाखांपेक्षा अधिक सहकारी संस्था कार्यरत –**

हे स्वागत केवळ त्यांच्या एकट्याकडून नव्हे तर हजारो शेतकरी, पशुपालक, मच्छीमार, ८ लाखांहून अधिक सहकारी संस्था, बचत गटांशी संबंधित १० कोटी महिला आणि सहकारात तंत्रज्ञानाचा समावेश करण्यात गुंतलेल्या युवा वर्गाकडून केले जात आहे. भारतात सहकार चळवळीचा विस्तार होत असताना आंतरराष्ट्रीय सहकारी आघाडीची जागतिक सहकारी परिषद भारतात पहिल्यांदाच आयोजित करण्यात आली आहे, असे त्यांनी नमूद केले.

जागतिक सहकार चळवळीला एक नवीन भावना आणि भारताच्या सहकार क्षेत्रातल्या समृद्ध अनुभवातून २१व्या शतकातील आधुनिक साधने प्राप्त होतील. सन २०२५ हे वर्ष आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष म्हणून जाहीर केल्याबद्दल त्यांनी संयुक्त राष्ट्रांचे आभार मानले.

भारताच्या स्वातंत्र्य लढ्यालाही सहकारी चळवळीकडून प्रेरणा मिळाली होती, असे नमूद करून ते म्हणाले की, सहकाराने केवळ आर्थिक सक्षमीकरणच केले नाही तर स्वातंत्र्य सैनिकांना सामाजिक व्यासपीठही दिले. महात्मा गांधीजींच्या ग्राम स्वराज चळवळीने समाजाच्या सहभागाला नवी चालना दिली आणि खादी




आणि ग्रामोद्योगाच्या सहकारी संस्थांच्या मदतीने नवीन क्रांती सुरू केली. सहकाराने खादी आणि ग्रामोद्योगाला मोठमोठ्या ब्रँड्सबरोबरच्या स्पर्धेत पुढे जाण्यासाठी मदत केली. दूध क्षेत्रातील

**आयसीए जागतिक सहकार परिषद नुकतीच नवी दिल्ली येथे यशस्वीरित्या पार पडली. या परिषदेचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात आले. परिषदेचे सचित्र वृत्त...**

सहकाराचा वापर करत सरदार पटेल यांनी शेतकऱ्यांना एकजूट केले आणि भारताच्या स्वातंत्र्य चळवळीला एक नवी दिशा दिली. भारताच्या स्वातंत्र्य संग्रामादरम्यान उदयाला आलेले 'अमूल' हे उत्पादन आज जगातील आघाडीच्या फूड ब्रँड्सपैकी एक बनले असल्याकडे त्यांनी लक्ष वेधले. भारतातील सहकाराचा प्रवास संकल्पनेकडून चळवळीकडे, चळवळीकडून क्रांतीकडे आणि क्रांतीकडून सक्षमीकरणाकडे प्रवास झाला आहे. सरकार आणि सहकार यांची ताकद एकत्र करून भारताला विकसित देश बनवण्याच्या दिशेने काम करत आहोत. जगातील प्रत्येक चौथी सोसायटी भारतात आहे आणि त्यांची श्रेणी त्यांच्या संख्येइतकीच वैविध्यपूर्ण आणि विस्तृत आहे असेही त्यांनी नमूद केले.

सहकारी संस्थांनी ग्रामीण भारताचा जवळपास ९८ टक्के भाग व्यापला आहे. सुमारे ३० कोटी (तीनशे दशलक्ष) लोक, म्हणजे प्रत्येक पाच भारतीयांपैकी एक सहकारी क्षेत्राशी संबंधित आहे. भारतात नागरी आणि गृहनिर्माण सहकारी संस्थांचा मोठ्या प्रमाणावर विस्तार झाला आहे. साखर, खते, मत्स्यपालन आणि दूध उत्पादन उद्योगांमध्ये सहकारी संस्थांची मोठी भूमिका आहे असे सांगून ते म्हणाले की सुमारे २ लाख गृहनिर्माण सहकारी संस्था आहेत.

**✻ सहकारी बँकिंग क्षेत्राला बळकटी –**

भारताच्या सहकारी बँकिंग क्षेत्राला बळकटी देण्याच्या दिशेने केलेली महत्त्वपूर्ण प्रगती अधोरेखित करताना ते म्हणाले की, देशभरातील सहकारी बँकांमध्ये आता १२ लाख कोटी रुपयांहून अधिक रक्कम जमा असून हे या संस्थांवरील वाढत्या विश्वासाचे प्रतिबिंब आहे. सरकारने सहकारी बँकिंग प्रणाली मजबूत करण्यासाठी अनेक सुधारणा लागू केल्या आहेत, ज्यामध्ये त्यांना रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या कक्षेत आणणे आणि ठेव विमा संरक्षण प्रति ठेवीदार ५ लाख पर्यंत वाढवणे समाविष्ट आहे. या सुधारणांमुळे भारतीय सहकारी बँका अधिक सुरक्षित आणि कार्यक्षम वित्तीय संस्था म्हणून नावारूपाला येण्यात मदत झाली आहे, असे सांगून मोदी यांनी अधिक स्पर्धात्मकता आणि पारदर्शकता विस्तारल्याचे नमूद केले.

**✻ सहकारी संस्थांची भूमिका महत्त्वपूर्ण –**

भारताला भविष्यातील वाढीमध्ये सहकारी संस्थांची मोठी भूमिका दिसते. म्हणूनच मागील काही वर्षांत, सरकारने अनेक सुधारणांद्वारे सहकारी संस्थांशी संबंधित संपूर्ण परिसंस्थेमध्ये परिवर्तन घडवून आणण्याचे काम केले आहे. सहकारी संस्था बहुउद्देशीय बनविण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून केंद्र सरकारने स्वतंत्र सहकार मंत्रालयाची निर्मिती केली. सहकारी संस्था बहुउद्देशीय बनवण्यासाठी नवीन आदर्श उपविधी तयार करण्यात आल्या आहेत. सरकारने सहकारी संस्थांना आयटी-सक्षम परिसंस्थेशी जोडले आहे जिथे सहकारी संस्था जिल्हा आणि राज्य स्तरावर सहकारी बँकिंग संस्थांशी जोडल्या जातात. या सहकारी संस्था अनेक कामांमध्ये सहभागी आहेत यामध्ये भारतातील शेतकऱ्यांना स्थानिक उपाय उपलब्ध करून देणारी केंद्रे चालवणे, पेट्रोल आणि डिझेलची किरकोळ विक्री केंद्रे चालवणे, जल व्यवस्थापनाचे काम पाहणे आणि सौर पॅनेल बसवणे अशा अनेक कामांचा समावेश आहे.




**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा सन्मान करताना केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा**

कचऱ्यापासून ऊर्जा निर्मिती या मंत्रासह आज सहकारी संस्थाही गोवर्धन योजनेत मदत करत आहेत. सहकारी संस्था आता खेड्यापाड्यात सामायिक सेवा केंद्र म्हणून डिजिटल सेवा पुरवत आहेत. सहकारी संस्था बळकट करण्याचा आणि त्याद्वारे सभासदांचे उत्पन्न वाढवण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले.

**❊ बहुउद्देशीय सहकारी संस्थांची स्थापना होणार –**

सरकार २ लाख गावांमध्ये बहुउद्देशीय सहकारी संस्थांची स्थापना करत आहे, जिथे सध्या एकही संस्था नाही. उत्पादन क्षेत्रापासून सेवा क्षेत्रापर्यंत सहकारी संस्थांचा विस्तार केला जात आहे. आज भारत सहकार क्षेत्रातील जगातील सर्वात मोठ्या धान्य साठवणूक योजनेवर काम करत आहे. सहकारी संस्थांद्वारे राबविल्या जाणाऱ्या या योजनेत देशभरात गोदामे बांधली जात आहेत, ज्यात शेतकरी त्यांची पिके साठवून ठेवू शकतील, याचा छोट्या शेतकऱ्यांना सर्वाधिक फायदा होईल. कृषी उत्पादक संघटना (एफपीओ) च्या स्थापनेद्वारे लहान शेतकऱ्यांना मदत देण्याची सरकारची वचनबद्धता आहे. लहान शेतकऱ्यांना एफपीओंमध्ये संघटित करत आहोत आणि या संघटनांना बळकट करण्यासाठी आवश्यक आर्थिक सहाय्य देत आहोत. जवळपास ९,००० एफपीओ आधीच स्थापन करण्यात आले आहेत, त्यांचा उद्देश कृषी सहकारी संस्थांमार्फत शेतापासून ते स्वयंपाकघर आणि बाजारपेठेपर्यंत एक मजबूत पुरवठा आणि मूल्य साखळी तयार करणे. कार्यक्षमता वाढवण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून, कृषी उत्पादनांना जोडण्यासाठी निरंतर कार्यरत राहणारे दुवे निर्माण करण्याचा प्रयत्न आहे.

**❊ डिजिटल मंचाची भूमिका महत्त्वाची –**

सहकारी संस्थांमध्ये क्रांती घडवून आणण्यासाठी डिजिटल मंचाची महत्वाची भूमिका असणार आहे. सरकार सहकारी संस्थांना त्यांची उत्पादने 'डिजिटल कॉमर्स' साठी ओपन नेटवर्क (ओएनडीसी) सारख्या सार्वजनिक ई-कॉमर्स मंचाद्वारे विकण्यास सक्षम करत आहेत. जेणेकरून उत्पादने सर्वात वाजवी दरात थेट ग्राहकांपर्यंत पोहोचतील. सहकारी संस्थांना त्यांची बाजारपेठ वाढवण्यासाठी नवीन चॅनल उपलब्ध करून दिल्याबद्दल पंतप्रधान मोदी यांनी 'गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस' (GeM) ला श्रेय दिले. या उपक्रमामध्ये शेतीच्या आधुनिकीकरणावर भर दिला आहे. तसेच शेतकऱ्यांना स्पर्धात्मक डिजिटल अर्थव्यवस्थेत भरभराट होण्यासाठी आवश्यक असलेल्या साधनांसह सक्षम बनविण्यावर सरकार लक्ष केंद्रित करीत आहे.

**❊ महिलांचा सहभाग महत्त्वाचा –**

या शतकात जागतिक विकासात महिलांचा सहभाग महत्त्वाचा ठरणार आहे, एखादा देश किंवा समाज सर्व स्तरावर महिलांचा जितका अधिक सहभाग वाढवेल, तितकीच चांगली आणि वेगवान प्रगती, वृध्दी त्या देशाची, समाजाची होवू शकणार आहे, भारतामध्ये महिलांच्या नेतृत्वाखालील विकासाचे युग आहे आणि सहकार क्षेत्रातही महिलांचा मोठा वाटा आहे. महिलांच्या नेतृत्वाखालील सहकारी संस्था भारतातील सहकार क्षेत्राची ताकद बनल्या आहेत. महिलांची भागीदारी ६० टक्क्यांहून अधिक असल्याचे त्यांनी सांगितले. सरकारने बहुराज्यीय सहकारी संस्था कायद्यात सुधारणा करून अशा संस्थेच्या संचालक मंडळात महिला संचालक असणे बंधनकारक केले आहे. वंचित घटकांच्या सहभागासाठी आणि सोसायट्यांना अधिक समावेशक बनवण्यासाठी आरक्षण देखील ठेवण्यात आले.

भारतातील १० कोटी महिला बचत गटांच्या सदस्य आहेत. गेल्या दशकात या बचत गटांना ९ लाख कोटी रुपयांचे स्वस्त कर्ज दिले. बचत गटांनी मोठी संपत्ती खेड्यापाड्यात निर्माण केली आहे. २१व्या शतकातील जागतिक सहकारी चळवळीची दिशा ठरवण्याची गरज आहे. सहकारांसाठी सुलभ आणि पारदर्शक वित्तपुरवठा सुनिश्चित करण्यासाठी आम्हाला सहयोगी आर्थिक मॉडेलचा विचार करावा लागेल. यावेळी पंतप्रधान मोदी यांनी लहान आणि आर्थिकदृष्ट्या कमकुवत सहकारी संस्थांना आधार देण्यासाठी आर्थिक संसाधने एकत्रित करण्याच्या महत्त्वावर भर दिला. अशा प्रकारचे सामायिक आर्थिक मंच, मोठ्या प्रकल्पांना निधी देण्यासाठी आणि सहकारी संस्थांना कर्ज देण्यासाठी आवश्यक भूमिका बजावू शकतात. खरेदी, उत्पादन आणि वितरण प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेऊन पुरवठा साखळी वाढवण्यासाठी सहकारी संस्थांच्या क्षमतांवर त्यांनी प्रकाश टाकला.

पंतप्रधान मोदी म्हणाले की, सहकारी संस्थांनी चक्राकार अर्थव्यवस्थेशी जोडले जायला हवे. ते म्हणाले की, सहकारी संस्थांमध्ये स्टार्ट-अपला प्रोत्साहन देण्याची तात्काळ गरज आहे.

भारताचा विश्वास आहे की सहकारी संस्था जागतिक सहकार्याला नवीन ऊर्जा देऊ शकतील. सहकारी संस्था, विशेषतः ग्लोबल साउथच्या देशांना, त्यांना अपेक्षित असलेला विकास साधायला सहाय्य करू शकतील. म्हणूनच, आज सहकारी संस्थांच्या आंतरराष्ट्रीय सहकार्यासाठी नवा मार्ग शोधणे आवश्यक होते आणि आजची जागतिक परिषद यासाठी उपयोगी ठरेल, सहकाराची भावना सर्वात महत्वाची असून, ही भावना या चळवळीचा प्राण आहे, आणि ती सहकार संस्कृतीमधून आली आहे, असे त्यांनी नमूद केले.



# सहकार क्षेत्रातील ग्राहक टिकला तर सहकारी संस्था तग धरू शकतील - निमकर

## सहकार भारती आयोजित सहकार संवाद उपक्रम

**पुणे –** सहकाराची तत्त्वे समोर ठेवून सहकारी संस्थांनी काम केले तर संस्था टिकणार आहेत. पण तत्त्वे बदलली तर या क्षेत्रात टिकाव धरणे अवघड होणार आहे. तसेच सहकारातला ग्राहक याच क्षेत्रात टिकला पाहिजे, तरच सहकारी संस्था तग धरू शकतील असे ज्येष्ठ बँकिंग तज्ज्ञ गणेश निमकर यांनी येथे सांगितले.



सहकार सप्ताहानिमित्त सहकार भारती – पुणे महानगर आयोजित सहकार संवाद कार्यक्रम येथे आयोजित करण्यात आला होता. यावेळी ते बोलत होते. सहकार भारती महाराष्ट्र प्रदेश माजी अध्यक्ष डॉ. मुकुंद तापकीर, तर विद्यमान संघटन प्रमुख शरद जाधव, पुणे महानगर अध्यक्ष सीए दिनेश गांधी व्यासपीठावर होते.

सहकारी संस्थाचे पदाधिकारी यांना यावेळी सहकार महर्षी ग्रंथ भेट देण्यात आला. कार्यक्रमाला बँक, पतसंस्था आणि गृहनिर्माण संस्थांचे पदाधिकारी, संचालक आणि कर्मचारी उपस्थित होते. बुलडाणा मल्टिस्टेटचे मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष देशपांडे, जनता बँकेचे माजी अध्यक्ष आणि संचालक अभय माटे, संपदा बँकेचे मुकुंद भालेराव, बँकर जयंत काकतकर, सारस पतसंस्थेचे गणेश धारप, सरस्वती पतसंस्थेच्या अध्यक्ष सुचित्रा दिवाण, सुरभी पतसंस्थेच्या वसुधा खरे, चिंतामणी पतसंस्थेचे सुधीर दप्तरदार, उद्यम विकास बँकेचे संदीप खर्डेकर, जयवंत कडू, सहकार भारतीचे प्रदेश कार्यालय प्रमुख श्रीकांत पटवर्धन तसेच प्रदेश सहकोषाध्यक्ष औदुंबर नाईक आदी उपस्थित होते.




नागरी सहकारी बँका आणि पतसंस्था हा त्यांचा व्याख्यानाचा विषय होता. ते म्हणाले, सहकाराचा विचार, संस्कार टिकला, वाढविला पाहिजे, याबरोबरच बदलत्या काळानुसार सहकारी संस्थांनी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर दैनंदिन व्यवहारात करण्यावर भर देण्याची गरज आहे. यासाठी बदल स्वीकारण्याची मानसिकता असायला हवी. सध्याच्या काळात डिजिटल बँकिंगवर विशेष भर देण्यात येत आहे. या क्षेत्राला हे नवे तंत्रज्ञान स्वीकारण्याखेरीज पर्याय नाही. देशामध्ये हे नवे तंत्रज्ञान मोठ्या प्रमाणावर वापरण्यात येत आहे. असे असले तरी या क्षेत्रात काम करताना विश्वासार्हता आणि पारदर्शकता याला प्राधान्य देत असताना कोठे कमी पडतो, याबाबतचे आत्मचिंतन करण्याची आवश्यकता आहे, असे त्यांनी सांगितले.

बदल स्वीकारण्याची मानसिकता हवी असे स्पष्ट करून ते म्हणाले, देशातील बँक क्षेत्राचा विचार केला तर सहकारी बँका ९३ टक्के आणि व्यापारी, अथवा राष्ट्रीय बँका ७ टक्के आहेत. असे असले तरी राष्ट्रीय बँकांचा व्यवसाय हा सहकारी बँकांच्या तुलनेत खूप जास्त आहे आणि म्हणून सहकारी बँकांनी सामाजिक कामातून व्यवसाय वाढविण्यावर अधिक भर देण्याची गरज आहे. तसेच सभासद आणि ठेवीदार यांच्यातील नाते अधिक समृद्ध होण्याची आवश्यकता आहे.

सहकार भारतीच्या कार्याचा आढावा संघटन प्रमुख जाधव यांनी घेतला. ते म्हणाले, सहकार क्षेत्रात अपप्रवृत्ती असू नये, यासाठी सहकार भारती कार्यरत आहे. अनेक क्षेत्रांत सहकाराचे यशस्वी प्रयोग होत आहेत. त्याप्रमाणे आगामी काळात शेती क्षेत्रात देखील प्रयोग करण्यात यावा अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. यामुळे रोजगारवाढीच्या संधी वाढण्यास मदत होणार आहे आणि देशाची अर्थव्यवस्था अधिक बळकट होणार आहे.

डॉ. तापकीर मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, सहकार चळवळीचा विकास वेगाने होत असताना आणखी सक्षमतेसाठी प्रशिक्षणाची कायमस्वरूपी यंत्रणा असायला हवी. कारण ही आर्थिक आणि सामाजिक अशी चळवळ आहे. पुणे महानगर अध्यक्ष गांधी यांनी मनोगत व्यक्त केले. स्वागत आणि सूत्रसंचालन 'सहकार सुगंध'चे संपादक भालचंद्र कुलकर्णी यांनी केले. ते म्हणाले, सहकार भारतीच्या वतीने गेली अनेक वर्षे सहकार सप्ताह विविध उपक्रमांच्या माध्यमातून साजरा करण्यात येतो आहे. सहकार क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या मंडळींनी एकत्र यावे, हा त्यामागचा हेतू आहे. पुणे विभाग प्रमुख गिरीश भवाळकर यांनी आभार तर सहकार भारती प्रदेश कार्यालय प्रमुख श्रीकांत पटवर्धन यांनी सहकार गीत सादर केले.

---

## सहकारातील अपप्रवृत्ती कमी करण्यावर भर

**पुणे –** सहकार क्षेत्रातील पैसा हा सहकार क्षेत्रात रहावा, यासाठी पुणे जिल्हा हाउसिंग फेडरेशन आणि नागरी सहकारी बँक यांनी एकत्रितपणे काम करण्याची गरज आहे, असे मत पुणे नागरी सहकारी बँक्स असोसिएशनचे अध्यक्ष सुभाष मोहिते यांनी व्यक्त केले आहे.

पुणे नागरी सहकारी बँक्स असोसिएशन, पुणे जिल्हा हाउसिंग फेडरेशन, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पद्मश्री विखे पाटील अध्यासन आणि पुणे जिल्हा ऑडिटर्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने सहकार सप्ताहानिमित्त 'सहकारात सहकार' या विषयावर चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी सर्वश्री सुहास पटवर्धन, आनंद यादव, डॉ. अनिल कारंजकर हे सहभागी झाले होते. सहकार क्षेत्रातील अपप्रवृत्ती कमी करण्यावर भर देण्याची गरज आहे तरच सहकार क्षेत्र समृद्ध होण्यास मदत होणार आहे, असे त्यांनी नमूद केले. पटवर्धन यांनी सांगितले की, सहकारी हाउसिंग सोसायट्यांचे पुनर्विकासासाठी आरबीआयने सहकारी बँकांना अर्थसहाय्य करण्याची परवानगी दिली आहे.

याचा विचार करून फेडरेशनने या प्रकल्पासाठी सहकारी बँकांकडून अर्थसाहाय्य घ्यावे, यासाठी सहकारी बँका आणि फेडरेशन यांनी सहकारात सहकार या धोरणाचा अवलंब करावा. यामुळे सहकार क्षेत्र समृद्ध होण्यास हातभार लागणार आहे, तर डॉ. कारंजकर यांनी संगितले की, या क्षेत्रात युवक वर्गाचा अधिकाधिक सहभाग वाढविण्यावर भर देण्याची गरज आहे. यादव यांनी ऑडिटर्स यांच्यासमोरील अडचणी आणि चर्चासत्राच्या आयोजनामागची भूमिका विशद केली. मुख्य कार्यकारी अधिकारी शेळके यांनी आभार मानले.

# सहकार चळवळीत युवकांचा सहभाग वाढावा- मराठे यांची अपेक्षा



**पुणे –** सहकार चळवळीत युवकांचा सहभाग वाढावा यासाठी सहकार चळवळ बंधमुक्त करण्याची गरज आहे असे मत आरबीआय संचालक आणि सहकार भारतीचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष सतीश मराठे यांनी व्यक्त केले आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पद्मश्री विखे पाटील सहकार अध्यासनाच्या वतीने सहकार सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते.

पुणे अर्बन बँक असोसिएशन अध्यक्ष सुभाष मोहिते, सहकार भारती माजी प्रदेशाध्यक्ष डॉ. मुकुंद तापकीर, सावकार अध्यासन प्रा. डॉ. अशोक कांबळे, अध्यासनाचे प्राध्यापक डॉ. अनिल कारंजकर व्यासपीठावर उपस्थित होते. सुरुवातीला अध्यासन प्रमुख अनिल कारंजकर यांनी प्रास्ताविकात आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाची माहिती सांगितली.

मराठे यांनी सांगितले की, सध्याच्या स्थितीमध्ये देशभरात आठ लाखापेक्षा अधिक सहकारी संस्था कार्यरत आहेत. आकडेवारीच्या दृष्टीने पाहिले तर जगात भारताचा क्रमांक सहकार क्षेत्रात सर्वात वरचा आहे. मात्र व्यवहार वाढविण्यात अडचणी आहेत. त्याबरोबर सहकाराच्या क्षेत्रात महिलांचा आणि तसेच युवकांचा सहभाग मोठ्या प्रमाणावर वाढविण्याची गरज आहे. हा सहभाग वाढवायचा असेल तर सहकार चळवळ बंधमुक्त होणे आवश्यक आहे. प्रत्येक गोष्टीसाठी सहकार खात्याची आणि नियमकाची परवानगी घ्यावे लागते. त्यामुळे सहकार क्षेत्रात युवकांचा सहभाग मर्यादित स्वरुपात आहे. सहकार क्षेत्राचा देशांतर्गत उत्पन्नाचा वाटा २५ ते ३० टक्के इतका आहे. तरी देखील सहकार क्षेत्राला सरकार दरबारी महत्व देण्यात येत नाही अशी खंत त्यांनी व्यक्त केली.

असोसिएशनचे अध्यक्ष मोहिते यांनी मनोगत व्यक्त केले. वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. स्यामला यांनी आभार तर सूत्रसंचालन प्रा. ऐश्वर्या पाटील यांनी केले.

# नागरी सहकारी बँकांनी कामकाजात काळानुरूप बदल करावेत - मराठे



**पुणे –** नागरी सहकारी बँकांनी कामकाजात काळानुरूप बदल करीत असताना दूरदृष्टी ठेवून व्यवसायवाढीवर भर द्यावा, असे आरबीआयचे संचालक सतीश मराठे यांनी सांगितले. पुणे नागरी सहकारी बँक्स असोसिएशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या व्याख्यानमालेत ते बोलत होते.



७१व्या सहकार सप्ताहानिमित्त असोसिएशनच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सुरूवातीला मुख्यालयात ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी असोसिएशनचे अध्यक्ष सुभाष मोहिते राज्य सहकारी बँक प्रशासक विद्याधर अनास्कर, असोसिएशनचे संचालक बाळासाहेब उंद्रे, मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत शेळके आदी उपस्थित होते. सहकार सप्ताहाच्या निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

मराठे यांनी सांगितले की, नागरी सहकारी बँकांनी व्यवसायाच्या वाढीवर जाणीवपूर्वक भर द्यावा. तसेच बँकांनी भाग भांडवल उभारून सक्षम होण्याची गरज आहे. त्यादृष्टीने संचालक आणि अधिकाऱ्यांनी काम करावे तर अनास्कर यांनी सांगितले की, सहकारी संस्थांनी सहकार सप्ताहात सहकाराच्या तत्त्वांचे अनुकरण करणे अपेक्षित आहे.

मात्र प्रत्यक्षात असे अनुकरण होताना दिसत नाही ही खेदाची बाब आहे. व्यापारी संस्थांपासून सहकाराचे मॉडेल वेगळे आहे, ते यशस्वी करण्यासाठी अन्य तत्त्वांचे पालन करणे आवश्यक आहे.

प्रास्ताविकामध्ये अध्यक्ष मोहिते यांनी असोसिएशनच्या कार्याची माहिती सांगितली. ते म्हणाले, सहकार सप्ताहाच्या निमित्ताने सहकार क्षेत्रातील कार्यकर्त्यांनी अंतर्मुख होऊन आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. सहकाराची बलस्थाने सर्वसामान्य जनतेपर्यंत पोचवावीत, तसेच सहकार क्षेत्रातील कार्यकर्त्यांमध्ये सुसंवाद वाढण्यासाठी सर्वच स्तरांवर प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे.



**दिलीप पतंगे**

# सहकाराचा वारसा सर्वांनी जपण्याची गरज - दिलीप पतंगे

**सोलापूर –** महाराष्ट्राला सहकार क्षेत्राचा मोठा वारसा लाभला असून प्रत्येक गावाच्या मातीत सहकाराची मुळे खोलवर रुजली आहेत. तसेच सर्वसामान्य जनतेच्या प्रगतीमध्ये सहकारी संस्थांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरली आहे, असे जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशन अध्यक्ष दिलीप पतंगे यांनी येथे सांगितले.

सहकार सप्ताहाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या स्नेह मेळाव्यात ते बोलत होते. उपाध्यक्ष श्रीशैल बनशेट्टी, सचिव मल्लिकार्जुन केंदुळे यासह संचालक आणि अधिकारी उपस्थित होते. ते म्हणाले, राज्यात सहकारी बँक आणि पतसंस्थाचे जाळे विणले आहे. सहकारी संस्थासमोरील विविध प्रश्नांची सोडवणूक करण्यात यश मिळत आहे. जनतेच्या विश्वासावर सहकार क्षेत्र टिकून आहे. यापुढील काळात सहकारी संस्था सदस्य यांच्यातील नाते अधिक घट्ट होणार आहे.

# सहकार कायदा हा व्यक्तिसापेक्ष असू नये - विद्याधर अनास्कर



**पुणे** – सहकार कायदा हा व्यक्तिसापेक्ष असू नये असे मत राज्य सहकारी बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर यांनी व्यक्त केले आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विखे पाटील अध्यासनाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या सहकार सप्ताहाच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्ष स्थानी विद्यापीठाचे प्रकुलगुरू डॉ. पराग काळकर होते.

यशदाचे उपमहाव्यवस्थापक शेखर गायकवाड, राज्य पतसंस्था फेडरेशन अध्यक्ष काका कोयटे, पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशन अध्यक्ष सुभाष मोहिते महाराष्ट्र आणि पुणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण संस्था अध्यक्ष सुहास पटवर्धन कात्रज दूध संघ अध्यक्ष भगवान पासलकर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक उपाध्यक्ष सुनील चांदेरे, अध्यासनाचे प्रमुख डॉ. अनिल कारंजकर आदी यावेळी उपस्थित होते.

ते म्हणाले की, विद्यापीठाने विद्यार्थ्यांसाठी काही उपक्रम हाती घेतले तर राज्य सहकारी बँक त्यासाठी जरूर सहकार्य करेल. तर गायकवाड यांनी सांगितले की, सहकाराच्या क्षेत्रात महिला आणि युवक यांचा अधिकाधिक प्रमाणावर सहभाग वाढण्यासाठी जे प्रयत्न करावे लागतील. त्यासाठी यशदाचा सहभाग नक्कीच असणार आहे.

प्रकुलगुरू काळकर यांनी विद्यापीठातील विविध अध्यासनांची माहिती सांगितली.

अध्यासनाचे प्रमुख डॉ. कारंजकर यांनी प्रास्ताविकामध्ये कार्यक्रमाच्या आयोजनामागची भूमिका मांडली. कॉसमॉस सहकारी बँक अध्यक्ष प्रल्हाद कोकरे यांनी स्वागत केले. प्रसाद भारदे यांनी सूत्रसंचालन तर कॉसमॉस बँक व्यवस्थापकीय संचालिका अपेक्षिता ठिपसे यांनी आभार मानले.

# सहकार भारती सोलापूर शाखेचा सहकार सप्ताह साजरा

**सोलापूर** – सहकार भारती सोलापूर शहराच्या वतीने सहकार सप्ताह साजरा करण्यात आला.

यावेळी शहर अध्यक्ष किरण करकमरकर, शहर महामंत्री यशवंत बोराडे, पतसंस्था प्रकोष्ट प्रमुख संदिप कोळी, जिल्हा विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी प्रमुख यागंटे, जिल्हा संघटक चंद्रकांत धोंडे, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख हनुमंत कोळी, महानगर हौसिंग प्रकोष्ट प्रमुख ॲड. पारीख साहेब, जिल्हा कार्यकारिणी सदस्य सुर्यकांत पाटील उपस्थित होते.




कार्यक्रमाची सुरूवात भारत माता पूजनाने झाली. जिल्हा महामंत्री शिवानंद बोरामणी यांनी प्रास्ताविक तर विधानसभा निवडणुकांमध्ये सर्वांच्या सहकार्याने झालेल्या भेटी, बैठका व अन्य बाबींची माहिती शहर अध्यक्ष करकमरकर यांनी सांगितली.

# सहकारी संस्थांच्या प्रलंबित निवडणुका जानेवारीत

**पुणे** – लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांमुळे राज्यातील प्रलंबित असणाऱ्या सहकारी संस्थांच्या निवडणुका आता नववर्षात म्हणजेच जानेवारीमध्ये होणार आहेत. त्या दृष्टीने त्या त्या जिल्ह्यातील सहकारी संस्थांच्या मतदार याद्या अद्ययावत करण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. उपलब्ध माहितीनुसार राज्यातील एकूण २९ हजार ४२९ सहकारी संस्थांच्या निवडणुका प्रलंबित आहेत.



अनिल कवडे

साधारणपणे येत्या ३१ डिसेंबरपर्यंत मतदार याद्या अद्ययावत करण्याचे काम पूर्ण झाल्यावर निवडणुका जाहीर करण्यात येणार आहेत, असे सहकार निवडणूक प्राधिकरण आयुक्त अनिल कवडे यांनी सांगितले. ते म्हणाले, शासनाने ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत सहकारी संस्थांच्या निवडणुकांना स्थगिती दिली आहे. आता विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता संपली असल्याने निवडणुका होणार आहेत. एकूण २९ हजार ४२९ पैकी ७ हजार १०९ सहकारी संस्थांची निवडणूक प्रक्रिया सुरू झाली होती. मात्र, मधल्या काळातील पावसाळा आणि त्यानंतर लोकसभा आणि विधानसभा निवडणुका यामुळे सहकारी संस्थांच्या निवडणुका पुढे ढकलण्यात आल्या होत्या.

मध्यंतरी १ ऑक्टोबरपासून सहकारी संस्थांच्या निवडणुका घेण्याबाबतचे आदेश देण्यात आले होते. पण पुन्हा स्थगिती देण्यात आली होती. आता निवडणुकीची आचारसंहिता संपली असल्याने निवडणुका घेण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यानुसार शासनाचा आदेश आल्यानंतर जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात निवडणुकीचे वेळापत्रक जाहीर केले जाणार आहे. सहकारी संस्थांची वर्गवारी याप्रमाणे – अ वर्ग – ४२ ब गट – १७१६, क गट – १२,२५० आणि ड गट – १५,४३५.

# सहकार संवाद उपक्रमास उदंड प्रतिसाद

**जयसिंगपूर** – प्रदेश सहकार भारती आणि येथील कर्मवीर मल्टिस्टेट यांच्या संयुक्त विद्यमाने सहकार संवाद उपक्रम घेण्यात आला. यामध्ये ४० पतसंस्थांमधील १०० पेक्षा अधिक प्रतिनिधी सहभागी झाले होते.

राज्य पतसंस्था फेडरेशन सहसचिव आणि सहकार भारती कोल्हापूर जिल्हाध्यक्ष जवाहर छाबडा, तसेच फेडरेशनचे संचालक सागर चौगुले, मल्टिस्टेटचे अध्यक्ष अरविंद मजलेकर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

संचालक मंडळाने सहकारातील कायदे यांची माहिती करून घेणे, तसेच संस्थेत विश्वस्त म्हणून काम करणे आणि अन्य संस्थाबरोबर स्पर्धा करणे चुकीचे आहे असे मत चौगुले यांनी व्यक्त केले. मल्टिस्टेटचे संचालक भरत गाट यांनी आभार मानले.

# सहकाराचे स्वरूप आणि कार्यपद्धतीबाबत चिंतन आवश्यक

प्रतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाच्या ७६ व्या स्वातंत्र्यदिनी लाल किल्ल्यावरून भाषण करताना आपल्या भाषणात 'अमृतकाळ' या शब्दाचा अनेक वेळा वापर केला. 'अमृतकाळ' म्हणजे देशाच्या ७५ ते १०० वर्षांचा म्हणजेच पुढील २५ वर्षांचा कालावधी, या कालाधीत आत्मनिर्भर भारताचे स्वप्न राज्यकर्त्यांना साकार करावयाचे आहे. या कालावधीत नागरिकांचे जीवन सुधारणे, खेडी आणि शहरांमधील विकासाची दरी कमी करणे, लोकांच्या जीवनातील सरकारी हस्तक्षेप कमी करणे इ. उद्दिष्टांचा समावेश होतो. सन २०४७ पर्यंत हे उद्दिष्ट गाठण्यासाठी सर्वच क्षेत्राने कंबर कसणे आवश्यक आहे. ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या सहकार क्षेत्राचे भरघोस योगदान यामध्ये अपेक्षित असून ते महत्त्वाचे ठरणार आहे.



विद्याधर अनास्कर
मो.नं. ९८५०९७४०७५

या विषयावर विचार मंथन करीत असताना पुढील मुद्द्यांवर इतिहास व आगामी वाटचाल या ठिकाणी जाणून घेणे महत्त्वाचे ठरेल.

**१) सहकार चळवळ ही शासन प्रणित आहे याचा राज्य शासनाला विसर पडत चालला आहे का ?**

देश स्वतंत्र झाल्यावर खाजगी व सार्वजनिक क्षेत्राचा उदय झाला. गोरावाला समितीच्या शिफारशीनुसार देशाच्या नियोजनात सहकारावर एक स्वतंत्र प्रकरण टाकण्यात आले. स्व. पंडित नेहरूंच्या शिफारशींवर नियोजनात प्रत्येक खेडेगावात शाळा, ग्रामपंचायत यांच्या बरोबरच एका सहकारी संस्थेचे नियोजन करण्यात आले होते. सरकारच्या मूळ उद्दिष्टांनुसार सहकारात सरकारची भागीदारी अपेक्षित होती. सुरुवातीच्या काळात महाराष्ट्र शासनाने ग्रामीण विकासासाठी आवश्यक असणाऱ्या अनेक संस्थांमध्ये शासकीय भाग भांडवलाद्वारे भागीदारी प्रस्थापित केली. भागीदारीबरोबरच इतर अनेक मार्गांनी म्हणजेच कर्ज, अनुदान, शासकीय थक-हमी, कर सवलती इत्यादी मार्गाने सहकारी संस्थांसाठी सहाय्यकारी धोरणे आखली व त्याची अंमलबजावणी देखील केली. अशा सहकारी संस्था आर्थिकदृष्ट्या सक्षम झाल्यावर सदर भागीदारीतून बाजूला होत त्यांना स्वायत्तता देणे अपेक्षित होते. परंतु अशा मदतीसाठी संस्थांची निवड ही पारदर्शीपणे व योग्यप्रकारे झाली नाही, हे खेदाने नमूद करावे लागेल. पूर्वी पंचवार्षिक योजनांद्वारे सहकारातील शेती, प्रक्रिया, दूध, मत्स्य, वाहतूक व इतर संस्थांसाठी केंद्रशासन भरपूर निधीची तरतूद करत होते. राष्ट्रीय सहकार विकास संस्थेमार्फत राज्यांना भरीव मदत दिली जात असे. आता देशाच्या व राज्याच्या अर्थसंकल्पात त्याची उणीव जाणवत आहे. शेतकरी हा केंद्रबिंदू मानून स्वतःची धोरणे राबविणाऱ्या राज्य सरकारने सहकाराला प्राधान्य न देता व्यावसायिकतेच्या मुद्द्यांवर खाजगी क्षेत्राला झुकते माप देण्याचा निर्णय घेतल्याचे जाणवते. शासनामध्ये होऊ घातलेल्या वैचारिक बदल हा सहकाराचे अपयश नसून त्यामध्ये सामिल झालेल्या व्यक्तिंचा दोष आहे, हे माहित असूनही अशा अयोग्य व्यक्तिंना सहकार क्षेत्रापासून दूर ठेवण्याबाबतची उपाययोजना शासन स्तरावर अपेक्षित असताना संपूर्ण सहकार क्षेत्रालाच मदतीपासून दूर ठेवले जात आहे, ही वस्तुस्थिती आहे. या पार्श्वभूमीवर गेल्या ७५ वर्षात शासनस्तरावर सहकार क्षेत्राची विश्वासार्हता घटविण्याकरता जबाबदार असणाऱ्या व्यक्तिंवर, वर्गावर कोणतीच कारवाई न केल्यामुळे दुष्ट प्रवृत्तींना धाक बसण्याऐवजी त्यांना सहकार हे चराऊ कुरण वाटू लागले. परंतु केंद्रीय पातळीवर सहकारासाठी स्वतंत्र मंत्रालयाची स्थापना झाल्याने आणि त्याची धुरा अमितजी शहा यांच्यासारख्या समर्थ नेतृत्वाकडे सोपविण्यात आल्याने 'सहकार' ही शासनप्रणित चळवळ असल्याची जाणीव मोदी सरकारला झाल्याचे जाणवते. अटलबिहारी वाजपेयी सरकारने सन २००२ सहकाराचे राष्ट्रीय धोरण जाहीर केले होते. त्यानंतर तब्बल २१ वर्षांनंतर मोदी सरकारने सुरेश प्रभू यांच्या अध्यक्षतेखाली नवीन सहकार धोरण जाहीर करण्यासाठी समिती गठीत केली आहे. नवीन सहकार मंत्रालयाने सहकाराच्या सक्षमीकरणासाठी अनेक योजना जाहीर केल्या आहेत.

देशात सहकारात क्रमांक एकचे राज्य असलेल्या महाराष्ट्रासारख्या राज्याने केंद्रीय धोरणांशी सुसंगत धोरण आखत राज्यात सहकाराचे सक्षमीकरण करत पुढील २५ वर्षाच्या 'अमृतकाळ'मध्ये देश आत्मनिर्भर बनविण्यात मोलाचा वाटा उचलणे अपेक्षित आहे. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे हे करीत असताना पूर्वीच्या चुकांची पुनरावृत्ती टाळली पाहिजे.

**२) गेल्या ७५ वर्षात सहकार चळवळीला आपले ध्येय गाठण्यात कितपत यश आले आहे?**

या विषयावर मतप्रदर्शन करीत असताना इतिहासाचे अवलोकन केल्यास यश तर येत होते. परंतु ते टिकवता आले नाही, असेच म्हणावे लागेल. सुरुवातीस म्हणजे १९४७ ते १९८० या काळात सहकाराची वाढ धिम्या गतीने झाली. मात्र १९८० ते २००० या कालावधीत सहकारी बँका, साखर कारखाने, शेतीमालाच्या संस्था, मजूर संस्था इत्यादी सहकारातील सर्वच संस्थांमध्ये वाढ झाल्याचे दिसून येईल. परंतु सहकाराची तत्वे व त्यातील फायदे याचं माहिती घेऊन ते आत्मसात करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या किमान शैक्षणिक पात्रतेचा अभाव हे सहकार चळवळ लोकाभिमुख न होण्यामागील प्रमुख कारण वाटते. सदर चळवळ ही तळागाळातील गोरगरीबांच्या आर्थिक उन्नतीसाठी असताना या चळवळीत सामील होण्यासाठी आवश्यक असणाऱ्या किमान उत्पन्नाच्या अभावाने व अज्ञानाने अनेक गोरगरीब या चळवळीपासून अलिप्त राहिले. वास्तविक अशांना आर्थिक मदत देऊन त्यांना या प्रवाहात आणण्याचे पवित्र कर्तव्य शासनाने बजावले असते तर सहकार चळवळीला गुणात्मक यश आल्याचे म्हणता आले असते. राज्यातील सहकारी संस्थांच्या आकडेवारीनुसार हे संख्यात्मक यश म्हणता येईल, परंतु या सहकारातील सामान्य जनतेचे नेतृत्व करणाऱ्या सधन वर्गामध्ये सहकाराच्या खऱ्या उद्दिष्टांबद्दल असलेली अनास्था हे राज्याच्या सहकार चळवळीचे अपयशच म्हणता येईल. सहकाराच्या त्रिस्तरीय रचनेत विविध कार्यकारी संस्था, जिल्हा बँका व शिखर बँक यांनी शेती क्षेत्रासाठी दिलेले भरीव योगदान महत्त्वाचे आहे. बीगर कृषी संस्था, भूविकास बँका, पतसंस्था यांचे योगदानही अमूल्य आहे. मात्र, अयोग्य व्यवस्थापनामुळे या वित्तीय संस्थाच अडचणीत आल्याने अनेक ठिकाणी ही त्रिस्तरीय रचना विस्कळीत झाल्याचे अनुभवले आहे. शासनाच्या कृषी पणन विभागामार्फत कृषी पणन मंडळ, राज्य वखार महामंडळ, राज्य सहकारी पणन महासंघ, राज्य कापूस उत्पादक पणन महासंघ, राज्य सहकारी ग्राहक महासंघ यांनी शेतकऱ्यांच्या शेतीमालाच्या उत्पादनात वाढ करण्यासाठी त्यांच्या मालाला बाजार मिळवून देण्यासाठी महत्वाची भूमिका बजावली आहे. कृषी उत्पन्न बाजार समित्यांना स्वराज्य संस्थांचा दर्जा दिल्याने त्यांनी पणन व्यवस्था सुधारून कृषी मालास योग्य दर मिळवून देणे, पायाभूत सुविधांची निर्मिती, उत्पादक व ग्राहक थेट विक्रीस प्रोत्साहन, कृषी मालाच्या निर्यातीस चालना इत्यादी अनेक उपाय राबविले. यामुळे शेतकरी वर्गाला दिलासा मिळाल्याचे दिसत असले तरी हे यश सहकारी संस्थांचे नसून ते शासनाच्या सहकार विभागाचे आहे, हे येथे आवर्जून नमूद केले पाहिजे.

**सहकार व राजकारण यांचे नाते निश्चितच एकमेकांना पूरक असेच आहे. मात्र ते सहकाराच्या मूळ तत्त्वांवर आधारित असणे आवश्यक आहे. सहकार व राजकारण यांचे नाते जरी अतूट असले तरी राजकारणात एखाद्याचे खच्चीकरण करण्यासाठी एखाद्या नामवंत व कुशल व्यक्तिच्या पुढाकाराने उभ्या राहिलेल्या सहकारी संस्थेस विरोधकांनी वेठीस धरु नये. राजकारण हे देखील तत्त्वांचे झाले पाहिजे.**

**३) राज्याची सहकार चळवळ ही सामाजिक, आर्थिक व्यवस्था म्हणून उद्याला आली, असे म्हणता येईल का?**

संपूर्ण देशात सर्वाधिक सहकारी संस्था असलेले राज्य म्हणून महाराष्ट्राचा उल्लेख अभिमानाने करावा लागेल. सन १९४७ ते १९९० या कालावधीत ग्रामीण

विकासाचा आर्थिक कणा म्हणून सहकार क्षेत्राने आपली जबाबदारी पार पाडल्याचे ज्ञात आहे. या दरम्यान राज्यातील सुमारे ६ कोटींच्यावर जनता सहकाराशी निगडीत होती. परंतु १९९१ मध्ये खुल्या अर्थव्यवस्थेचा स्वीकार केल्यानंतर सहकारी संस्थांची गरज नाही असा पद्धतशीर अपप्रचार सुरु झाला. खुल्या अर्थव्यवस्थेचा स्वीकार करण्यापूर्वी पंचवार्षिक योजनेच्या आठव्या आराखड्यात ग्रामीण विकास, सहकार, पर्यावरण, उत्पादनविषयक शिक्षण यावर विशेष भर दिला गेला होता. उत्पादकाला किफायतशीर दर देऊन ग्राहकाला रास्त दरामध्ये जीवनावश्यक व अन्य माल उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सहकारी व्यवस्थेवर भर देणे अपेक्षित असताना प्रत्यक्षात मात्र केंद्र शासनाने जागतिक व्यापारीकरणांचे दाखले देत खाजगी संस्थांना बढावा देत सहकार चळवळ निर्जिव करून टाकली. या पार्श्वभूमीवर आठव्या योजनेत 'सहकार' हा शब्द औषधाला सुद्धा ठेवला नाही. याचा परिणाम महाराष्ट्रासारख्या सहकार पंढरीत न झाला तर नवलच, सहकाराला व्यावसायिकतेची जोड आवश्यक असल्याचा नारा देत 'जरुरीपुरता नफा' या ऐवजी 'जास्तीत जास्त नफा' ही व्यापारी संज्ञा राबविण्याची अपेक्षा सहकारी संस्थांकडून केली जाऊ लागली व या निकषांवर न उतरणाऱ्या सहकारी संस्थांना 'अपयशी' म्हणून घोषित करण्यात येऊ लागले. यामुळे सहकार चळवळ ही सामाजिक, आर्थिक व्यवस्था म्हणून उदयाला येऊ घातली असतानाच खुल्या अर्थव्यवस्थेत तीचे खच्चीकरण केले गेले असेच म्हणावे लागेल. परंतु सहकाराच्या नव्या धोरणात सहकार क्षेत्राला समान पातळीवर आणण्याची घोषणा अमित शहा यांनी केल्याने सहकार चळवळीत नवचैतन्य निर्माण झाल्याचे मान्य करावे लागेल.



**४) सहकार व राजकारण यांचे नाते राज्यातील सहकार चळवळीच्या पथ्यावर की मुळावर ?**

सहकाराचा संबंध निर्मितीशी, निर्मितीचा संबंध वस्तुविनीमयाशी म्हणजेच बाजारपेठ व आर्थिक उलाढालींशी आल्याने 'सहकार' हा शब्द समृद्धीदर्शक ठरला. समृद्धीच्या आकर्षणामुळे अनेकजण सहकाराकडे वळले. सहकारी बँका, साखर कारखाने सुरु करण्यासाठी नियमानुसार लागणारे अवाढव्य भांडवल व वाजवी स्वरुपात ते गोळा करण्यासाठी लागणारे सभासदांच्या रुपातील प्रचंड मनुष्यबळ यांचे संकलन करणे हे कोणत्याही सामान्य माणसाचे काम नव्हे. त्यासाठी ज्यांच्यावर जनतेचा विश्वास आहे अशा त्या भागातील पुढाऱ्यांनीच ही जबाबदारी पेलणे अपेक्षित होते व ती त्यांनी स्वीकारून पार पाडली देखील. परंतु सहकारी संस्था स्थापनेपुरताच स्वतःचा सहभाग ठेवण्याची उदात्त विचारसरणीची अपेक्षा कोणाकडूनही ठेवणे अश्यक्यच. त्याला राजकारणी व्यक्तिंचा अपवाद असण्याचे कोणतेही कारण नाही.

पूर्वी अनेक राजकीय मंडळींच्या पुढाकाराने स्थापन झालेल्या सहकारी संस्थांना त्यांनी स्वतःची नावे दिल्याचे उदाहरण क्वचितच. परंतु त्यांच्या पुढील पिढीने मात्र नामांतराच्या माध्यमातून स्वतःच्या कौटुंबिक मालकीचा शिक्का त्या सहकारी संस्थांवर उमटवलेला आपण पाहिला असेल. सुरुवातीच्या काळात राजकीय सत्ता ही सहकाराला कुंपण म्हणजेच संरक्षक ठरत होती. कालांतराने सहकार व राजकारण यातील अंतर कमी होत गेले. सहकार व राजकारण यांची युती हा व्यक्तिगत उत्तीचा भार्ग झाला. अनेक राजकारण्यांनी सत्तेच्या मार्गावर चालण्यासाठी सहकारी संस्थांच्या साधनसामुग्रीचा सूचित बाजूला ठेवून वापर केला. त्यामुळे अनेक सहकारी संस्था अडचणीत आल्या. त्यामुळे सहकाराच्या विश्वासार्हतेला अधोगत लागल्याचे चित्र निर्माण झाले व त्याचा फायदा खाजगी क्षेत्राने उठविण्यास सुरुवात केली. त्यात ते इतके यशस्वी होऊ लागले की राज्य शासनामध्ये अनेकजण सहकारातून आलेले असतानाही सहकाराकरिता स्वतंत्र मंत्रालय असूनही नोकरशाहीच्या दबावापुढे शासकीय धोरण म्हणून सहकाराला विशेष व खाजगी क्षेत्राला प्रोत्साहन मिळू लागले. शासकीय ठेवी असोत अथवा कोणतीही शासकीय योजना असो, सक्षमतेच्या निकषांवर त्या खाजगी बँकांमधून राबविण्याचे निर्णय शासन स्तरावर होऊ लागले.

सर्वच सहकारी संस्थांमधून कांही मोजक्याच व्यक्तिंच्या हातात सत्तेचा सारिपाट पाहण्यास मिळतो. सहकारातील श्रमविभागणी व सामुहिक नेतृत्व या मुद्द्यांवर गेल्या ७५ वर्षात राज्याला बरेच अपयश आल्याचे कबूल करावे लागेल, यामध्ये सुधारणा करणे म्हणजे राजकीय व्यक्तिंना या क्षेत्रापासून दूर ठेवणे असा घेतल्यास ते केवळ अशक्य आहे. सबब या अत्यंत महत्त्वाच्या मुद्द्यांवर 'अमृतकाळ'मध्ये सर्व क्षेत्रालाच विचारमंथन करावे लागेल.

**५) सहकाराच्या तत्त्वाशी फारकत व सहकाराचे राजकीयीकरण :**

सहकाराबद्दल शासकीय पातळीवर घेतले जाणारे निर्णय पूर्वीप्रमाणे केवळ सहकार क्षेत्राच्या सक्षमतेसाठी घेतले जात नाहीत तर ते राजकीय व व्यक्तिसापेक्ष असतात हे कोणीही नाकारू शकत नाही. सहकारी संस्था ही समान गरज असलेल्या सभासदांची असते. ती कोणत्याही एका राजकीय पक्षाच्या विचारांची जास्त मंडळी त्या सहकारी संस्थेच्या संचालक मंडळावर असू शकतात. परंतु माध्यमांमध्ये मात्र 'अमुक अमुक राजकीय पक्षाच्या ताब्यातील सहकारी संस्था दुसऱ्या राजकीय पक्षाने हिसकावून घेतली' अशा स्वरुपाच्या बातम्या प्रसिद्ध होतात.

सहकारातील तत्त्वांमध्ये सभासदांच्या प्रशिक्षणाला दिलेले महत्व गेल्या ७५ वर्षात कधीच अधोरेखित केले गेले नाही. त्यासाठी कायद्यात बदल करुनही त्याची अंमलबजावणी केली गेली नाही, हे सत्य नाकारता येणार नाही. किंबहुना आपला सभासद हा संस्थेच्या कारभारासंदर्भात जास्तीत जास्त अंधारात कसा राहील याचीच काळजी संस्थांच्या व्यवस्थापनाने घेतल्याचे दिसते. कोणत्या मुद्द्यांवर आम्ही संस्था चांगली चालवली हे संचालक सांगतात ते समजावून घेण्याची ताकद समोरील सभासदांच्या ज्ञानात नसल्यामुळे सहकारी संस्थांच्या वार्षिक सभा एक तर गोंधळात अथवा शांततेत पार पडतात. त्यामुळे सहकारी संस्थांच्या सभासदांना सहकारी चळवळीची मूळ तत्वे समजावून सांगण्याची तसदी आजपर्यंत कोणीच घेतली नसल्याने त्या तत्त्वांशी वेळोवेळी फारकत घेतली जात असली तरी सभासदांच्या ते कधीच लक्षात येत नाही. हे चित्र विदारक आहे. यासाठी सहकारातील सर्व घटकांना प्रशिक्षण व मार्गदर्शन करण्यासाठी स्थापन झालेल्या राज्य सहकारी संघाने कधीच आपल्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी प्रामाणिक प्रयत्न केले नाहीत.

देशात पहिले 'सहकार विद्यापीठ' सुरु करण्यासाठी शिखर बँकेने पुढाकार घेत भू-विकास बँकेची पुणे येथील जागा सुमारे रु. २५ कोटींना लिलावात घेत संपूर्ण रकमेचा भरणाही केला. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या कॉलेज ऑफ अॅग्रीकल्चरल बँकींग या संस्थेने देशपातळीवर केलेल्या पाहणीत सहकारी बँकांमधून लोकशाही व्यवस्थापन अस्तित्वात नसून वर्षानुवर्ष तिथे निवडणूकाच होत नसल्याचे नमूद करीत सहकारी बँकामधून सहकाराच्या तत्त्वांचा ऱ्हास होत असल्याचा निष्कर्ष काढला आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने भारतातील विविध राज्यातील सुमारे ९६० नागरी सहकारी बँकांना सुमारे २७ प्रश्नांची प्रश्नावली पाठविली होती. त्याव्यतिरिक्त रिझर्व्ह बँकेच्या तपासणी अधिकाऱ्यांशी चर्चा करुन गेल्या ५ वर्षातील संख्यांकीय माहितीच्या आधारावर रिझव्ह बँकेने पुढील निष्कर्ष काढले आहेत.

१) सहकारातील सात पैकी कोणत्याच तत्त्वांचे पालन नागरी सहकारी बँकांकडून होत नाही. २) सहकारी संस्थेचे सभासदत्व खुले व ऐच्छिक असताना प्रत्यक्षात ओळखीच्या व कर्जदारांनाच सभासदत्व दिले जाते. ३) प्रश्नावलीस प्रतिसाद दिलेल्यांपैकी ७३.८६% बँकांच्या निवडणूका बिनविरोध होतात, त्यामुळे लोकशाही मार्गाने नियंत्रण हे तत्व मागे पडते. ४) वार्षिक सभांमधील उपस्थिती २% पर्यंत व मतदान जास्तीत जास्त २०% इतकेच होत असल्याने सभासदांचा सहभाग संस्थेच्या व्यवहारांमध्येच नगण्य असतो. ५) या बँकांवर सहकार खात्याचे अवाजवी नियंत्रण असल्याने 'स्वायत्तता' या तत्वाला हरताळ फासला जातो. ६) सभासदांचे प्रशिक्षण या मुद्द्यावर सर्वत्रच उदासिनता दिसून येते. धार्मिक तटस्थतेचा मुद्दा त्यातील नाजुकता लक्षात घेत रिझर्व्ह बँकेने त्याचा समावेश प्रश्नावलीमध्ये केला नाही. या अभ्यासावर सहकारी बँकांमधून सहकारी तत्वांचे पालन केले जात नाही, असा रिझर्व्ह बँकेने काढलेला निष्कर्ष योग्यच आहे. या

पार्श्वभूमीवर गेल्या ७५ वर्षांत आपण सहकाराची तत्व बासनात गुंडाळून ठेवली असेच म्हणाचे लागेल.

**६) सहकाराची प्रतिमा उंचावण्यात सर्वच पातळीवर उपयश :**

तत्कालीन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी एका वृत्तपत्राने आयोजित केलेल्या 'बदलता महाराष्ट्र' या कार्यक्रमात बोलताना सहकार क्षेत्राबद्दल केलेले विधान अंतर्मुख करायला लावणारे आहे. ते म्हणाले राज्यातील बहुसंख्य जनता कृषी क्षेत्रावर अवलंबून असल्याने सहकार क्षेत्र फोफावले. त्या क्षेत्राचा विकास झाला पण ज्ञानाधिष्ठीत अर्थकारणासाठी तो पुरेसा नाही. सहकार चळवळीसाठी फारशी गुणवत्ता लागत नाही. त्यातून पुढारी होता येते व अर्थप्राप्तीही होते. सामाजिक परिवर्तनाचे साधन म्हणून सुरु झालेल्या सहकारी चळवळीचे संक्रमण थेट पुढारी होऊन अर्थप्राप्ती करण्याचा मार्ग, इथपर्यंत गेल्या ७५ वर्षात झाले असले व त्याची कबुली खुद्द राज्याचे मुख्यमंत्री पदावर असतानाच देत असतील तर इतरांनी त्यावर भाष्य न केलेलेच बरे. यामुळे ज्ञानाधिष्ठीत व्यावसायिकतेचा अभाव असल्यानेच सहकाराचा पराभव होत असल्याचे दिसून येते. एकंदरीतच गेल्या ७५ वर्षात सहकाराची प्रतिमा दिवसेंदिवस खराब होत चालली आहे, असा प्रश्न निर्माण होतो.

सहकारामध्ये कार्यरत असलेल्या अनेक व्यवसायांपैकी सहकारी बँकांमधील गैरव्यवहारांमुळे प्रसिद्धी माध्यमांमध्ये सहकार क्षेत्र सर्वात जास्त बदनाम झाल्याचे मान्य करावे लागेल, सहकारी संस्था या सभासदांसाठी सभासदांनी चालविलेल्या असल्या तरी सहकारी बँकांमधून केवळ सभासदांच्या नव्हे तर सामान्य जनतेच्याही ठेवी असल्याने या क्षेत्रातील गैरव्यवहारांबद्दल जास्तच चर्चा झाल्याचे दिसून येते. वास्तविक गैरव्यवहार करणारी मंडळी ह्या अपप्रवृत्तीच्या असतात. अशी अपप्रवृत्ती सर्वच क्षेत्रात कमी अधिक प्रमाणात आढळते. वास्तविक राष्ट्रीयीकृत बँकांमधील गेल्या सहा महिन्यातील घोटाळ्यांची आकडेवारी रु. ९५ हजार कोटींच्या घरात आहे. त्याबरोबर सहकारी बँकांमधील गेल्या पाच वर्षांतील आकडेवारी रु. २२० कोटींची आहे. त्यातही कॉसमॉस बँकेवरील सायबर हल्ल्यातील रक्कम रु. ९४ कोटी इतकी आहे. असे असतानाही सहकारी बँकांमधील घोटाळ्यांची चर्चा प्रसार माध्यमांमधून जास्त प्रमाणात होताना दिसते. या संबंधातही सखोल संशोधन होणे आवश्यक आहे. नुकत्याच घडलेल्या बँकेतील गैरव्यवहाराच्या पार्श्वभूमीवर सहकार क्षेत्रातील अपप्रवृत्ती जोपासणाऱ्या व्यक्तिंमुळे संपूर्ण क्षेत्र बदनाम होत आहे, हे लक्षात येऊनही अशा अपप्रवृत्तीला तातडीने बाहेरचा रस्ता दाखविण्याबाबत शासनस्तरावर कोणतीही उपाय योजना झाली नाही. सहकारातील अपप्रवृत्ती जोपासणारी मंडळी संपूर्ण सहकारी क्षेत्राला ज्ञात असूनही नैतिक जबाबदारीतून आपण योग्य त्या ऑथॉरिटीसमोर याबाबी आणल्या नाहीत. कायदेशीरदृष्ट्या गुन्हा घडत असताना गप्प बसणे म्हणजे गुन्ह्याला अप्रत्यक्ष मदतच करणे, या तत्त्वानुसार आपणही गुन्हेगारच ठरतो. या पार्श्वभूमीवर सहकाराची प्रतिमा उंचावण्यासाठी कोणत्याच पातळीवर नियोजनबद्ध उपक्रम राबविण्यात आले नाहीत, हे खेदाने नमूद करावे लागेल.

**७) सहकाराच्या तत्त्वांमध्ये व कायद्यामध्ये कालानुरुप पुरेसे बदल केले गेले नाहीत.**

सहकाराच्या मूळ तत्वांनुसार 'सहकार' हे 'व्यक्तिंचे संघटन' असल्याने सहकारात व्यक्तिला म्हणजेच सभादाला महत्व आहे. त्यानुसार राज्याचा सहकार कायदादेखील सभासद केंद्रितच आहे. सहकारात एक सभासद एक मत ही संकल्पना असल्याने सहकारी संस्थांना भांडवल उभारणीमध्ये अडचणी येतात. मुक्त अर्थव्यवस्थेत भांडवलाला महत्त्व असल्याने प्राधान्य समभाग, कर्जरोखे, रिडीमेबल/नॉन रिडीमेबल समभाग या भांडवली सज्ञांना सहकार कायद्यात स्थान मिळणे आवश्यक होते. नागरी सहकारी बँकांना रिझर्व्ह बँकेने भांडवली बाजारातील पद्धतीने भांडवल वाढविण्यास परवानगीही दिली होती, परंतु त्या अनुषंगाने कायद्यात बदल न झाल्याने नागरी सहकारी बँका भांडवल वाढविण्यात अपयशी ठरल्या. गुजराथमध्ये धवलक्रांतीचे जनक श्री. कुरियन यांनी जादा दूध घालणाऱ्यांना दोन मतांचा अधिकार देत व्यवसाय वृद्धीला चालना दिली.

आवश्यक बंधने या नावाखाली सन २००३ नंतर एकाही सहकारी बँकेस परवाना न देण्याची कृती ही त्याचाच एक भाग आहे. परंतु केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांच्या पुढाकाराने नुकतेच सहकारी बँकांना शाखाविस्तारास रिझर्व्ह बँकेने परवानगी दिली आहे. यापुढे नवीन बँकांनाही परवाना मिळेल, अशी आशा करण्यास हरकत नाही. सर्वात महत्त्वाचे म्हणजे घटनेने सहकारी संस्थांना 'स्वायत्तता' प्रदान केलेली असताना आदर्श उपविधीच्या नावाखाली त्यांना सतत सहकार खात्याच्या जाचक अटींना सामोरे जावे लागते ही वस्तुस्थिती आहे. ९७ व्या घटना दुरुस्तीमध्ये क्रियाशील सदस्याची तरतूद करताना सहकारी संस्थेतील सभासदाचा नुसता आर्थिक नव्हे तर व्यवसायातील सहभागी अधोरेखित केला आहे. त्यामुळे सभासदांचा सहभाग नुसता भांडवल गुंतवणूकीपुरताच मर्यादित न राहता व्यवसायातदेखील त्या दृष्टीने सहभाग असणे आवश्यक ठरला आहे.

**८) सहकार क्षेत्रापुढील आव्हानांचा यशस्वी मुकाबला करण्यासाठी आवश्यकता इच्छाशक्तीची...**

गेल्या ७५ वर्षात सहकार क्षेत्रासमोरील बरेच बोलले गेले व लिहिली गेले. परंतु या आव्हानाचा यशस्वी मुकाबला करण्यासाठी शास्त्रोक्त व नियोजित असा आराखडा तयार करण्यात सर्वानाच अपयश आले आहे. सहकाराचा हा रथ शासनाच्या सहकार विभगाच्या मदतीशिवाय आपण ओढू शकणार नाही. यासाठी शासनाचा सहकार विभाग व सहकार क्षेत्राने एकाच हेतूने कार्यान्वित होणे आवश्यक आहे. सहकार क्षेत्र व सहकार विभाग या दोहोंचे प्रयत्न हे एकमेकांना पूरक असावे. या प्रयत्नात सुसंवाद असणे आवश्यक आहे. सहकार विभाग हा केवळ तक्रारी करण्याचे ठिकाण न समजता तेथील यंत्रणेशी सहकार क्षेत्रज्ञने सतत संवाद साधणे अपेक्षित आहे. तसेच सहकार खात्याने नेहमीच नियंत्रकाच्या भूमिकेत न राहता सहकार क्षेत्राचा मित्र, तत्वज्ञानी व मार्गदर्शक या भूमिकेतही शिरले पाहिजे.

सक्षम आर्थिक समाजाच्या निर्मितीमध्ये सहकाराचे महत्त्व अनन्य साधारण असताना मुक्त अर्थव्यवस्थेतील खाजगी कंपन्यांच्या जागतिक मितीमुळे सहकार क्षेत्राला न्यूनगंडाने ग्रासले आहे. न्यूनगंड बाजूला सारण्यासाठी सहकाराच्या बलस्थानाच्या प्रसिद्धीबरोबरच स्पर्धकांच्या जुगलबंदीची माहिती देणेदेखील आवाश्यक आहे. त्यामुळे प्रशिक्षणाबरोबरच 'प्रचार प्रसिद्धी' या तत्वाचा देखील अंगीकार सहकार क्षेत्राने केला पाहिजे. तसेच अर्थव्यवस्था व सुदृढ समाज निर्मितीमधील आपली उपयोगिता व विश्वासार्हता सिद्ध करण्यासाठी या क्षेत्राला आत्मचिंतनाबरोबरच व्यावसायिकतेच्या मुद्द्यांवरदेखील कठोर परिश्रम घ्यावे लागतील. राजकीय व्यक्तीबरोबर परंतु राजकारण विरहित व भ्रष्टाचार विरहित सहकार हेच पुढील काळात या क्षेत्राचे ध्येय व उद्दिष्ट असले पाहिजे. अलिकडील न्यायालयीन निर्णयांच्या पार्श्वभूमीवर सहकारी संस्थांचे संचालक हे विश्वस्त असतात, या नैतिक घोषवाक्याबरोबर ते जबाबदार विश्वस्त असतात, या कायदेशीर घोषवाक्याचा समावेश सहकारामध्ये करणे आवश्यक आहे.

स्व. वैकुंठभाई मेहता, स्व. धनंजयराव गाडगीळ यांनी परिश्रमपूर्वक रुजवण केलेल्या सहकाराच्या स्थाने राज्याच्या निर्मितीनंतर ऊस मळे, कपाशीचे क्षेत्र, बँका, पतपेढ्या, गृहनिर्माण इत्यादी क्षेत्रात घोडदौड केलेली असली तरी या रथाने आधुनिकतेच्या सर्वच क्षेत्रात संख्यात्मक नसली तरी गुणात्मक घोडदौड करणे आवश्यक आहे. सहकारी तत्वावरील सामुदायिक शेतीबरोबरच सहकारी तत्त्वांवर केशकर्तनालये सुरु झाली तर खरोखरच सामाजिक परिवर्तनाचे श्रेय सहकाराला जाईल. सहकार हे लोक जीवनाचे अंग झाले पाहिजे. यासाठी आवश्यक त्या सर्व गोष्टी करण्याची तयारी हीच सहकाराला संजीवनी ठरेल. त्यासाठी सहकार समर्पित जीवनाची शपथ घेण्याचे आवाहन मी सर्वांना करु इच्छितो.


जय हिंद - जय महाराष्ट्र जय सहकार

**- विद्याधर अनास्कर,**

प्रशासक महाराष्ट्र राज्य, सहकारी बँक लि. मुंबई

*****

# कार्यकर्ता, कार्यालय आणि आधुनिक व्यवस्थापन



**सतीश गंधे**

**❊ कार्यकर्ता –** फार वर्षापूर्वी एक बोधवचन वाचले होते. ते वाचून त्यावेळी मी अंतर्मुख झालो होतो. ते बोधवचन असे आहे – 'संस्थेचे अस्तित्व आहे, तोवर संस्था कोणतीही असो, सहकारी, सरकारी, खाजगी वा सेवाभावी. संस्थेत ठराविक तास काम करणे हा कायदा झाला, पण कामात झोकून देणे ही नैतिकता झाली.'

मी पगार घेतो म्हणून काम करतो हा नियम झाला. मी तिचा घटक आहे म्हणून काम करतो ही झाली आपुलकी.

संस्थेच्या अस्तित्वाची, सुरक्षिततेची व प्रतिष्ठेची वाजवी काळजी घेण्याचे दायित्व मला पार पाडावयाचे आहे, ही सद्भावना आहे. तसे अविरतपणे करणे हे व्रत झाले. जोपर्यंत संस्थेचे अस्तित्त्व आहे, तोवर माझे अस्तित्त्व आहे. माझी प्रतिष्ठा आहे. सामाजिक ऋण फेडण्याच्या भावनेने कामात स्वतःला झोकून देणे व माझ्यासारख्या अनेक व्यक्ती तयार करणे ही झाली सेवा.

नैतिकता, आपुलकी, व्रत आणि सेवा हे तर कोणत्याही कार्याचे स्तंभ आहेत. आपण असे स्तंभ होऊया!त्यातच संस्थेचा व स्वतःचा उद्धार आहे.

मी विचार करतो की, नागरी सहकारी बँका आणि पतसंस्था या समाजाला बँकिंग सेवा देणाऱ्या संस्था आहेत आणि शिपायापासून मुख्य कार्यकारी अधिकारी आणि माननीय संचालकांपर्यंत सर्वजण या संस्थेत सेवक म्हणून कार्यरत असतात. या सर्वांना वरील बोधवचन नक्कीच मार्गदर्शक आणि प्रेरणादायी ठरावे.

आपण सेवक आहोत, पण कार्यकर्ता आहोत का? राजकीय कार्यकर्ता होणं कदाचित सोपं असावं, पण सामाजिक परंतु अराजकीय कार्यकर्ता होणं, मला वाटतं, थोड कष्टसाध्य आहे. बँकिंग हे रूढार्थाने सामाजिक काम नक्कीच नाही, परंतु ते समाजकल्याणाचे भरीव सेवाकार्य आहे. हे तर आपण सर्वजण मान्य करू. तर या आपल्या सेवाकार्यात सातत्याने आपला सेवाभावच असतो का? याचा आपण विचार करावा असं मला वाटतं.

कार्य करतो तो कार्यकर्ता. तो कर्ता आहेच. पण तोच करवितापण आहे. हे कर्ताकरवितेपण अंगी येण्यासाठी ज्येष्ठ सामाजिक नेते कै. रामभाऊ म्हाळगी यांनी एकदा कार्यकर्त्यांच्या बैठकीत सांगितले होते की, कार्यकर्त्याच्या डोक्यावर बर्फ, जिभेवर साखर आणि पायावर चक्र हवे, तर तो खरा कार्यकर्ता. किती सार्वकालिक सत्य वचन आहे हे. आपल्या सहकारी संस्थांच्या सेवक – कार्यकर्त्याला पण हे वचन तंतोतंत लागू आहे. आपण हे प्रयत्नपूर्वक साध्य केले, तर आपल्या या सेवाकार्याला सार्वत्रिक समाधानाचा सुगंध नक्कीच येईल.

मला वाटतं आपण एकदा बघायला हवं की, आपला हा सेवक कार्यकर्ता संस्थेत असताना सदैव प्रसन्न, उत्साही आणि हसतमुख असतो का? नसेल तर त्याची कारणे दूर करून त्याला तसे बनविणे हे आपल्या व्यवसाय वृद्धीचे मुख्य गमक आहे. चेहऱ्यावरील एक स्मितरेषा आपल्या अनेक गोष्टी सुकर आणि सहजसाध्य करते. - Small smiling curve on the face makes lot of things straight.

आपल्या सेवक-कार्यकर्त्याच्या अंगी व्यवसायनिष्ठता (professionalism) हवी. त्यासाठी आवश्यक आहे ते व्यवसायाचे सखोल ज्ञान आणि त्या ज्ञानाचा सदुपयोग करण्याचे व्यवसायिक कौशल्य. या व्यवसायनिष्ठतेला माणुसकीचा एक स्पर्श दिलेला असेल, तर सोने पे सुहागा !

आपण गेली कित्येक दशके सहकारी संस्थांच्या समस्या, त्यावरील उपाय, त्यांच्यापुढील आव्हाने यावर विविध माध्यमातून सतत चर्चा करतो आहोत. ते आवश्यकच आहे. पण केव्हातरी वरील बोधवचनातील सर्व मुद्द्यांचा विचार केला, तर असे लक्षात येईल की, कदाचित वरील सर्व किंवा काही गोष्टींचा संस्थेतील अभाव हे देखील आपल्या काही समस्यांचे मूळ असू शकेल. मग त्यावर उपाययोजना केली, तर संस्थेच्या बऱ्याच समस्या सुटायला निश्चित मदत होईल असं वाटतं. आपल्या समस्या आपणच सोडवायला हव्यात, त्यासाठी नेहमीच शासनावर अवलंबून राहणं योग्य ठरणार नाही. पण त्यासाठी संस्था आणि त्यात कार्यरत सेवक – कार्यकर्ते समर्थ होणे आवश्यक आहे.

बँकेत सेवक-कार्यकर्त्याची एकनिष्ठ व समर्थ टीम उभी राहिली व त्यांनी परिणामकारक आणि प्रभावी कार्य केले, तर संस्थेकडे कोणाचीही वक्रदृष्टी पडण्याची सुतराम शक्यता नाही. असे प्रयत्न सर्वदूर झाले, तर सहकार क्षेत्राला नक्कीच उज्ज्वल भवितव्य आहे हे निर्विवाद सत्य आहे.

**❊ कार्यालय संकल्पना –** कार्याचे आलय (घर) म्हणजे कार्यालय. येथे सेवक कार्यकर्ता कार्यरत असतो. हे संपर्क करण्याचे, माहिती मिळण्याचे व प्रभावी संप्रेषणाचे एक विश्वासार्ह केंद्र असते. येथे कार्य होत आहे असे भेटकर्त्याला वाटायला हवे व या कार्यालयाने येणाऱ्याला ओढ लावायला हवी. कोणालाही पुन्हा पुन्हा यावेसे वाटले, तर ते कार्यालय. आल्याबद्दल येणाऱ्याला पश्चाताप वाटला, तर ते केवळ निर्जिव ऑफिस. आपले कार्यालय कसे असावे या संबधीची संकल्पना स्वत:साठी स्पष्ट असावी. तसेच ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्याचे प्रामाणिक प्रयत्नही हवेत. संस्थेचे कार्य वाढविणारे ते कार्यालय. अन्यथा पत्र मिळण्याचा केवळ एक पत्ता.

**❊ कार्यालयाची जागा –** आपले कार्यालय स्वच्छ, नीटनेटके व टापटीपीने ठेवलेले असायला हवे. तसा व्यवस्थापकांचा आग्रह असायला हवा. जागा लहान की मोठी? फर्निचर कमी की जास्त? हे प्रश्नच असायला नको. जे उपलब्ध आहे, तेच सुव्यवस्थित व प्रसन्न वाटेल असे असायला हवे. कार्यालयातील देवांच्या तसविरी व बोर्डवरील सुकलेले हार, निर्माल्य समजून दुसऱ्या दिवशी दूर करावे असे आपल्याला का वाटत नाही? विचार करावा.

**❊ वक्तशीरपणा –** कार्यालयाचे कामकाज सुरु होण्याची वेळ पाळली गेली पाहिजे असा अलिखित संकेत असावा. येणाऱ्याला वाट पाहावी लागणे टाळायला हवे. आता विस्मरणात गेलेल्या गोईपोरिया समितीच्या ग्राहक सेवेच्या शिफारसी आजही लागू ठेवल्या पाहिजेत. त्यातील एक शिफारस होती की, सर्व सेवकांनी कामकाज सुरु होण्याच्या किमान १५ मिनिटे कामाच्या जागी उपस्थित व्हावे. याचा अर्थ असा की, समजा कामकाज सुरु होण्याची वेळ सकाळी १० असेल, तर सर्व पूर्वतयारीनिशी बरोबर त्यावेळी पहिले पेमेंट / रिसीट व्हायला हवी. याला वक्तशीरपणा म्हणायचे. या स्पर्धात्मक युगात वक्तशीरपणा ही आधुनिकतेची निकड आहे हे लक्षात घ्यावे. कामाच्या जागी रोज एका विशिष्ट वेळी सर्वांनी एक सामुहिक प्रार्थना म्हणण्याची प्रथा सुरु करावी. त्यामुळे दिवसाची सुरुवात चैतन्यदायक व प्रसन्न होते. सर्व सेवकांचा एकसमान गणवेष व ओळखपत्र, कार्यालयास अनुकूल केशभूषा, वेशभूषा, पद्वेष या गोष्टी संस्थेत एक चांगली कार्यसंस्कृती रुजविण्यास सहाय्यभूत ठरतात.

**❊ सेवक –** बँकिंग हा एक सेवा उद्योग (Service Industry) असल्याने यात कार्यरत कर्मचारी हा सेवा देणारा सेवक आहे. त्याची कार्यकर्ता ही भूमिका असावी. या सेवक – कार्यकर्त्याकडे उत्तम विपणन आणि विक्रय कौशल्य हवे, तरच तो संस्थेचा व्यवसाय सातत्याने वाढवू शकेल. त्याचा

दृष्टीकोन सकारात्मक असला, तर तो ग्राहकाला संतुष्ट करू शकेल. आपल्या संकल्पित कार्याचे आपण वाहक व माध्यम आहोत याचा विसर पडू नये. सेवक केवळ efficient (knowledge + skill) असून चालणार नाही, तर तो effective (knowledge + skill + strong will to work) असला पाहिजे. तरच तो आपण केलेल्या कामाचा हमखास परिणाम (result) देऊ शकेल. त्यासाठी त्याची काम करण्याची इच्छा प्रबळ करावी लागेल. आधुनिकता केवळ संसाधनावर अवलंबून नसून, ती सेवकांच्या इच्छाशक्ती व कार्यशक्तीवर अवलंबून असते. संस्थेच्या प्रतिमा निर्माणाची जबाबदारी आपल्यावरच आहे हे लक्षात घेतले म्हणजे सेवकाला आपल्या उत्तरदायित्वाचा बोधही आपोआप होतो.

❋ **पत्रव्यवहार –** आताच्या आधुनिक युगात हाताने पत्र लिहिणे हे कालबाह्य झाले आहे. संगणकावर किंवा ई-मेलद्वारे लिहिलेले पत्र हा एक शुष्क उपचार किंवा व्यवहार नाही. त्या पत्राला एक व्यक्तित्व आहे, जे त्याला पत्रलेखकाकडून प्राप्त झालेले असते. पत्रलेखकाचे व्यक्तित्व वहन करणारे ते एक बोलके आणि जिवंत साधन आहे हे लक्षात घेऊन पत्रलेखन व्हावे. पत्रलेखन ही एक कला आहे व ती सरावानेच साध्य होते. पत्रामध्ये एक मुद्दा- एक परिच्छेद हे सूत्र वापरले आणि पाल्हाळ न लावलेले मुद्देसूद पत्र असेल, तर पत्राची वाचनीयता वाढते. पत्र आपला नेमका संदेश वहन करते. तो संदेश नंतर रद्द करता येत नाही, त्यामुळे योग्य शब्द व वाक्यांची निवड करण्याची जागरूकता ठेवली, तर अशा पत्राने कार्यहानी होत नाही, उलट कार्य होण्याची खात्री असते.

❋ **फायलिंग –** प्रत्येक व्यवसायिक यशाच्या मागे एक स्वयंसिद्ध कार्यपद्धती असते. ती अस्तित्वात नसणे हे व्यावसायिक अपयशाचे एक महत्वाचे कारण असू शकते. आता paperless office ची संकल्पना चांगलीच मूळ धरू लागली आहे. तरी सध्या आपण less paper office च्या फेजमध्ये आहोत. त्यामुळे अजूनही फायलिंगची जरुरी आहेच. फायलिंगची पण एक कार्यपद्धती जाणीवपूर्वक विकसित करायला हवी. संबधित व्यक्ती उपस्थित असो किंवा नसो, हवा असलेला कागद विशिष्ठ फाईलमध्ये सहजपणे काही मिनिटात सापडायला हवा. प्रलंबित प्रकरणे / कागद यांची पण वेगळी फाईल हवी. काऊटर / टेबलाचे खण कागदांच्या अडगळीसाठी नाहीत, तर रोजच्या गोष्टी नीटपणे ठेवण्यासाठी असतात. काम व कामाचे कागद जागेवर असूनसुद्धा, केवळ संबधित माहितगार व्यक्ती कामावर हजर नाही, म्हणून भेटकर्त्याला नंतर या सांगायला लागणे ही कार्यालयाची केवळ नामुष्की आहे, हे टाळायला हवे. संगणकावर तयार होणारी अगणित कागदपत्रे संदर्भासाठी पुन्हा पाहण्याची वेळ आली तर ती शोधण्यासाठी किती वेळ लागतो ते तपासायला हवे. हा वेळ किमान असावा यासाठीदेखील संगणकावर एखादी प्रणाली विकसित करणे गरजेचे आहे. प्रत्येक टंकलिखित कागदावर कागदाच्या तळाशी त्याच्या फाईलचा संगणकावरील फाईलपाथ प्रिंट केला, तर जरूर असेल त्यावेळी पुन्हा तो कागद काही मिनिटात संदर्भासाठी सापडू शकेल व आपला वेळ वाचेल, जो मौल्यवान आहे.

❋ **टेलिफोन –** आता landline phone चा वापर फारच कमी होत चालला आहे. आता प्रत्येकाकडे स्मार्ट फोन असतातच. त्याचा उपयोग कार्यालयीन काम आणि खाजगी काम यासाठी कसा व किती करायचा याच तारतम्य व अनुशासन असायलाच हवे. त्यात स्मार्टपणा हवा. फोनवरील संभाषण हा एक प्रशिक्षणाचा विषय करून, स्मार्ट फोनचा वापर स्मार्टपणे कसा करावा ,हे पण आता शिकवणे आवश्यक झाले आहे. स्मार्ट फोनचा वापर निदान कार्यालय वेळेत तरी मनोरंजनासाठी होणार नाही, हे प्रत्येकाने ठरवले पाहिजे.

❋ **वाहन –** कार्यालयाच्या मालकीचे वाहन ही एक सार्वजनिक मालमत्ता असते, पण त्याची देखभाल मात्र स्वतःच्या वाहनाची करतो, तशी करायला हवी. या वाहनाचा वापर काटकसरीने व गरजेवर आधारित असावा. आजकाल वाहन व्यवस्था outsource केली जाते. आवश्यक असेल, तर त्याचाही विचार केला जाऊ शकतो.

❋ **अद्यावत तंत्रज्ञानाचा वापर –** आजच्या बँकिंगमध्ये बाजारात उपलब्ध असलेले सर्वोत्तम संगणकीकरण, डिजिटल व्यवहार, डेटा विज्ञान, डेटा विश्लेषण आणि कृत्रिम बुद्धीमत्तेचा वापर, इंटरनेटचा वाढता वापर इत्यादी अनेक गोष्टी आल्या आहेत किंवा लवकरच येऊ घातल्या आहेत. या सर्वांचा सहर्ष स्वीकार करून त्याचा व्यवसाय वाढीसाठी उपयोग करावा.

यासाठी आमचे मनुष्यबळ तंत्रज्ञान दृष्टीने अत्यंत प्रशिक्षित हवे. त्यासाठी सुयोग्य नियोजन, उपलब्ध संसाधनाच्या आधारे निधीचे प्रावधान व सातत्याने यशस्वी प्रयत्न ही आजच्या बदलत्या काळाची नितांत गरज आहे.

❋ **दैनंदिन कोष व्यवस्थापन –** कार्यालयासाठी अनेक नैमित्तिक व दैनंदिन खर्च करावे लागतात. असा खर्च करताना आवश्यक तिथे लागेल तो खर्च करणे आणि जिथे आवश्यक नाही तिथे तो खर्च कठोरपणे होऊ न देणे हे यशस्वी आधुनिक कोष व्यवस्थापनाचे सर्वसिद्ध तंत्र आहे. कंजुषी आणि उधळेपणा दोन्ही नको, रास्त कारण-योग्य खर्च हे सूत्र ठेवले, तर कोष व्यवस्थापन योग्य झाले असे म्हणता येईल. दैनंदिन व नैमित्तिक खर्चाच्या अधिकारांचे विकेंद्रीकरण वेळेत बचत आणि सेवकांमध्ये जबाबदारीची जाणीव निर्माण करेल.

❋ **स्वागत –** आपल्या कार्यालयात येणारी व्यक्ति ही केवळ वेळ घालवायला आलेला बिनकामाचा माणूस नाही, हे नेहमी लक्षात ठेवायला हवे. ती व्यक्ति कार्यालयात येताक्षणी शक्य तितक्या लवकर ती व्यक्ति आल्याची दखल घ्यावी व त्या व्यक्तीचे अकृत्रिमपणे हसून स्वागत करावे. त्यामुळे त्या व्यक्तीचा आत्मसन्मान सुखावतो व ती व्यक्ति आपल्याला चांगले सहकार्य करते. तुम्ही कितीही कामात असलात तरी, त्या व्यक्तीचे पण काही काम आहे, याची सतत जाणीव ठेवा. भेटकर्त्याचे नेमके काय काम आहे, हे सौजन्याने समजून घ्या व ते काम कोण, केंव्हा आणि कसे करणार आहे. त्यासाठी किती वेळ लागू शकेल हे नीट समजावून सांगा. महिला आणि ज्येष्ठ नागरिक यांना विशेष मदत करा. खोटे आश्वासन देऊ नका. काम होण्यासारखे नसेल, तर कारणासह स्पष्टीकरण द्या. त्यासाठी दिलगिरीही व्यक्त करा. कार्यालयात ग्राहक सेवेसाठी शक्य ते सर्व शिष्टाचार पाळावे. पुरेशी आसन व्यवस्था, पेय जल, प्रसाधन गृह, फोन चार्जिंग सोय या काही मुलभूत सुविधा तर हव्याच. आपला ग्राहक देव असतो, राजा असतो या गोष्टी सुभाषितापुरत्या न राहता, त्या प्रत्यक्ष आपल्या आचरणातून प्रकट व्हाव्यात. भेटकर्त्याला पुन्हा पुन्हा आनंदाने यावेसे वाटेल असा सुखद अनुभव त्याला देण्याचा स्वाभाविक प्रयत्न करावा. आधुनिक व्यवस्थापनाची ही मुलभूत गरज आहे. यातून जे बिनखर्चिक मार्केटिंग सहज साध्य होते. त्याला आजतरी पर्याय नाही.

❋ **आधुनिक व्यवस्थापन –** व्यवस्थापन ही गतिमान (Dynamic) संकल्पना आहे. व्यवस्थापन हे सतत परिवर्तनशीलच हवे. आजच्या काळाला अनुसरून आवश्यक ते सर्व बदल आनंदाने स्वीकारून संस्थेला सातत्याने पुढे नेणारे व्यवस्थापन हेच आधुनिक व्यवस्थापन होय.

आधुनिक व्यवस्थापन केवळ आधुनिक साधनावर अवलंबून नसून, ते संस्थेची प्रगतीशील धोरणे व सक्षम व्यवस्थापकावर अवलंबून आहे. व्यवस्थापकाचा दृष्टीकोन उदार, प्रगतीशील व अत्याधुनिक हवा. सध्या आधुनिक तंत्रज्ञानाची व संसाधनाची दोन साधने कमी असली, तरी विशेष कार्यहानी होत नाही. उदास मनाचा, बंदिस्त विचारांचा आणि चौकोनी चेहऱ्याचा व्यवस्थापक संस्थेची जी कार्यहानी करतो, तेवढी कार्यहानी आपले विरोधक देखील करत नाहीत.

आधुनिक व्यवस्थापनाचे नियम हवेत. हे नियम पाळले जाण्यासाठी अनुशासन हवे. नियम पूर्णपणे मोडणाऱ्याला प्रसंगी शासन देखील हवे.

मागील पानावरून...

## कार्यकर्ता, कार्यालय आणि आधुनिक व्यवस्थापन

तथापि या नियमामध्ये गरजवंताचे काम व्हावे यासाठी व्यावहारिक दृष्टीने आवश्यक असणारी एक मार्जिनल लवचिकतादेखील हवी. व्यवस्थापनात सातत्य हवे. वाजवी आग्रहही हवा. पण हे सर्व माणसासाठी आहे याची दृष्टी हरवता कामा नये. तोच हरवणार किंवा दुरावणार नाही याची काळजी घ्यायला हवी. संस्थेच्या सर्व व्यवहारात एक पारिवारिक आपलेपणा, ओलावा व माणुसकीचा स्पर्श हवा. आधुनिक व्यवस्थापनाचे व व्यावसायिक यशाचे हेच खरे मर्म आहे.

✲ **कार्यकर्त्यातून नेतृत्वाचा उदय** – आपल्या संस्थांच्या सेवक – कार्यकर्त्यातूनच उद्यासाठी संस्थेला आवश्यक असणाऱ्या नेतृत्वाचा उदय होणे अपेक्षित आहे. असे नेतृत्व आपल्या संस्थेतच तयार झाले, तर आपल्याला ते बाहेरून आयात करण्याची वेळ येणार नाही. पण त्यासाठी संस्था चालकांना संस्थेतील सुयोग्य सेवक हेरून, त्यांच्यामध्ये आवश्यक गुण संवर्धन होईल यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागतील. त्यांचा संस्थेतील करियरपाथ त्यांना स्पष्टपणे समजेल अशी व्यवस्था करायला हवी. संस्थेच्या माध्यमातून सेवक समाजासाठी करत असलेले काम हीच आजच्या काळात एक समाज व राष्ट्रसेवा आहे हे त्याच्या मनावर ठसविणे आवश्यक आहे.

सेवकांना आजच्या कार्यकर्त्यासाठी आणि पर्यायाने उद्याच्या नेतृत्वासाठी आवश्यक असणारे गुण मला पुढील एका गीतात आढळून आले. मला गीतकार माहिती नाही. पण हे गीत आपल्या सर्वांना मार्गदर्शक ठरेल असे मला वाटते.

सभी युवाओंका यही एक सपना
बने कार्यकर्ता, बढे देश अपना.. ।।धृ.।।
कोई शामवर्णी, कोई गौरवर्णी
कोई शांतभावी, कोई क्रोधकर्णी
सभी मित्र बनकर, करे काम मिलकर
कोई हो नवागत, तो कोई पुराना ... १
न पुर्वाग्रही हो, न हो आत्मभावी
हृदयमन खुला हो, विवेकी स्वभावी
विचारोंमे स्थिरता, वचनमे मधुरता
परायो व अपनोकी, निंदासे बचना ...२
उमंगी रहे हम, उमंगी हो साथी
गती भी रहे, आपसी मेल खाती
अकेले ना हो हम यही ध्यान हरदम
कदम से कदमको मिलाकरही चलना ...३
हो चिंतन हमारा, सदा दूरगामी
मगर कार्यशैली हो, एक एक कदमी
सभी काम भारी हो परिणामकारी
सफलता मिलेगी, यही भाव भरना... ४
वाचन मनन और, अनुभव कथनसे
रखे अद्यतन ज्ञान, बौधिक यतनसे
सदा स्वस्थ हो हम, रहे व्यस्त भी हम
समयदान क्षमता, बढातेही रहना... ५

**– सतीश गंधे, पुणे मो. : ९९७०६००६४३**
ई मेल : satishgandhe369gmail.com ✲✲✲


# सहकार भारती सहकार प्रशिक्षण सहकारी संस्था मर्या; कराड
## (शासन मान्यताप्राप्त शिखर प्रशिक्षण संस्था)

मान्यताप्राप्त शिखर प्रशिक्षण संस्था म्हणून महाराष्ट्र शासनाने आमच्या प्रशिक्षण संस्थेचे नाव अधिसूचित केले आहे. अधिसूचित संस्थेकडून सहकारी संस्थांनी प्रशिक्षण घेणे अनिवार्य आहे. नागरी सहकारी बँका, सहकारी पतसंस्था, गृहनिर्माण संस्था इ. सर्व संस्थाकरिता संचालक, पदाधिकारी, कर्मचारी व सभासदांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम घेतले जातात.

***नागरी सहकारी बँकांसाठी***

आमची संस्था बँकेच्या गरजेप्रमाणे दर्जेदार प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन बँकेच्या ठिकाणी जाऊन करते. अन्य प्रशिक्षण कार्यक्रमांबरोबरच नवीन भरती, स्टाफसाठी प्रारंभिक प्रशिक्षण कार्यक्रम, पदोन्नतीपूर्व प्रशिक्षण तसेच **पदोन्नती परीक्षांचेही वाजवी दरात आयोजन करते.** तरी याचा लाभ सहकारी बँकांनी घ्यावा. वरील सेवांसाठी कृपया संपर्क साधावा.

**श्री. माधवेंद्र कोरडे** - (फक्त मेसेजसाठी) **९८५०५७१४०५**
**श्री. श्रीकांत पटवर्धन** (प्रदेश कार्यालय प्रमुख) **९२२५८२५३९९**

सहकार भारती पुणे कार्यालय – ऑफिस क्र. १०५, सांकला आर्केड, गांधी खादी भांडारच्यावर, कर्वे रोड, एरंडवणा, पुणे– ४११ ००४ ई–मेल : sahakarbharati1416@gmail.com

# भारताच्या अर्थव्यवस्थेत सहकारी बँकांची भूमिका

सहकार आम्हा भारतीयांचा स्थायी भाव आहे. अर्थपूर्ण आणि समृद्ध जीवन जगण्याचा तो एक मार्ग आहे. सहकारी तत्त्वावर अनेक कार्ये आमच्याकडे होत आली आहेत. पुढे सहकाराला आकार आला. त्याचे कायदे आणि नियम तयार झाले. याच सहकार तत्त्वातूनच 'सहकारी बँक' ही संकल्पना पुढे आली. सहकारी बँकांची सुरुवात २०व्या शतकाच्या सुरूवातीला झाली. सहकारी बँक ही अशी आर्थिक संस्था असते जिथे सभासद मालक आणि ग्राहकही असतात. सहकारी बँका या भारतीय रिझर्व्ह बँकेद्वारा नियंत्रित केल्या जातात आणि राज्य सहकारी संस्था कायद्याअंतर्गत नोंदणीकृत असतात. भारतातील सहकारी बँका, बँकिंग नियमन कायदा १९४९ आणि बँकिंग कायदे (सहकारी संस्था) अधिनियमन १९५५ नुसार नियंत्रित केल्या जातात.



नितीन खर्चे

सहकारी बँका सभासदांच्या मालकीच्या असल्याने, संचालक मंडळाची निवड ही लोकशाही पद्धतीने केली जाते. संचालक मंडळ बँकेवर नियंत्रण ठेवण्यासाठी जबाबदार असते. भारतातील सहकारी बँका दोन प्रकारात प्रामुख्याने विभागल्या जातात. एक म्हणजे नागरी सहकारी बँक आणि दुसरा म्हणजे ग्रामीण सहकारी बँक. सहकारी चळवळ आता बँकिंग क्षेत्रातही पसरली आणि स्थिरावली आहे. १९५० च्या दशकात सहकारी बँकांनी ग्रामीण आणि शहरी अशा दोन्ही भागात लोकांपर्यंत आपले जाळे पसरविले आहे. सहकारी बँका भारतीय समाजाच्या विविध क्षेत्रांसाठी वरदान ठरल्या आहेत. भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासातही महत्वाची भूमिका बजावत आहेत.

सक्षम बँकींग प्रणालीशिवाय कोणत्याही देशाची अर्थव्यवस्था सुदृढ असू शकत नाही. सहकारी बँक ही अशी एक वित्तीय संस्था आहे की, जी ठेवी स्वीकारते आणि कर्ज वितरित करते, शिवाय सहकारी बँक ही कायद्याच्या आणि नियमांच्या चौकटीत काम करीत असल्याने एक सक्षम बँकिंग प्रणाली म्हणून कार्य करीत असते.



भारताच्या अर्थव्यवस्थेमध्ये सहकारी बँकांच्या भूमिकेचे खालीलप्रमाणे योगदान सांगता येईल.

**१) भांडवल निर्मितीची कमतरता दूर करते –**

कोणत्याही विकसनशील अर्थव्यवस्थेमध्ये भांडवलाची कमतरता भासत असते. ही कमतरता सहकारी बँका दूर करू शकतात. कोणताही व्यवसाय, उद्योग व प्रकल्प सुरू करायचा असेल तर भांडवल ही अत्यावश्यक बाब आहे. सहकारी बँका ठेवींच्या रूपात आणि भाग भांडवलाच्या रूपात जमा झालेला निधी हा भांडवल निर्मितीसाठी उपयोगात आणीत असतात. अशावेळी सहकारी बँका ग्राहकांना ठेवींवर व्याज देऊन अर्थव्यवस्थेतील सुप्त पैशांचे सक्रिय भांडवलात रूपांतर करीत असतात. यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेला एका अर्थाने हातभार लागत असतो.

**२) उद्योगांना आर्थिक सहाय्य होते –**

देशात गृहउद्योग, लघुउद्योग, कुटीरउद्योग, मध्यम उद्योग आणि अवजड उद्योग इत्यादी प्रकारांना सहकारी बँकांनी दिलेली मदत ही खूपच उपयुक्त ठरते. महिला बचत गट किंवा अनौपचारिक व्यवसायासाठी सहकारी बँकांनी दिलेली मदत ही देशाची अर्थव्यवस्था खेळती ठेवते. देशात जर आर्थिक मंदी आली तर त्यातून बाहेर पडल्यास असे अर्थसहाय्य उपयुक्त ठरते. याशिवाय विविध आर्थिक विकास महामंडळाच्या संदर्भातील अर्थसहाय्यतासुद्धा सहकारी बँका करीत असतात.

**३) लोकांच्या बचतीच्या सवयींना चालना मिळते –**

भारतीय जनमानसाची प्रवृत्ती ही उधळपट्टीपेक्षा बचतीकडे अधिक असते. कोणत्याही गोष्टीत बचत करणे हा आम्हा भारतीयांचा स्थायीभाव आहे. हाच भाव पैशांच्या बचतीत परावर्तित करण्यासाठी सहकारी बँका महत्वाच्या ठरू शकतात.

सहकारी बँका किफायतशीर व्याज देऊन जनतेचे पैसे बचत करण्यासाठी आकर्षित करीत असतात. साधारणपणे बँकांमध्ये ज्या ठेवी असतात, त्या मध्यमवर्गीय, सेवानिवृत्त नागरिक, ज्येष्ठ नागरिक आणि सामान्य माणूस यांच्या असतात. भारत सरकारने ऑगस्ट २०१४ मध्ये सुरू केलेली 'प्रधानमंत्री जन धन योजना' ही सामान्य नागरिकांमध्ये बचतीची सवय लागावी यासाठी मैलाचा दगड ठरली आहे. या योजनेचा मुख्य उद्देश बँकिंग, बचत, ठेवी खाते, क्रेडिट, विमा आणि पेंशन यासारख्या वित्तीय सेवांमध्ये सामान्य माणसाचा प्रवेश निश्चित करणे हा आहे. यामुळे भारताच्या अर्थव्यवस्थेला बळकटी आणण्यासाठी हातभार लावला जात आहे यात शंका नाही.

**४) रोजगाराच्या संधी निर्माण करण्यात मदत होते –**

देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये रोजगार निर्मिती हा भाग महत्त्वाचा असतो. जेव्हा सहकारी बँका एखाद्या उद्योगाला वित्तीय पुरवठा करीत असतात. स्टार्टअप्सना कर्ज देतात. सोबतच त्यांचा खर्चाही भागवत असतात. त्यावेळी स्वाभाविकपणे रोजगार निर्मितीला चालना मिळते. सहकारी बँकांमुळे ग्रामीण आणि शहरी भागात रोजगार निर्मिती तर होतेच शिवाय बँकिंग क्षेत्रातही दरवर्षी लाखो नोकऱ्या निर्माण होतातच.

**५) संस्थांना निधी दिला जातो –**

देशात विविध क्षेत्रांत अनेक संस्था कार्यरत असतात. अशा संस्थांना निधी देवून आर्थिक विकासाला चालना मिळते. यासाठी सहकारी संस्था महत्त्वाची भूमिका वठवितात. व्यवसायाला आणि इतर संस्थांना निधी पुरवून, बँका असंख्य नोकऱ्या निर्माण करतात. यामुळे गुंतवणुकीला चालना देण्यासाठी आणि एकूणच आर्थिक वाढीस हातभार लावण्यास मदत होत असते.

सहकाराची पाळेमुळे ग्रामीण आणि शहरी भागात खोलवर रुजली आहेत. सहकारी बँकासुद्धा सहकार तत्त्वाचा आधार घेवून देशाच्या अर्थव्यवस्थेला हातभार लावीत आहेत. 'सहकारातून समृद्धीकडे' हा मार्ग निवडून 'बिना संस्कार, नहीं सहकार' हे तत्त्व अंगीकारून देशात सहकारी बँका यशस्वीपणे वाटचाल करीत आहेत. भारताची ५ ट्रिलियन अर्थव्यवस्था करण्याचे स्वप्न उराशी बाळगून असलेला आपला देश जगातील तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनू पाहत आहे. या उदात्त वाटचालीत सहकारी बँकांची भूमिका महत्त्वाची ठरणार हे निश्चित.

**– डॉ. नितीन खर्चे**
**अध्यक्ष, दि यवतमाळ अर्बन को-ऑप. बँक लि., यवतमाळ**
**मो. ९४२२८ ९२७६८**
E-mail: nitinkharche59gmail.com

*****

# वेगवेगळ्या धान्यापासून इथेनॉल तयार करण्याची प्रक्रिया गतिमान - गडकरी





**पुणे –** वेगवेगळ्या धान्यापासून इथेनॉल तयार करण्याची प्रक्रिया गतिमान होऊ लागल्यामुळे देशातील शेतीच्या विकासाचा दर १८ ते २० टक्क्यांपर्यंत जाईल. अर्थशास्त्र आणि पर्यावरण हे दोन मुद्दे महत्वाचे आहेत. हवेत होणाऱ्या प्रदूषणातील ४० टक्के प्रमाण हे वाहनांमुळे होत असल्याने इंधनाला वेगवेगळे पर्याय निर्माण करण्याची आवश्यकता असल्याचे केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी सांगितले.

ज्येष्ठ उद्योजक व प्राज इंडस्ट्रीज लिमिटेडचे संस्थापक अध्यक्ष डॉ. प्रमोद चौधरी यांच्या ७५व्या वाढदिवसानिमित्त आयोजित 'अमृतयोग' या कार्यक्रमात गडकरी हे व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे बोलत होते. व्यासपीठावर ज्येष्ठ शास्त्रज्ञ पद्मभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर, डॉ. अभय फिरोदिया, पर्सिस्टंटचे अध्यक्ष डॉ. आनंद देशपांडे, प्राज इंडस्ट्रीजचे मुख्य कार्यकारी अधिकारी शिशिर जोशीपुरा, प्राजच्या बायोएनर्जी बिझनेसचे अध्यक्ष अतुल मुळे उपस्थित होते. डॉ. चौधरी यांनी केलेल्या कार्याचा सन्मान म्हणून श्रीनाथ म्हस्कोबा साखर कारखाना यांच्या वतीने डॉ. चौधरी यांना मानपत्र देत त्यांचा सन्मान करण्यात आला.

ऊसापासून इथेनॉल तयार करण्याच्या बरोबरच अन्य अनेक गोष्टींपासून ते तयार करण्याचा प्रयोग राबवण्यात आल्यामुळे अर्थव्यवस्था चांगल्या प्रकारे गतिमान झाली. या सगळ्या कामात चौधरी यांनी केलेलं काम खूपच मोठे आहे. गेल्या वर्षी मक्याला १२०० रुपये क्विंटलचा भाव होता, पण त्याच्यापासून इथेनॉल तयार करण्यास सुरवात झाली. त्यामुळे त्याच्या भावात आता थेट दुपटीने वाढ झाली आहे, असे ते म्हणाले.

इथेनॉलपासून विमानाला लागणारे इंधन तयार करण्यास आता सुरूवात झाली असून येत्या पाच महिन्यांत चारचाकी तयार करणाऱ्या कंपन्या १०० टक्के बायो इथेनॉलवर चालणाऱ्या गाड्या बाजारात आणणार आहेत. त्याबरोबरच दुचाकी तयार करणाऱ्या कंपन्यादेखील त्याच इंधनाचा वापर करून तयार केलेली वाहने बाजारात आणणार आहे. इथेनॉलच्या क्षेत्रात होत असणाऱ्या या बदलाने नजीकच्या काळात ग्रामीण भागातील गावेदेखील शहरांप्रमाणे स्मार्ट होतील. त्यामधून आत्मनिर्भर भारत उभा राहू शकतो. त्यामुळे अर्थव्यवस्थेला बळकटी मिळणे शक्य होईल. जैव इंधनाच्या क्षेत्रातील डॉ. चौधरी यांच्या योगदानामुळे आपल्याला आत्मनिर्भर भारत घडवणे शक्य होणार आहे, असे गडकरी म्हणाले.

तंत्रज्ञान आणि धोरणे एकत्रितपणे राबवली गेली तर त्यामधून चांगल्या प्रकारचा विकास साधणे शक्य होते. आपल्याला नितीन गडकरी यांच्या माध्यमातून चांगले नेतृत्व आणि डॉ. प्रमोद चौधरीच्या माध्यमातून संशोधन करणारा उद्योजक मिळाल्यामुळे या क्षेत्रात आपली प्रगती करणे सहजसाध्य होत असल्याचे डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी सांगितले. जोशीपुरा यांनी प्रास्ताविक, तर अतुल मुळे यांनी आभार मानले. चैतन्य राठी यांनी सूत्रसंचालन केले.

## नियोजित सहकार भवनाची उभारणी लवकरच करण्यात येणार

**पुणे –** नियोजित सहकार भवनाच्या उभारणीच्या कामास नजीकच्या काळात सुरुवात होण्याची दाट शक्यता वर्तविण्यात येत आहे हे नियोजित सहकार भवन शिवाजीनगर परिसरातील साखर संकुल परिसरात उभारण्याची योजना आहे.

राज्यातील शेतकरी आणि सहकार क्षेत्राशी निगडित असणाऱ्या विभागांशी संबंधित असणाऱ्या नागरिकांची कामे शक्य तितक्या लवकर व्हावीत यासाठी भवनाची उभारणी करण्यात येणार आहे. या परिसरात साखर संकुल कार्यरत असून कृषिभवनाचे काम सुरू आहे, या परिसरात सहकार भवन उभे राहिल्यास राज्याच्या विविध भागातून येणाऱ्या शेतकऱ्यांची कामे अधिक वेगाने आणि एकाच परिसरात होण्यास हातभार लागणार आहे.

नियोजित सहकार भवन हे येरवडा परिसरात उभारण्याची योजना होती. मात्र, आता त्यामध्ये बदल करण्यात आला असून साखर संकुल परिसरात उभारण्याची योजना आहे. यासाठी सुमारे २४ हजार ३०३ चौरस मीटर इतके बांधकाम करण्यात येणार आहे. गेली अनेक वर्षे या नियोजित भवनासंदर्भात प्रयत्न सुरू होते. मात्र आता नजीकच्या काळात हा प्रकल्प पूर्ण होण्याच्या मार्गावर आहे.

## बँका आणि उद्योगांनी कामकाजाची व्यापकता वाढविण्याची गरज

**मुंबई –** आगामी २०४७ पर्यंत भारताने विकसित होण्याचे उद्दिष्ट बाळगले असून या स्थितीत नागरिक आणि उद्योगांना मोठ्या प्रमाणावर भांडवलाची गरज भासणार आहे. यासाठी देशातील बँका आणि वित्तीय संस्थांनी आकार वाढविण्याची गरज आहे, असे मत आरबीआयचे डेप्युटी गव्हर्नर एम. राजेश्वर राव यांनी व्यक्त केले आहे.

दक्षिण गोलार्धातील रिझर्व्ह बँकांच्या परिषदेत ते बोलत होते. ते म्हणाले, भारताला विकसित होण्यासाठी अन्य विविध योजना तयार कराव्या लागणार आहेत. देशातील बँकिंग आणि वित्तीय संस्थानी गेल्या २० वर्षात देशात आणि परदेशात अडचणीच्या काळातदेखील चांगली कामगिरी केली आहे. देशातील बँकांचे आरोग्य उत्तम आहे. त्यामुळे भांडवल सुलभता निर्माण होऊन विकास दराला चालना मिळत आहे.

कंपन्यांना लागणारे भांडवल, बँका आणि वित्तीय कंपन्या यांनी उपाययोजना हाती घ्याव्यात. यामध्ये काही प्रमाणात जोखीम असली तरी ती स्विकारण्याची तयारी असायला हवी. यासाठी अनेकविध मार्गांचा अवलंब करण्याची गरज आहे. तसेच नवीन कंपन्यांबरोबर स्पर्धा करण्याची तयारी ठेवली पाहिजे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

# रायगड जिल्हा 'सहकार भारती'ची कार्यकारिणी जाहीर - अध्यक्षपदी प्रा. मेघराज जाधव




**मुरुड** – रायगड जिल्हा सहकार भारतीची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली असून जिल्हाध्यक्षपदी प्रा. मेघराज जाधव (मुरुड) यांची तर जिल्हा महामंत्रीपदी संतोष पोकळे यांची निवड करण्यात आली आहे. तसेच संघटन सहप्रमुखपदी प्रताप मांडवकर तर जिल्हा कार्यकारिणी सदस्य म्हणून रविंद्र कदम यांची निवड करण्यात आली आहे.

सहकार भारती कोकण विभाग आयोजित बैठकीत रायगडसह पालघर ठाणे, रत्नागिरी व सिंधुदुर्ग आदी महानगरांची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. व्यासपीठावर प्रदेश महामंत्री विवेक जुगादे, प्रदेश सहसंघटन प्रमुख प्रवीण बुलाख, ज्येष्ठ कार्यकर्ते विष्णू बोबडे, राजू ठाणगे, कृष्णकांत निमसे, प्रा. वीणा मोकाशी आदी उपस्थित होते.

महामंत्री जुगादे म्हणाले की, सहकार भारती कुठल्याही राजकीय पक्षाचा अजेंडा चालवित नाही तर सहकार क्षेत्राला उभारी देण्यासाठी सहकार भारतीच्या माध्यमातून संस्कारित कार्यकर्त्यांची फळी उभी करून दमदार कार्य उभे करीत आहे. प्रदेश सहसंघटन प्रमुख प्रवीण बुलाख यांनी आगामी काळातील कार्यक्रमांची माहिती सांगितली. सूत्रसंचालन कृष्णकांत निमसे व वीणा मोकाशी यांनी केले, तर प्रास्ताविक कोकण विभाग प्रमुख राजू ठाणगे यांनी केले.

# यवतमाळ सहकार भारती आयोजित स्नेह मेळावा यशस्वी

**यवतमाळ** – सहकार भारती संस्थेच्या वतीने सर्व सहकारी पतसंस्था अध्यक्ष उपाध्यक्ष, संचालक, व्यवस्थापक यांच्यासाठी स्नेहमिलन व सहविचार सभेचे आयोजन केले होते. येथील उद्योजक राजीव निवल यांनी भारतमातेचे पूजन करून सभेची सुरुवात केली. चैतन्य नागरी सहकारी पतसंस्था अध्यक्ष बापू पाटील यांनी स्वागत केले. प्रदेश कार्यकारीणी सदस्य अजय मुंदडा, अमरावती विभाग प्रमुख अमित भिसे, लेखा अधिकारी अरविंद तायडे, अरुण भिसे, प्रशांत बनगीनवार, अजय दंडे, अमोल बोदडे, आशीष सोमण, विणा देशपांडे तसेच विविध पतसंस्थांचे सभासद, मुख्य कार्य अधिकारी, व्यवस्थापक, कर्मचारी आणि दैनिक ठेव प्रतिनिधी, आवर्त ठेव प्रतिनिधी, सहकार भारती पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते.

# सहकार शिक्षण आणि प्रशिक्षणातून सहकार क्षेत्राची आणखी प्रगती होणे शक्य

**गडहिंग्लज** – सहकार शिक्षण आणि प्रशिक्षणातून सहकार क्षेत्राची आणखी प्रगती होणे शक्य आहे असे मत विभागीय सहनिबंधक डॉ. महेश कदम यांनी व्यक्त केले आहे.

येथील श्री रवळनाथ को-ऑप. हाउसिंग फायनान्स सोसायटी, सहनिबंधक कार्यालय, श्री महालक्ष्मी वुमेन्स को-ऑप. क्रेडिट सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने सहकार सप्ताहानिमित्त प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. तात्यासाहेब मोहिते सहकार प्रशिक्षण केंद्राचे प्रा. संभाजी जाधव, रवळनाथचे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले, व्यासपीठावर उपस्थित होते.

डॉ. कदम यांच्या हस्ते ध्वजवंदन तर प्रशासनाधिकारी प्रज्ञा पाटील यांनी सहकाराची शपथ दिली. सचिन मांगले यांनी संचलन केले. रवळनाथचे सीईओ डी. के. मायदेव यांनी स्वागत, संचालक आर. एस. निळपणकर यांनी प्रास्ताविक केले. संपदा घुगरे यांनी सूत्रसंचालन केले.

# सहकार भारती नागपूर महानगर अध्यक्षपदी घनश्याम कुकरेजा यांची निवड

**नागपूर** – सहकार भारती नागपूर महानगर अध्यक्षपदी साधना सहकारी बँक अध्यक्ष घनश्याम कुकरेजा यांची फेरनिवड करण्यात आली आहे तर नारायण गुरू नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष किरण रोकडे यांची महामंत्री पदावर फेरनिवड करण्यात आली आहे.

यावेळी सहकार भारती प्रदेश महामंत्री विवेक जुगादे, प्रदेश उपाध्यक्षा नीलिमा बावणे, जिल्हा पतसंस्था फेडरेशन अध्यक्ष राजेंद्र घाटे, विभाग प्रमुख संजय रोकडे प्रदेश पगारदार पतसंस्था प्रकोष्ट प्रमुख नाना महल्ले, प्रदेश महिला पतसंस्था प्रकोष्ट प्रमुख अंजली मुळे कार्यकारिणी सदस्य मनोज पांडे, सारिका पेंडसे उपस्थित होते. यावेळी सहकार भारती नागपूर महानगराची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. उपाध्यक्ष म्हणून राजेंद्र घाटे, स्वप्निल मोंढे, उर्मिला सराफ, श्रीकांत भुयारकर, गंगाधर लेंडे, सचिव संजय दहेलीकर, सुशील सरूडकर, सरिता गेडाम, जागेश्वर शेंडे, सागर मेश्राम, खजिनदार पदी वसंत भीसीकर यांची नियुक्ती करण्यात आली.

# डॉ. दिलीप गुप्ता यांना छोटूभय्या धाक्रस स्मृती पुरस्कार प्रदान

**नागपूर** – स्वामी विवेकानंद मेडिकल मिशनचे अध्यक्ष डॉ. दिलीप गुप्ता यांना छोटूभैय्या धाक्रस स्मृति पुरस्कार रा.स्व.संघाचे ज्येष्ठ प्रचारक शंकरराव तत्त्ववादी यांच्या हस्ते नुकताच प्रदान करण्यात आला. रोख ५१ हजार आणि सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे. विवेकानंद नागरी सहकारी प्रत्यय संस्थेच्या वतीने पुरस्कार प्रदान करण्यात येतो.

गायिका बेला शेंडे, संस्थेचे अध्यक्ष विवेक जुगादे, उपाध्यक्ष महेश अंधारे, तसेच अन्य पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. यावेळी सर्वश्री तत्त्ववादी, डॉ. दिलीप गुप्ता यांनी मनोगत व्यक्त केले. जुगादे यांनी प्रास्ताविक केले.

# सुवर्णा नागरी पतसंस्थेचा १५ टक्के लाभांश

**नाशिक** – येथील सुवर्णा नागरी सहकारी पतसंस्थेच्या सदस्यांना १५ टक्के लाभांश जाहीर करण्यात आला आहे. संस्था अध्यक्ष अविनाश कोठावदे यांच्या अध्यक्षतेखाली संस्थेची ३०वी वार्षिक सर्वसाधारण सभा झाली. अध्यक्ष कोठावदे यांनी संस्थेच्या आर्थिक स्थितीची माहिती सांगितली. भाग भांडवल १ कोटी ९५ लाख, तर ठेवी ५४ कोटी १ लाख आणि कर्ज वाटप ३८ कोटी ४० लाख इतके आहे.

तसेच गुंतवणूक २९ कोटी ४७ लाख आहे. संस्थेचा स्वनिधी १३ कोटी ६४ लाख इतका आहे तर संस्थेला १ कोटी ८१ लाख नफा झाला आहे, असे ते म्हणाले. संस्थेचे संचालक, अधिकारी, तसेच खातेदार यावेळी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रमोद बधान, तर आभार सुनीता धामणे यांनी मानले.

# कॉसमॉस बँकेचा कर्जाबाबतचा उपक्रम अभिनंदनीय - राज्यपाल



**पुणे** – समाजातल्या प्रत्येक घटकाची प्रगती झाली तर भारत २०४७ पर्यंत विकसित देश होईल असे मत राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी व्यक्त केले आहे. कॉसमॉस सहकारी बँकेच्या वतीने सूक्ष्म आणि लघुउद्योजकांसाठी बँकेच्या वतीने नव्याने सुरू करण्यात आलेल्या विभागाचे उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. ते म्हणाले, देशाच्या प्रगतीचा वेग वाढविण्यासाठी समाजातील लहान उद्योजकांना कर्जपुरवठा करणे आवश्यक आहे. कारण या क्षेत्रात एनपीए चे प्रमाण कमी असते. बँकेचा हा उपक्रम उल्लेखनीय असल्याचे त्यांनी सांगितले.

आचार्य स्वामी गोविंददेव गिरी महाराज यांनी सांगितले की, सामान्य माणसांचा आत्मविश्वास वाढविण्याचे काम बँकेने केले आहे. त्याच्या विकासाबरोबर देशाची प्रगती होत आहे.

आगामी काळ हा देशाचा सुवर्णकाळ असणार आहे. बँक अध्यक्ष मिलिंद काळे यांनी सांगितले की, लहान उद्योजकांच्या आणि ग्राहकांच्या आर्थिक गरजा लक्षात घेऊन बँकेने २० हजार रूपायापासून ते ५ लाख रुपयांपर्यंत कर्ज देण्यास सुरुवात केली आहे. यासाठी वाजवी व्याज दर आकारण्यात येतो आहे. याबरोबर बँकेच्या वतीने अधिकारी आणि कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्यात येत आहे.

बँक व्यवस्थापकीय संचालिका अपेक्षिता ठिपसे यांनी नवीन विभागाची माहिती सांगितली. संचालक सचिन आपटे यांनी आभार मानले लिना गोखले यांनी सूत्रसंचालन केले.

## बँकिंग फ्रंटियर्सचा जीवन गौरव पुरस्कार कॉसमॉसचे माजी अध्यक्ष काळे यांना प्रदान



**पुणे** – बँकिंग फ्रंटियर्सचा जीवन गौरव पुरस्कार यंदा कॉसमॉस सहकारी बँक तत्कालीन अध्यक्ष सीए मिलिंद काळे यांना नॅफकबचे अध्यक्ष लक्ष्मी दास यांच्या हस्ते नुकताच प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमांत अन्य पुरस्कार प्रदान करण्यात आले.

काळे यांनी सन १४ पासून बँकेच्या अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारली आहे. बँकेने नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात ३५ हजार कोटींचा व्यवसाय केला असून ३८४ कोटीचा विक्रमी निव्वळ नफा मिळविला आहे.

## कॉसमॉस सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ संचालक प्रल्हाद कोकरे



**पुणे** – येथील कॉसमॉस सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ संचालक प्रल्हाद कोकरे यांची नुकतीच निवड करण्यात आली आहे. बँक संचालक मंडळाची नुकतीच बैठक झाली. त्यामध्ये वरील निर्णय एकमताने घेण्यात आला.

बँकेचे विद्यमान अध्यक्ष मिलिंद काळे यांनी पदाचा राजीनामा दिला. त्यामुळे कोकरे यांची निवड करण्यात आली आहे. कोकरे हे गेली २१ वर्ष बँकेच्या संचालक मंडळात कार्यरत आहेत. त्यानंतर त्यांनी उपाध्यक्ष पद सांभाळले आहे. बँकेच्या विविध समित्यांवर त्यांनी काम केले आहे.

## महेश सहकारी बँकेचा वर्धापनदिन साजरा

**पुणे** – महेश नागरी सहकारी बँकेचा २६वा वर्धापनदिन नुकताच उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी समाजातील गरजू घटकांना आर्थिक मदतीचा हात देण्यात आला आहे. तसेच बँकेने सदस्यांसाठी विशेष ठेव योजना आणि रिकरिंग ठेव योजना सुरू केली आहे. बँकेची राज्यात ५ आणि राजस्थानात १ शाखा कार्यरत आहे. नजीकच्या काळात दोन नवीन शाखा सुरू करण्यात येणार आहेत. संस्थेचे अध्यक्ष राजेश राठी आणि अन्य संचालक यावेळी उपस्थित होते. संस्थेच्या १७४ कोटी रुपयांच्या ठेवी असून कर्जवाटप १०० कोटीचे आहे. बँकेचे सभासद ७ हजारपेक्षा अधिक असून संस्थेला १ कोटी ५६ लाख रुपये नफा झाला आहे.

## सहकारी गृहनिर्माण संस्थासाठीच्या सर्व उपविधींना मंजुरी

**पुणे** – राज्यातील सहकारी गृहनिर्माण संस्थासाठी सुचविण्यात आलेल्या सर्व उपविधी दुरुस्त्या सहकार खात्याने मंजूर केल्या आहेत, अशी माहिती महाराष्ट्र आणि पुणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण संस्था अध्यक्ष सुहास पटवर्धन यांनी सांगितली आहे. महासंघाच्या वतीने राज्यातील सुमारे सव्वा तीन लाखापेक्षा अधिक गृहनिर्माण संस्थांचे प्रतिनिधित्व करण्यात येते.

ते म्हणाले, राज्यातील ग्रहनिर्माण सहकारी संस्था आणि अपार्टमेंटपैकी सुमारे ४० टक्के संस्था पुनर्विकास करण्याचा विचार करीत आहेत. नवीन उपविधी दुरूस्तीप्रमाणे आवश्यक साहित्य वाजवी दरात उपलब्ध करून देण्यात येणार आहे. आगामी वर्ष हे आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष असल्यामुळे विविध योजना राबविल्या जाणार आहेत. तसेच आधुनिक तंत्रज्ञानाचा फायदा संस्थांना मिळवा यासाठी विविध उत्पादक कंपन्या, संस्था यांच्याबरोबर करार करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे आर्थिक कर्जपुरवठा उपलब्ध व्हावा, यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहेत असे ते म्हणाले.

## राजर्षि शाहू सहकारी बँकेची वृद्धाश्रमासाठी आर्थिक मदत

**पुणे** – राजर्षि शाहू सहकारी बँकेने सामाजिक बांधिलकीच्या जाणीवेतून मातोश्री वृद्धाश्रमासाठी आर्थिक मदत नुकतीच प्रदान केली आहे. बँकेच्या वतीने वृद्धाश्रमातील जेष्ठ नागरिकांसाठी आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. बँकेचे संस्थापक अध्यक्ष स्व. आबासाहेब शिंदे यांच्या पहिल्या पुण्यतिथिनिमित्त शिबिर घेण्यात आले होते. बँकेचे अध्यक्ष सुधाकर पन्हाळे, मुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब डोईफोडे, तसेच संचालक अधिकारी यावेळी उपस्थित होते.

# पूर्णवादी बँक अध्यक्ष डॉ. सुभाष जोशी यांची काळेवाडी शाखेस सदिच्छा भेट


**पुणे –** पूर्णवादी नागरिक सहकारी बँकेचे अध्यक्ष डॉ. सुभाष जोशी यांनी काळेवाडी शाखेस भेट दिली. त्यांच्या समवेत बँकेचे संचालक विश्वंभर राव थिगळे होते. शाखेचे व्यवस्थापक हेमकांत रामदासी यांनी स्वागत केले, तर माजी संचालक प्रा. डी. एस. कुलकर्णी यांनी अध्यक्ष डॉ. जोशी यांचा सत्कार केला.

शाखेचे माजी मार्गदर्शक दिलीप कुलकर्णी यांनी बँकेचे संचालक राव थिगळे यांचा सत्कार केला. प्रा. डी. एस. कुलकर्णी यांनी सहकार भारतीचे मुखपत्र सहकार सुगंध मासिकाचा दिवाळी अंक अध्यक्ष, डॉ. जोशी आणि संचालक थिगळे यांना दिला. मासिक सर्व शाखेतून घेण्यात यावे असे आवाहन केले.

बँकेचे खातेदार, ग्राहक, सभासद, मोठ्या संख्येने उपस्थित होते. बँकेच्या कोणकोणत्या योजना सुरू करणार आहोत, याविषयी सविस्तर माहिती सांगितली. शाखा आधिकारी प्रशांत मुळे यांनी आभार मानले.



## सांगलीत सहकार सुंगध मासिकाचे प्रकाशन



**सांगली –** महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन कामगार मंत्री सुरेश भाऊ खाडे यांच्या हस्ते सहकार भारतीच्या 'सहकार सुगंध' दीपावली अंकाचे प्रकाशन झाले. यावेळी सहकार भारतीचे प्रदेश संपर्क प्रमुख संजय परमणे, सांगली महानगर मंत्री शैलेश पवार, प्रसिद्धी प्रमुख संदीप कुलकर्णी उपस्थित होते.

## पुणे पीपल्स सहकारी बँकेस गुंतवणुकीबद्दल बँकिंग फ्रंटियर्सचा पुरस्कार प्रदान




**पुणे –** येथील पुणे पीपल्स सहकारी बँकेस गुंतवणुकीबद्दल बँकिंग फ्रंटियर्स आणि नॅफकब यांच्या वतीने प्रदान करण्यात येणारा मानाचा पुरस्कार लखनौ येथील कार्यक्रमात उपाध्यक्ष सीए मिलिंद काळे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. बँकेच्या वतीने हा पुरस्कार अध्यक्ष सीए जनार्दन रणदिवे, उपाध्यक्ष डॉ. रमेश सोनवणे संचालक सुभाष मोहिते यांनी स्वीकारला. यावेळी बँक संचालक उपस्थित होते.

बँकेने नुकताच व्यवसायाचा २५०० कोटी रूपयांचा टप्पा पार केला आहे. यामध्ये ठेवी १५३९ कोटी आणि कर्ज ९६१ कोटी रुपयांची देण्यात आली आहेत. एनपीएची टक्केवारी शून्य टक्के इतकी आहे, तर सीडी रेशो ६२.४४ टक्के आहे. बँकेने साडे बारा टक्के लाभांश दिला आहे, असे यावेळी सांगण्यात आले.

## श्री तिरुपती नागरी सहकारी पतसंस्था उपाध्यक्षपदी शाळीग्राम राठी

**पुणे –** येथील श्री तिरुपती नागरी सहकारी पतसंस्था उपाध्यक्षपदी शाळीग्राम रथी यांची नुकतीच निवड करण्यात आली आहे. ही निवड तीन वर्षासाठी असणार आहे. पतसंस्थेचे भाग भांडवल ३ कोटी ३८ लाख तर ठेवी ११९ कोटी ६९ लाख आणि कर्जवाटप ८९ कोटी २ लाख आहे.

संस्थेचे खेळते भांडवल १४७ कोटी २६ लाख तर गुंतवणूक ४२ कोटी ४ लाख इतकी आहे. संस्थेचे कार्यक्षेत्र पुणे जिल्हा असून संस्थापक अध्यक्ष जुगलकिशोर पुंगलिया आणि अध्यक्ष संतोष चोपडा आहेत.

## सहयोग मल्टीस्टेट क्रेडिट सोसायटीचा सामाजिक बांधिलकीचा उपक्रम

**अमरावती (अंजनगाव सुर्जी) –** येथील सहयोग मल्टीस्टेट क्रेडिट को-ऑप. सोसायटीच्या शाखेच्या वतीने बँक कर्मचारी स्व. मयूर ठाकरे यांच्या कुटुंबियांना दहा लाख रूपयांची आर्थिक मदत देण्यात आली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी विलास वासनिक, तसेच आर. एम. मनीष, एस. एम. पांडे, तसेच बँक सदस्य उपस्थित होते. आर्थिक मदत म्हणून एक वर्षासाठीचे बचत ठेव प्रमाणपत्र देण्यात आले.

तसेच स्थानिक स्तरावरील श्रीनाथ विद्यालय आणि श्री सखाराम महाराज प्राथमिक शाळेतील विद्यार्थी आणि विद्यार्थीनींना सोसायटीच्या वतीने गणवेश भेट देण्यात आले. यावेळी मुख्याध्यापिका कीर्ती चौथरकर, तसेच मुख्याध्यापक अरुण ईंगळे, सोसायटीचे व्यवस्थापक सुरेश केदार आणि अन्य अधिकारी विजय मुळे, प्रतिक्षा धरणे, आदी उपस्थित होते. सोसायटीच्या या उपक्रमाचे सर्वत्र स्वागत करण्यात आले.

## ठाणे भारत सहकारी बँकेचे नवे अध्यक्ष उत्तम जोशी

**मुंबई –** ठाणे भारत सहकारी बँकेचे नवे अध्यक्ष म्हणून उत्तम भास्कर जोशी यांची निवड करण्यात आली आहे. बँकेच्या संचालक मंडळाची नुकतीच बैठक झाली. त्यामध्ये वरील निर्णय घेण्यात आला आहे. मावळते अध्यक्ष मिलिंद माधव गोखले यांनी पदाचा राजीनामा दिल्याने अध्यक्षपद रिक्त झाले होते. नूतन अध्यक्ष जोशी यांचे संचालक अधिकारी यांनी अभिनंदन केले.

# गार्निशी ऑर्डर आणि आयकर / विक्रीकर खात्याची टाच

गार्निशी ऑर्डर आणि आयकर खात्याची टाच या दोन्ही गोष्टींचा संबंध बँकर्सच्या जीवनात नेहमीच अकल्पित येतो. अशी ऑर्डर आल्यास काय करावे, हे न उमगल्यामुळे गोंधळात पडायला होते. म्हणूनच या दोन्ही बाबींची सविस्तर चर्चा करण्याचे योजिले आहे.

खरे तर बँकर्सचा या गोष्टींचा थेट संबंध नसतोच! आपल्यासाठी हे 'व्याह्याने धाडलेले घोडे'च असते. पण न्यायालयाचा व आयकर खात्याचा मान राखणे बँकरला कायद्याने अनिवार्य आहे.




**श्रीकांत धुंडीराज जोशी**
**९८९०८२५८२६**


म्हटले तर, या दोन्ही गोष्टी समांतर असतात. पण त्यात काही फरकही आहे. दोन्हींसंदर्भात ठेवीदाराचे ठेव खाते गोठवले जाते. म्हणजेच पर्यायाने या गोठवण्याचा कर्ज व्यवहारांशी प्रत्यक्ष संबंध नाही; असलाच तर तो अप्रत्यक्ष!

ठेवीदार हा बँकेचा घेणेकरी (creditor) असतो. बँक त्याचे देणे लागते. हेच लक्षात घेऊन सक्षम न्यायालय / आयकर (वा विक्रीकर) खाते बँकेस आदेश देते की, बँकेने हे देणे ठेवीदारास न देता न्यायालयाकडे / आयकर खात्याकडे जमा करावे.

लक्षात घ्या- या प्रसंगी - आपल्याला न्यायालयाच्या / आयकर विभागाच्या आदेशांचे पालन करायचे आहे; आपल्या ग्राहकाच्या इच्छा वा अनिच्छेचा संबंध नाही!!)

या आदेशांचा भंग केल्यास, तो न्यायालयाचा अवमान ठरेल; न्यायालय बँकेविरुद्ध कारवाई करू शकेल. आयकर खात्याचा आदेश न मानल्यास आयकर खाते बँकेसच कर चुकवला म्हणून नोटीस पाठवू शकते; आणि बँकेस अकारणच नको त्या संकटास तोंड देणे भाग पडू शकते.

**✲ गार्निशी ऑर्डर –** या पूर्वीच म्हटल्याप्रमाणे या व्यवहारांचा बँकेशी थेट संबंध नसतो. हा व्यवहार नेमका असतो तरी काय हे समजून घेण्यासाठी एक उदाहरण घेऊया.

कोणी एक 'अ' हा गृहस्थ 'ब' या गृहस्थाचे काही देणे लागतो. 'ब'ने अनेकदा तगादे केल्यानंतरही 'अ'ने रक्कम न दिल्यास 'ब'ला न्यायालयाचा दरवाजा ठोठावण्यावाचून गत्यंतर नसते. उभयतांचे म्हणणे ऐकून घेऊन, 'ब'ची मागणी न्याय्य वाटल्यास, न्यायालय 'ब'च्या बाजूने निर्णय देत 'अ'ला रक्कम देण्याचा आदेश देते. (हा न्यायालायचा निर्णय, त्यास इंग्रजीत 'डीक्री' संबोधतात.) आता 'अ'ला "Judgement debtor' असे म्हणतात.

न्यायालयाच्या निर्णयानंतरही जर 'अ'ने रक्कम अदा केली नाही, तर 'ब' अस्वस्थ होतो. दरम्यान त्याला सुगावा लागतो, की 'अ'च्या काही ठेवी 'क' या बँकेत आहेत. अशा वेळी 'ब' न्यायालयास विनंती करतो की, 'अ'च्या 'क' बँकेतील ठेवी गोठवण्याबाबत आदेश दिला जावा. न्यायालय 'ब'ला मदत करण्याच्या हेतूने तसा आदेश 'क' बँकेस देते; मात्र येथे न्यायालयास 'क' बँकेत 'अ'च्या ठेवी खरेच आहेत अथवा नाहीत याबद्धल काहीच पक्की माहिती नसते. त्यामुळे पहिला आदेश संदिग्ध स्वरूपाचा - केवळ विचारणा करणारा असतो. या 'विचारणा' करणाऱ्या आदेशास 'निशी ऑर्डर' अशी संज्ञा आहे. या आदेशाद्वारे न्यायालय 'क' बँकेस 'अ'च्या सर्व ठेवींची माहिती विचारते, व ठेवी (असल्यास) त्या ठराविक रकमेपर्यंत गोठवण्यास सांगते. बँकेने आवश्यक तो तपशील न्यायालयाला पुरवल्यानंतर न्यायालय अंतिम आदेश जारी करते; यासच 'गार्निशी ऑर्डर' म्हणतात. हा अंतिम आदेश असतो. त्यानंतर न्यायालयाने मागणी केलेली रक्कम, 'क' बँकेस न्यायालयाला पाठवावी लागते. अशी रक्कम न्यायालयास पाठवताच, बँकेस ठेवीदारास देणे असलेल्या रकमेतून बँकेस पूर्ण मुक्तता (Full Discharge) मिळतो; आता बँक ठेवीदाराचे (पाठवलेल्या रकमेपर्यंत) देणे लागत नाही.

हे आदेश मयत खातेदाराच्या खात्यांसही लागू असतात.

**✲ न्यायालयीन आदेश मिळताच बँकेने करावयाची कृती –** बँकेकडे 'निशी ऑर्डर' पोचताच सर्व प्रथमतः ऑर्डर पोचल्याची वेळ त्यावर नमूद करावी. कारण हा आदेश बँकेस ज्या क्षणी मिळाला, तेव्हापासून तात्काळ लागू होतो. यापुढे चालू खात्यावरील अथवा बचत खात्यावरील ठेवीदाराने जारी केलेले धनादेश अदा करता येणार नाहीत. आदेश लागू झाल्याक्षणी ठेवीदारास देय असणारी बाकी न्यायालयास द्यावी लागणार आहे.

यानंतरची पहिली कृती म्हटली तर, बँकेने ताबडतोब खातेदारास तोंडी / लेखी कळवायला हवे.

आदेश नीट वाचावा. नेमक्या कोणाच्या / कोणाकोणाच्या नावे आहे? किती रकमेचा आहे? आता संबंधित ठेवीदाराच्या आपल्याकडील संपूर्ण बँक व्यवहारांचा (ठेवींबरोबरच कर्जांचा देखील) आढावा घेणे भाग आहे. शक्य आहे की, न्यायालयाने नमूद केलेल्या व्यक्तीच्या नावे कोणत्याच ठेवी बँकेकडे नसतील. तर तसे न्यायालयास कळवावे लागेल. या ठेवींची गणना करताना - आदेश सर्व बँकेस, एकत्रितपणे लागू असल्याने - शाखावार ठेवींची अलग अलग गणना करावयाची नसून - बँकेच्या सर्व शाखांमधून धांडोळा घ्यावा लागे. आजकाल सर्व शाखा संगणकाने जोडल्या असल्याने, आणि ग्राहकास एकच संदर्भ क्रमांक (कस्टमर आय.डी.) दिला असल्याने हे काम सोपे झाले आहे.

या ग्राहकाच्या आपणाकडे नाना प्रकारच्या ठेवी असतील. चालू खाते व बचत खात्यावरील कारवाई त्वरित करावी लागेल. कारण या दोन्ही प्रकारच्या ठेवी ठेवीदाराने मागणी करताच द्यायच्या (demand deposits) असतात. (म्हणजेच त्या त्वरित देय असतात.)

मात्र मुदत ठेवी, आवर्त (रिकरिंग) खाते यांची मुदत संपलेली नसेल तर, जरी ही खाती गोठवायची असली तरी, त्यांची मुदत संपेपर्यंत त्यांची रक्कम न्यायालयास देता येणार नाही. कारण या मुदत ठेवी अद्याप देय झालेल्या नाहीत. त्यांच्या मुदती जसजशा संपतील तसतशा त्या न्यायालयाकडे पाठवायला लागतील. तसे न्यायालयास स्पष्ट कळवायला हवे. या अद्याप देय न झालेल्या ठेवींसंबंधात तसा शेरा नमूद करायला हवा. या काळात या मुदत न संपलेल्या ठेवपावत्यांवर कर्ज देता येणार नाही किंवा त्यांची मुदतपूर्व परतफेडही करता येणार नाही. (खातेदार मयत असल्यास, वारसांना / नॉमिनीस (Nominee) देता येणार नाहीत.

ठेवीबरोबरच जर कॅश क्रेडिट खात्यावर जमा बाकी दिसत असेल तर ती रक्कम देखील गोठवावी लागेल. (व न्यायालयास, न्यायालयाचा अंतिम आदेश (गर्निशी) येताच, द्यावी लागेल.) कारण येथेही जमा बाकी म्हणजे खातेदाराला देण्याचीच रक्कम होय.

कोणत्या ठेवी गोठवायच्या हे ठरवताना, ज्याच्या नावे सदर 'निशी ऑर्डर' (केवळ विचारणा) आहे, फक्त त्याच व्यक्तीच्या ठेवी गोठवायच्या आहेत. (येथे निशी ऑर्डर एकट्याच्या नावे आहे, असे गृहीत धरले आहे.) जर काही ठेवी या त्याच्यासह अन्य व्यक्तींच्या संयुक्त नावावर असतील तर त्या ठेवींना हा आदेश लागू होत नाही.

आदेशातील व्यक्तीची 'एकट्याच्या नावची' मालकी असणारी संस्था (सोल प्रोप्रायाटर) असेल तर ते खाते गोठवावे लागेल. (सोल प्रोप्रायटरशीपचा

मालक व व्यक्ती कायद्याने अभिन्न मानतात.)

मात्र संबंधित व्यक्ती भागीदार असेल, तर अशा भागीदारीचे खाते गोठवण्याचे कारण नाही. तसेच जेथे जेथे ही व्यक्ती प्रतिनिधी म्हणून सही करते, अशी खाती देखील गोठवता कामा नयेत. उदा. ठेव अज्ञान बालकाच्या नावे असून आदेशात सांगितलेली व्यक्ती केवळ पालक म्हणून सही करीत असेल तर, ठेव 'अज्ञान' व्यक्तीची असल्याने, (आदेशाशी संबंधित व्यक्तीची नसल्याने) रक्कम गोठवली जाणार नाही.

सदर आदेशात सांगितलेली रक्कम तेवढीच गोठवायची आहे. जर बँकेकडील ठेव रक्कम आदेशात सांगितलेल्या रकमेपेक्षा जास्त असेल तर, जादा रकमेतून खातेदाराने काढलेले धनादेश अदा करण्यास हरकत नाही. समजा न्यायालयाने रु. ५० हजारांची मागणी केलेली असेल आणि संबंधिताच्या चालू खाती रु. १ लाखाची जमा बाकी असेल, तर रु. ५० हजार न्यायालयीन आदेशाप्रमाणे राखून ठेवून, उरलेल्या रु. ५० हजारांतून धनादेश अदा करता येतील.

ज्या क्षणी हा आदेश बँकेस प्राप्त झाला त्या क्षणी जी ठेव बँकेकडे असेल, तेवढी आणि तेवढीच रक्कम गोठवली जाईल.

कल्पना करू, आदेशात रु. ५० हजारांची मागणी केलेली असेल व संबंधित खातेदाराच्या सर्व ठेवी, आदेश प्राप्त झाला त्या वेळेस, ठेव रकमा फक्त रु. ४० हजारांच्याच असतील तर केवळ रु. ४० हजारच गोठवले जातील आणि म्हणूनच खातेदाराने जारी केलेला व बँकेत सादर झालेला धनादेश अदा करण्यासाठी खातेदार वेगळी जादा रक्कम खात्यात भरू शकेल व स्वत:ची पत सांभाळू शकेल.

अशावेळी आदेशात नमूद केलेल्या व्यक्तीस केवळ रु. ४० हजारच देय असल्याचे बँकेने कळवायचे असून, न्यायालयाचा अंतिम आदेश आल्यावर फक्त रु. ४० हजारच न्यायालयास पाठवायचे आहेत. जर न्यायालयाने आपल्या आदेशात नेमकी रक्कम सांगितली नसेल, तर आदेश प्राप्त होण्याच्या क्षणास, खात्यात शिल्लक असणारी सर्व ठेव गोठवावी लागेल. (ठेवीदाराने नंतर जादा रकमा/ ठेवी बँकेकडे जमा केल्या असल्या तरी, नंतर भरलेल्या रकमांचा, न्यायालयास पाठवण्याच्या रकमेशी संबंध नसतो. यामुळेच निशी ऑर्डर प्राप्त होण्याची वेळ नोंदवणे आवश्यक असते.) त्याच प्रकारे जर खातेदाराने काही धनादेश वसुलीसाठी दिले असतील, पण अद्यापी ते वसूल झाले नसतील, त्या रकमाही निशी ऑर्डरमधून सुटतात.

एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे, जेव्हा असा न्यायालयाचा आदेश प्राप्त होतो, तेव्हा बँकेचा 'खाते वळते करून घेण्याचा अधिकार' (Right Of Set Off) आपोआप स्पष्ट होतो. एरवी चालू / बचत खात्यासंबंधात हा अधिकार वापरताना खातेदारास पूर्वसूचना देण्याची गरज असते. निशी ऑर्डर आली असता अशा पूर्वसूचनेची आवश्यकता नसते.

जर खातेदाराकडून बँकेचे काही येणे असेल तर, न्यायालयास रक्कम कळवण्यापूर्वी आपली रक्कम बँक प्रथम आपली येणी वसूल करेल. त्यामुळेच खातेदाराच्या समग्र खात्यांचा आढावा घेताना कर्जदाराकडून काही येणे नाही ना, याची खातरजमा करून घ्यावी लागेल. ही येणी नाना प्रकारची असू शकतील.

**उदा. –** मुदत कर्जांचे देय झालेले, पण कर्जदाराने अद्याप न भरलेले हप्ते. (हप्त्यांची चालू व थकबाकी). (जे हप्ते अद्याप देय (due) झालेले नाहीत ते वसूल करता येणार नाहीत.)

कर्जाचे देणे झालेले व्याज / दंड व्याज

अन्य थकलेले सेवा प्रभार. उदा. लॉकरचे भाडे

खातेदाराच्या वतीने बँकेने काही खर्च केले असतील तर ते – उदा. विमा हप्ता, टपाल खर्च इत्यादी.

कॅश क्रेडिटची नावे बाकी (बँकेचे येणे).

(कॅश क्रेडिट खात्यास परतफेडीचा कार्यक्रम नसतो. ते बँकेने मागणी करताच कर्जदाराने ताबडतोब भरायचे असते. त्यामुळे ते नेहमीच तात्काळ वसूलपात्र असते.)

सदरहू ठेवीदार कोणास जामीन असेल, व कर्ज थकल्यामुळे कर्जदारास थकबाकी भरण्याची सूचना (नोटिस) दिली गेली असेल, (आणि अशा नोटीशीची प्रत जामीनदारास (येथे आदेशाशी संबंधित ठेवीदारास) पाठवली गेली असेल), तर निर्देशित जामीनदाराच्या खात्यातील रकमाही वसूल करता येतील. (लक्षात असू द्या, जामीनदाराची जबाबदारी दुय्यम असते. जोपर्यंत कर्जदार थकत नाही, तोपर्यंत जामीनदार जबाबदार नाहीच! पण कर्जदार देणे देत नाही, असे दिसताच, जामीनदाराची जबाबदारी सुरु होते. जामीनदार व कर्जदार हा भेद संपतो. बँक 'रक्कम वळती करून घेण्याचा अधिकार' (right of Set Off) वापरू शकते.)

एक महत्त्वाची सूचना! न्यायालयाचा आदेश हा ठेव खात्यांसाठी असतो. कर्ज खात्यांसाठी नाही. कॅश क्रेडिट खात्यास जर न वापरलेली पत मर्यादा शिल्लक असेल तर, त्या शिल्लक पत मर्यादेतून न्यायालयास रक्कम पाठवायची नाही. (अन्यथा अन्य कोणाचे देणे भागवण्यासाठी बँकेने आपला पैसा पुरवण्यासारखे होईल. ते करायचे नाही.) आणि म्हणूनच निशी ऑर्डर मिळताच बँकेने सर्वप्रथम कॅशक्रेडिट खात्यातील नावे बाकी वसूल करावी.

जरी न्यायालयाचा आदेश कर्ज खात्यास लागू नसला तरी, असा आदेश प्राप्त होताच, बँकेने कर्जदाराच्या संपूर्ण कर्ज व्यवहारांचा (कॅश क्रेडिटसह) आढावा घेणे जरुरीचे आहे. जो कर्जदार त्याची देणी भागवू शकत नाही, त्याची विश्वासार्हता बँकेच्या दृष्टीने धोक्यात आली आहे, असे मानणे योग्य ठरेल. पूर्ण आढावा यासाठीच! त्यानंतर आपली कर्जबाकी वसूल करण्यासाठी आवश्यक ती सर्व पावले उचलणे भाग आहे.

हा आदेश जसा ठेव खात्यांस लागू असेल तद्वत बँकेच्या ताब्यात असणाऱ्या तारण मालमत्तेसही लागू असेल. उदाहरणार्थ, बँकेने सोने तारण कर्ज दिले असेल, कर्जदाराने ते फेडलेही असेल, पण तारण सोने बँकेने अद्यापी ग्राहकास परत दिले नसेल, तर तेही न्यायालयीन आदेश ग्रस्त असेल.

**※ कर्ज वसुलीसाठी बँकेच्या हातातील एक शस्त्र –**

बँकेस आपली येणी वसूल करण्यासाठी, अनेकदा न्यायालयाची पायरी चढावी लागते, अशा वेळी जेव्हा न्यायालय बँकेच्या बाजूने निर्णय देत, निर्णय देते, अशा वेळी बँकसुद्धा अशा कर्जदाराच्या / जामीनदाराच्या, अन्य बँकेतील ठेवींवर टाच आणू शकते. अर्थात न्यायालयाच्या साहाय्याने. त्यासाठी बँकेस संबंधित कर्जदाराची अन्य बँकेतील खात्यांची माहिती मिळवावी लागेल; प्रसंगी गुप्तहेरी करूनही!

असा आदेश केवळ बँकांसंदार्भातच वापरता येतो, असे नव्हे! ज्या ज्या व्यक्तीकडून संबंधित व्यक्तीस (कर्जदार /जामीनदार) येणे असेल त्या त्या व्यक्तीकडे अशी मागणी (न्यायालयाच्या सहाय्याने ) करता येते.

या शस्त्राचा वापर बँकांनी अवश्य केला पाहिजे. आयकर / विक्रीकर खात्याची टाच येथे 'टाच' हा शब्द इंग्रजी attach या शब्दाचे मराठी रूप आहे, हे लक्षात घ्यायला हवे.

'गर्निशी ऑर्डर' व आयकर खात्याची टाच या दोन्ही गोष्टी समांतरच आहेत. (विक्रीकर खात्याची टाच व आयकर खात्याची टाच यात काहीच अंतर नाही.) त्यामुळे गर्निशी ऑर्डर संबंधात जे वर सांगितले आहे, त्या आणि तशाच कृती या टाचेसंबंधातदेखील करणे आवश्यक आहे. यात खालील गोष्टींचा समावेश असू शकेल.

बँकेस टाच आदेश प्राप्त झाल्याची वेळ तत्काळ नोंदवणे.

सदरहू व्यक्तीस असा आदेश आला असल्याची तातडीने माहिती देणे.

संबंधित ठेवीदाराची बचत व चालू खाती गोठवणे.

संबंधित व्यक्तीच्या सर्व कर्जांचा व ठेवींचा आढावा घेणे.

बँकेची स्वतःची येणी प्राधान्याने वसूल करणे.... इत्यादी.

गार्निशी आणि आयकर (विक्रीकर टाच) आदेश एकसमान आहेत असे भासले तरी काही अंशी त्यात बरीच भिन्नता आहे.

'गर्निशी ऑर्डर' संबंधात, ऑर्डर मिळाली त्यावेळेस, खातेदाराच्या ज्या ठेवी बँकेकडे होत्या, तेवढ्या सर्व ठेवी गोठवल्या जातात; मात्र त्यावेळी न्यायालयाने मागणी केलेल्या रकमेपेक्षा कमी रक्कम बँकेकडे असेल तर तेवढीच पाठवली जाते. खातेदाराने नंतर जमा केलेल्या रकमा सुटतात.

आयकर खात्याच्या आदेशात मात्र ही सवलत नाही! आयकर खात्याने मागणी केलेली रक्कम पूर्ण होईपर्यंत, ठेवीदाराने नंतर भरलेल्या रकमादेखील गोठत राहतील! त्या आयकर खात्यास पाठवाव्या लागतील.

गर्निशी ऑर्डर व आयकर खात्याचा आदेश यातील दुसरा महत्त्वाचा फरक म्हटला, तर तो जोड खात्यासंबंधात आहे. गर्निशी ऑर्डरमध्ये नमूद केलेल्या व्यक्तीच्याच, (फक्त व्यक्तिगत ठेवी) तेवढ्याच गोठवल्या जातात. जोड (संयुक्त) नावावरील ठेवींना न्यायालयीन आदेश लागू होत नाही. आयकर खात्याचा आदेश मात्र जोड खात्यांसही लागू राहतो. आयकर खाते मानते, की जोड खात्यातील रक्कम एक समान, प्रमाणशीर पद्धतीने प्रत्येक ठेवीदाराची आहे. समजा एक ठेव 'अ' व 'ब' च्या संयुक्त नावे आहे, तर आयकर खात्याच्या हिशोबाप्रमाणे त्यातील निम्मी रक्कम 'अ'ची! (खरे तर ही कल्पना प्रचलित बँकिंग पद्धतीच्या विरोधातील! बँकिंग विचारसरणीत सदर ठेव दोघांच्या मालकीची! त्यांचे आपापसातील प्रमाण आम्हास माहित नाही, ही बँकेची भूमिका! पण आयकर खाते चक्क दादागिरी करते.)

दुसऱ्या शब्दांत आयकर खात्याची नोटीस ज्याच्या नावे आली आहे, त्याचे नाव जेथे जेथे संयुक्त स्वरुपात सापडेल त्या सर्व ठेवी गोठवाव्या लागतील. जर आदेशाशी संबंधित ठेवीदार एखाद्या भागीदारी संस्थेत भागीदार असेल, तर भागीदारीचे खातेदेखील त्या प्रमाणात गोठवले जाईल. परंतु येथेही संबंधित व्यक्ती जर प्रातिनिधिक स्वरूपात सही करत असेल तर त्या ठेवी गोठणार नाहीत.

आयकर खात्याच्या नोटीशीसंबंधात 'वळते करून घेण्याचा अधिकार' (Right of Set Off) बँकेस आहेच! तो वापरताना, बँकिंग प्रथेनुसार संबंधिताच्या जोड नावावरील ठेवी, बँकेची येणी वसूल करण्यासाठी, विचारात घेता येणार नाहीत. पण आयकर खात्यास मात्र पाठवाव्या लागतील. येथेही आयकराचा टाच आदेश मिळताच संबंधित व्यक्तीच्या एकूणच व्यवहारांचा सर्वांगीण आढावा घेऊन, बँकेच्या हितरक्षणासाठी आवश्यक त्या कृती करणे, ओघानेच आले.

क्वचित प्रसंगी, गर्निशी ऑर्डर आणि आयकर खात्याची टाच एकाच वेळी प्राप्त झाली तर, आयकर हे शासकीय देणे असल्याने, आयकराच्या आदेशास प्राधान्य देणे क्रमप्राप्त आहे. गार्निशी ऑर्डर गौण ठरेल.

गार्निशी ऑर्डर आणि आयकर खात्याची टाच या दोन्ही गोष्टींमध्ये बऱ्याच कायदेशीर बाबींची गुंतागुंत संभवते; म्हणूनच त्या संदर्भात कारवाई करताना विचारपूर्वक पावले उचलणे भाग आहे. या लेखात वाचकांच्या आकलनाच्या दृष्टीने, कायद्यात नेहमी वापरली जाणारी भाषा (कलम क्रमांक / नियम/ पोट नियम क्रमांक) टाळली आहे.

**– प्रस्तुतकर्ता – श्रीकांत धुंडिराज जोशी**
**(निवृत्त अधिकारी, बँक ऑफ महाराष्ट्र)**
११/६१, अरविंद सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, संतोष हॉलमागे, नरवीर तानाजी मालुसरे (सिंहगड) रस्ता, आनंदनगर, हिंगणे खुर्द, पुणे ४११०५१ भ्रमणक – ९८९० ८२५ ८२६
email- shridhunjoshigmil.com

*****




२०२४ ७५ अमृत महोत्सव 25 K वर्गणीदार

कर व व्यापारी विषयक कायद्यातील
क्लिष्ट विषयांची सहज सोप्या भाषेत
माहितीसह आर्थिक गुंतवणूक,
आरोग्याविषयी माहिती देणारे
व्यापारी बांधवांचे हक्काचे एकच व्यासपीठ

स्थापना १९५०
**व्यापारी मित्र**

मासिकातील एखाद्या माहितीने आपला लाखो रुपयांचा फायदा होऊ शकतो.

संस्थापक संपादक : स्व. श्री. जी. डी. शर्मा

मासिकाची वर्गणी
खालील प्रकारे भरु शकता.

| | वर्ष ३ | वर्ष २ | वर्ष १ |
|---|---|---|---|
| साध्या पोस्टाने | १९०० | १३०० | ७०० |
| रजिस्टर पोस्टाने | २६०० | १७८० | ९४० |

'परशुराम कुटी', १०६/९, एरंडवणा, पुणे – ४११००४
फोन (०२०) २५४३ १०९४ (W) : 94218 80290
E-mail : sampadak@vyaparimitra.com

# सहकारी बँकेच्या कामकाजात प्रशिक्षणाचे महत्त्व

बँकिंग हा व्यवसाय सातत्याने बदलणारा व्यवसाय असल्यामुळे या व्यवसायात प्रशिक्षणाचे अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. ९० च्या संगणक क्रांतीनंतर बँकिंगमध्ये संगणकाचा मोठ्या प्रमाणावर वापर सुरू झाला. संगणकीकरणामुळे बँकिंगला व्यावसायिकदृष्ट्या मोठा फायदा झाला. कोअर बँकिंग, नेट बँकिंग एटीएम, बिल पेमेंट प्लॅटफॉर्म्स, इत्यादी सेवा सुविधा ही विस्तारित संगणकीकरणाची उदाहरणे आहेत, ज्याचा बँकिंग व्यवसायाला मोठा फायदा झालेला आहे. मागील पाच वर्षांपासून कृत्रिम बुद्धिमत्ता (म्हणजेच आर्टीफिशियल इंटेलिजन्स)चा बँकिंग व्यवसायात वापर करण्याचे नियोजन सुरू आहे.



डॉ. अभय मंडलिक
९४०३० ८०७२५

नियामक या नात्याने रिझर्व बँक ऑफ इंडियादेखील संगणकावर आधारित सेवा, बँकांना कशा देता येतील याबाबत कायम विचार करीत असते. या पार्श्वभूमीचा गांभीर्याने विचार केल्यास बँकिंगमध्ये सध्या प्रशिक्षण या विषयाचे महत्त्व पूर्वीपेक्षा अधिक पद्धतीने वाढीला लागलेले आहे. प्रशिक्षणामध्ये मुख्य प्रशिक्षण हे तंत्रज्ञानासंदर्भात, तसेच विविध फॉरमॅटमध्ये बदलत्या प्रणाली संदर्भात असावे अशा प्रकारचे विचारधारा सध्या बँकिंगमध्ये सुरू झाली आहे.

**※ नागरी सहकारी बँका आणि तंत्रज्ञान –** सन ९० या वर्षात सुरू झालेल्या आर्थिक उदारीकरण आणि जागतिकीकरणानंतर बँकिंग व्यवसायात संगणकीकरणाचा पाया व्यापक झालेला दिसून येतो. स्पर्धेमध्ये योग्य पद्धतीने राहता यावे या हेतूने नागरी सहकारी बँकांनी योग्य वेळी संगणकीकरण सुरू करून त्याचा अंतिम फायदा ग्राहकांना द्यायला सुरुवात केली. कोअर बँकिंग प्रणाली एटीएम, पेमेंट प्लॅटफॉर्म्स डेबिट कार्ड, ऑनलाइन खरेदी इत्यादी संगणकावर आधारित सेवा बँकांनी योग्य वेळी सुरू केल्यामुळे स्पर्धेमध्ये त्या टिकून राहिल्या आणि त्यांचा व्यवसायही पुरेशा प्रमाणात वाढला.

संगणकीकरण करीत असताना बँकांना संगणकीकरणाशी संबंधित प्रशिक्षणाची व्यापक व्यवस्था करावी लागली होती. कारण संगणक हे बँकिंग व्यवसायासाठीच नवीन तंत्रज्ञान होते. सध्याच्या काळात तंत्रज्ञानामध्ये सातत्याने बदल होत असल्यामुळे प्रशिक्षणाचे महत्त्व यानंतर अधिकच वाढणार आहे. नवनवीन तंत्रज्ञानाची ओळख आणि त्याचा खातेदारांसाठी योग्य वापर हे बँकिंगमधील आव्हान असून हे आव्हान पेलण्यासाठी प्रशिक्षणाची नितांत आवश्यकता आहे. हे प्रशिक्षण घेताना योग्य व्यक्तींकडून, योग्य व्यक्तींना दिले जावे ही काळजी घेणे आवश्यक आहे. यात प्रशिक्षकांची आणि प्रशिक्षण संस्थांची व्यवस्थित निवड, आपल्या गरजांप्रमाणे स्थानिक भाषेमध्ये माहिती देणारे प्रशिक्षक आणि बँकिंग व्यवसायाशी पूर्णपणे निगडित असलेले तंत्रज्ञान सोप्या शब्दांमध्ये देण्याची क्षमता ही प्रशिक्षकांची आणि प्रशिक्षण संस्थांची बँकांसाठी असलेली मूलभूत गरज आहे.

बँकेमध्ये ज्यांना संगणक शिकण्याची आवड आहे आणि ज्यांना या विषयात गती आहे अशांचीच प्रशिक्षणासाठी निवड करणे बँकांसाठी सोयीचे ठरते. या विषयाची सुरुवात बँकांमधील भरतीपासून होते. नव्या कर्मचारी, अधिकारी यांच्या भरतीमध्ये संगणकाचे ज्ञान असणे ही अत्यावश्यक बाब समजून तशा प्रकारच्या व्यक्ती बँकेच्या सेवेत येतील ही काळजी भरतीच्या वेळेस घेणे आवश्यक आहे. यापुढील बँकिंग हे केवळ तंत्रज्ञानावर आधारित असेच असणार आहे. त्यामुळे बँकिंगच्या ज्ञानाइतकेच संगणकाचे ज्ञान येणाऱ्या काळामध्ये महत्त्वाचे ठरेल. सध्या अस्तित्वात असलेल्या कर्मचाऱ्यांसाठी सातत्याने प्रशिक्षण देणे ही काळाची गरज आहे. या कर्मचारी अधिकाऱ्यांचे संगणक विषयक ज्ञान कायम अद्ययावत राहावे, यासाठी ठराविक अंतराने कायम प्रशिक्षणाची व्यवस्था करणे आवश्यक आहे.

प्रशिक्षणाचा खर्च, याकडे खर्च म्हणून न पाहता ती एक भांडवली गुंतवणूक आहे या दृष्टीकोनातून संचालक मंडळाने पाहणे आवश्यक आहे. सुदैवाने प्रशिक्षणावरील खर्च हा आयकराच्या दृष्टीनेही मान्यता प्राप्त खर्च (परमिसिबल एक्सपेंडिचर) असल्यामुळे याकडे अधिक गांभीर्याने बघून ठराविक अंतराने संगणक विषयक प्रशिक्षण देणे सध्या नागरी सहकारी बँकांसाठी अत्यंत आवश्यक आहे.

**※ तांत्रिक जोखमीबाबत प्रशिक्षण –** प्रगत तंत्रज्ञानासोबत जोखीम देखील येते. बँकिंग क्षेत्रात संगणकीकरणानंतर झालेले अफरातफरीचे प्रकार, बँकांची झालेली फसवणूक, प्रणालीमधील बेकायदेशीर प्रवेश आणि त्यातून होणारे गैरप्रकार या साऱ्याचा नागरी सहकारी बँकिंग क्षेत्राला अनुभव आहे आणि त्यामुळे या बाबींबाबत प्रशिक्षण देणे अत्यंत आवश्यक आहे.

**※ जोखीम आधारित लेखापरीक्षण (रिस्क बेस्ड ऑडिट) –** रिझर्व बँकेच्या दृष्टिकोनातून जोखमीवर आधारित लेखापरीक्षण हा नागरी सहकारी बँकांसाठी अत्यंत कळीचा मुद्दा असून यासाठी रिझर्व बँकेच्या अपेक्षेप्रमाणे योग्य प्रशिक्षण देणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी राष्ट्रीयीकृत किंवा खासगी बँकांमधील या क्षेत्रातील निवृत्त मंडळींचा नागरी सहकारी वापर करून घेता येईल. व्यापारी आणि राष्ट्रीयीकृत बँकात या प्रकारचे लेखापरीक्षण अनेक वर्षांपासून सुरू असून त्यांना या लेखापरीक्षणाचा अनुभव आहे. या क्षेत्रातील निवृत्त व्यक्तींना बँकेमध्ये नियुक्ती देऊन, सल्लागार पदी नेमणूक करून, किंवा रिटेनरशिप पद्धतीने त्यांच्या सेवा घेऊन या प्रशिक्षणाची सोय करता येईल. आपल्या बँकेतील सर्व कर्मचाऱ्यांना याबाबतीत पुरेसे जागरूक करणे अत्यंत आवश्यक आहे. रिझर्व बँकेच्या दृष्टीने हा मुद्दा अत्यंत महत्त्वाचा असल्यामुळे याकडे पुरेशा गांभीर्याने बघून याबाबतच्या प्रशिक्षणाची सोय करणे आवश्यक आहे.

**※ अन्य व्यावसायिक प्रशिक्षण –** तंत्रज्ञानाच्या प्रशिक्षणाव्यतिरिक्त बँकिंगमधील अन्य व्यावसायिक बाबी, उदाहरणार्थ केवायसी, कर्ज प्रकरणाची छाननी, गुंतवणूक, लेखापरीक्षण आणि अन्य सॉफ्ट स्किल्स याबाबतचे प्रशिक्षण ठराविक अंतराने सर्व कर्मचारी अधिकाऱ्यांना दिले गेले पाहिजे.

यामध्ये कर्मचारी, अधिकारी वर्गाचे ग्रुप्स करून हे प्रशिक्षण देता येईल. सेवक श्रेणीपासून सुरुवात करू लिपिक यामध्ये त्यांच्या सीनियॉरिटी प्रमाणे गट तयार करून तसेच अधिकारी वर्गासाठी शाखांमधील अधिकारी आणि मुख्य कार्यालय किंवा विभागीय कार्यालयातील अधिकाऱ्यांचे वेगळे ग्रुप तयार करून त्यांच्यासाठी प्रशिक्षणाची सोय करण्यात यावी. वरिष्ठ अधिकारी, विभागप्रमुख यांच्यासाठी विषयाच्या गरजेप्रमाणे छोटे वर्कशॉप आयोजित करता येऊ शकतात.

प्रशिक्षण ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. प्रशिक्षणामध्ये हळद पिऊन गोरे होणे हे तातडीने शक्य नसते हे लक्षात घेऊन वर्षभर, वर्षा अखेरचे दोन महिने वगळता सातत्याने प्रशिक्षणे होतील अशा प्रकारचे नियोजन करणे आवश्यक आहे. मनुष्यबळ विभागाने याकडे अधिक गंभीरपणे पाहून वर्षभराच्या सुरुवातीलाच प्रशिक्षणाचे कॅलेंडर तयार करावे. दिलेल्या प्रशिक्षणाचा योग्य उपयोग झाला आहे हे पाहण्यासाठी वेगळ्या प्रकारची रचना असावी. प्रशिक्षणानंतरच्या लहान लेखी परीक्षा, ज्यांचे प्रशिक्षण झाले त्यांनी शाखेमध्ये, विभागांमध्ये त्या प्रशिक्षणाची माहिती देणे, या पद्धतीने प्रशिक्षणाचा योग्य उपयोग झाला आहे का हे तपासूनही पाहता येईल.

प्रशिक्षण या प्रक्रियेकडे संचालक मंडळाने अत्यंत गंभीरपणे बघितले पाहिजे. कारण बँकेच्या लाभक्षमतेसाठी प्रशिक्षित कर्मचारी असणे हे आवश्यक आहे आणि ही काळाची गरजही आहे.

**डॉ. अभय मंडलिक (लेखक खामगाव अर्बन को–ऑपरेटिव्ह बँकेचे संचालक व बँकिंग क्षेत्राचे अभ्यासक आहेत.)**

*****

# ‘एकविसावे शतक भारताचे’

‘एकविसावे शतक भारताचे’ या वाक्याला अर्थप्राप्त झाला तोही देशाच्या स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षाच्या अवतीभवती! जागतिक देशांमध्ये भारताची अर्थव्यवस्था पाचव्या नंबरवर आहे आणि लवकर तिसऱ्या क्रमांकाची होण्याची शक्यता अधिक आहे. सद्यपरिस्थितीत अमेरिका-चायना पाठोपाठ जपान-जर्मनी भारताच्या पुढे आहेत. भारत सहजगत्या दोन नंबर टाकून तिसरा येणार अशी परिस्थिती आहे, चर्चा आहे.

विमुद्रीकरणाने (Demonitization) अर्थव्यवस्थेला धक्का दिल्याने धोका टाळून अर्थव्यवस्था सुधारु लागली. देशभरातील खोट्या चलनी नोटांच्याद्वारे व्यवस्था खिळखिळी करण्याचा शत्रूचा डाव उधळला गेला. पैसा म्हणजेच अर्थ-बँकांच्या माध्यमातून फिरत असतो. अर्थचक्र फिरते राहिले पाहिजे. बँकांची भूमिका अर्थचक्रात अहं असते. यामध्ये सहकारी बँकांचा सहभाग खूपखूप मोठा आहे.




वंदना धर्माधिकारी
९८९०६ २३९१५


पुढे ६-जुलै, २०२१ला देशाच्या इतिहासात प्रथमच केंद्र-सरकारच्या मंत्रिमंडळात नव्याने केंद्रीय सहकार मंत्रालयाची निर्मिती झाली. मंत्रालयाचे ब्रीदवाक्य ‘सहकारातून समृद्धी!’ घोषित झाले. विकासात्मक दृष्टिकोन वास्तवात उतरवताना सहकाराची प्रचंड व्याप्ती जाणवली. नव्या मंत्रालयाची जबाबदारी केंद्रीय गृहमंत्री अमितजी शहा यांच्या समर्थ नेतृत्वावर सोपवली गेली. देशातील सहकारी चळवळ मजबूत करण्यासाठी स्वतंत्र प्रशासकीय, कायदेशीर आणि धोरणात्मक चौकट उपलब्ध करून देण्याची जबाबदारी मंत्रालयाची असते.

तेव्हा, कॅबिनेट सचिवालयामधील राजपत्र अधिसूचनेद्वारे पुढील कारवाई केली गेली. पूर्वीच्या कृषी, सहकार आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाच्या व्यावसायातील सहकार आणि सहकाराशी संबंधित विद्यमान नोंदी हस्तांतरित करण्यात आल्या आणि त्यातून सहकार मंत्रालयाची निर्मिती करण्यात आली.

सहकारी बँका लोकशाही तत्त्वावर चालणाऱ्या अर्थव्यवस्थेतील संघटना आहेत. एखाद्या गावातील रहिवाशांनी एकत्र येऊन सर्वांना आर्थिक सुविधा देऊ करेल. तसेच आर्थिक व्यवहार उत्तमरीत्या सांभाळेल अशा सक्षम व्यक्तींवर विश्वासाने त्यांची जबाबदारी टाकतात. सभासदांचा आर्थिक व सामाजिक स्तर उंचावणे, ‘एकमेकां साह्य करू अवघे धरू सुपंथ’, सामाजिक बांधिलकी, सर्वांचा आर्थिक सहभाग, सहकारी संस्थांमधील सहकार्य अशी काही सहकाराची, सहकारी संस्थांची यशाची कारणे आहेत. त्यांचे मूल्य ठरवणे केवळ अशक्य होय. एकहाती नेतृत्व जाऊन सामूहिक व व्यावसायिक खंबीर नेतृत्व ही संकल्पना सहकारी बँकिंगमध्ये रुजू पहात आहे. यासाठी रिझर्व्ह बँक एक प्रोफेशनल मॅनेजमेंट अग्रणी आहे. रिझर्व्ह बँकेचे नियम निर्देश याकडे सक्षम भविष्याच्या सकारात्मकतेने विचार करून व्यवसाय गतिमान केला पाहिजे. आपोआप चित्र पालटेल. सर्व सहकार क्षेत्राला सरकारने उत्स्फूर्तपणे साद दिली आहे. एक अत्युत्तम संधी समोर ठेवली आहे. त्यात बँका आल्याच. संधीचे सोने करणे सहकारी बँकांचे हातात आहे. चला तर मग, पुढे यशच यश आहे, तेंव्हा लागा त्याच रस्त्याने चालायला.

अचानकरीत्या मंत्रालय सुरू झाले, आणि रिझर्व्ह बँकेचे वर्चस्वी नियंत्रण आल्याने या बँकांना सुखद धक्का बसला. साहजिकच सर्व प्रकारच्या बँकांना एकाच पारड्यात तोलले जाणार असल्याने सर्व नियम कायदे, सवलती एकसारखे होणार आणि तिथे सहकारी बँकांना सुरुवातीला जड जाणे स्वाभाविक होते. मंत्रालय आणि रिझर्व्ह बँक दोन्हींचा सकारात्मक बदल बँकांना जाणवू लागला आहे. मंत्रालयाचा धाक सगळ्यांना बसत आहे, ही एका दृष्टीने प्रगतीकडे वाटचाल होईल. रिझर्व्ह बँकेने काही बँकांवर बंधने घातली, चुकीच्या कामाबद्दल बँकांना नोटिसा दिल्या आहेत. सुरुवातीलाच नोटिसा बजावून त्यावर खुलासा मागितला आहे. त्यामुळे सुरुवातीला वातावरणात थोडीफार नाराजी होती.

सामंजस्याने चर्चा करून यातून बाहेर पडणे आवश्यक आहे. बँकांनी आपली बाजू मांडावी. सहकाराला शिस्त लावण्यासारखे असणार सर्व. भीतीच्या धक्क्याने बँकांच्या कर्जांची परतफेडदेखील व्यवस्थित होईल. एकूणात बँकांचे धाबे दणाणले आहे. श्री. शहा यांच्या व्यक्तीमत्त्वाचा दबदबा आहे. एखादी व्यक्ती पैशांचे व्यवहार चुकीच्या वाटेने करताना शंभरवेळा विचार करेल, कारण मनातला धाक. सहकार मंत्री अमित शहा एक जबरदस्त ताकदीचे व्यक्तिमत्त्व आहे. त्यांच्याकडे कठीणातील कठीण समस्या सोडवायचे कौशल्य आहे. ते नक्कीच बँकांना सावरून बाहेर काढतील असा विश्वास बँकांना देखील आहे.

**※ आव्हाने –** नागरी सहकारी बँकेसमोर आव्हानात्मक परिस्थिती समोर आली. रिझर्व्ह बँकेचे कडक धोरणी नियंत्रण, चुकांना दंडात्मक शिक्षा, कारवाई, स्पष्टीकरण, असे कडवे आव्हान समोर आले आहे. बरोबरीला दर्जेदार टेक्नॉलॉजी वापर, संगणकीकरण, माहिती तंत्रज्ञान, डिजिटल वाढता वापर, त्यासाठी मोठ्या प्रमाणात खर्च, गुंतवणूक, प्रशिक्षित कर्मचाऱ्यांचा अभाव, या सर्वाला सामोरे जाणे अवघड होऊन बसलेले. तरुणाईला आपल्या बँकेकडे आकर्षित करायचे तर नक्कीच टेक्नोलॉजीशी सख्य ठेवले पाहिजे. इ-मार्केटिंग जमले पाहिजे. तेही सोपे नाही, जाणकारांची कमतरता आहेच. त्याच्या जोडीला विलफुल डिफॉल्टर फोफावत चाललेली जमात, कर्ज वसुलीतल्या अडचणी, वाढती अनुत्पादित कर्जे, बँकांमधील स्पर्धा, चढाओढ, या सर्वतोपरी प्रश्नांचा डोंगर जणू पार करून नफा मिळवून दाखवणे नक्कीच कठीण आहे. पण तेच आव्हान बँकांसमोर अचानक उभे राहिले. झेप मोठी दूरवरची आहे. तरीपण रिझर्व्ह बँक काळजीवाहू बँक आहे, आपल्याला नक्कीच भविष्यात स्थिरता लाभेल अशी आशा सर्वांच्या मनात पेरली गेली आहे. हेही नसे थोडके!

**※ संचालक मंडळ –** बँकांचे नेतृत्व संचालक मंडळाकडे असल्याने त्यांची प्रथम ओळख करून घेणे उचित ठरेल. अशा आव्हानांना स्वीकारून संस्था फायदेशीर तत्त्वांवर आणणे, त्यासाठी नेतृत्व अभ्यासू, प्रामाणिक, पारदर्शी, हुशार, अनुभवी, जाणकार, सर्व सांभाळणारे हवे. गरज आहे ती धोरणात्मक योग्य निर्णय घेणाऱ्या संचालक मंडळांची. सर्व सभासदांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या सर्वतोपरी जबाबदार व्यक्तींचा समूह म्हणजे मंडळ होय. त्यांनी आपली कर्तव्य, अधिकार, संस्थेची कामे, ग्राहक संतुष्ट, नीती, आत्मविश्वासाने बँकेला पुढे आणणे, हे व इतर सर्व सद्भावनापूर्वक करायची जबाबदारी त्यांच्यावर कायद्याने टाकलेली आहे. संचालक कसे असावेत यासाठी किमान काही गोष्टींची पूर्तता हवीच. ठरविक आर्थिक विषयी शिक्षण, अनुभव अत्यावश्यक केले आहे. शारीरिकदृष्ट्यादेखील सक्षम व्यक्तीच उत्तम नेतृत्व करू शकते, या उक्तीप्रमाणे बदल अपेक्षित आहेत. खरं तर अशाच बदलांची गरज कुठल्याही संस्थेला असते, तशीच बँकेला. बळकटीकरण, पारदर्शकता, आधुनिकीकरण, संगणकीकरण, प्रशिक्षित कर्मचारी वर्ग, अशा सर्वांचाच दर्जा उंचावणे यांची नितांत गरज

वाढली आणि सहकारी बँका स्पर्धेत उतरल्या. खेड्यापाड्यातील वंचित लोकांचा विकास करताना सुलभता ठेवणे हेदेखील आव्हानात्मक कार्य होय. सहकारी बँकांची पोच खूप खोलवर आहे. तेथील लोकांच्या जीवनात हवे असलेले सहकार्य देणारी हीच बँक असते, असा विश्वास आहे. तेव्हा संचालक मंडळ मग ते कुठेले का असेना, जबाबदारी सारखीच आहे.

**※ रिझर्व्ह बँकेचे वर्चस्व –** सहकारी क्षेत्रावर रिझर्व्ह बँक आणि सहकार मंत्रालय असे दोन खंबीर पाठीराखे आल्याने तिथे शिस्तीत कामे होतील असा आशावाद वृद्धिंगत झाला. 'बँकिंगमध्ये समाजसेवा नको तर समाजसेवेतून बँकिंग करावे,' अशी रिझर्व्ह बँकेची धारणा असल्याने सहकारी बँकांना मानसिकता, वागणे बदलणे गरजेचे आहे. संचालक मंडळ सभेतील कामकाज, निर्णय तसेच प्रत्येकाचा सहभाग यामध्ये देखील रिझर्व्ह बँकेने लक्ष देऊन बघायला सुरवात केल्याने तिथेही निर्णय घेताना बँकेचे भले बघितले गेले पाहिजे, व्यावसायिक दृष्टिकोन ठेवणे आलेच आले. पूर्वी असे नसे. जे करतील ती पूर्व असेलही. इथे या अशाच बदलांमुळे ठेवीदार अधिकाधिक सुरक्षित होत आहेत.

पूर्वी राज्य सरकार व रिझर्व्ह बँक दोहोंचे नियंत्रण असल्याने रिझर्व्ह बँकेला आलेल्या काही मर्यादा हळुहळू निघून जातील. त्यासाठी सुरुवातीला मात्र सहकारी बँकांना परिस्थितीशी थोडा सामना करावा लागला. त्यात बँकेचेच भले होणार आहे, हा विश्वास लपलेला आहे. आपोआप क्षमता वाढली की दिशा फैलावतात आणि बळ आपोआप येते. या कामाची सुरुवात होऊन आता तीन वर्षांचा कालावधी गेला, तेव्हा सुधार नक्कीच आहे. सहकारी बँकांचा विस्तार खेडोपाडी झाल्याने तीच बँक सुधारून धष्टपुष्ट होत आहे, तेही तेथील लोकांच्याच जीवावर, आणि लोकही आपला दर्जा उंचावणार ते बँकेच्या जीवावर, तिच्याच मदतीने. एकूणात काय ही प्रगतीची लहर देशातील प्रत्येक व्यक्तीच्या मनात, घराघरात, अंगणात जेव्हा येते तेंव्हा राहणीमानाचा दर्जा सुधारतो, आणि भरलेल्या घरात स्थिरस्थावर होताना राहतो तो आनंदी आनंद असतो. देशाची अर्थव्यवस्था पाच वरून तीन नंबरवर येणार म्हणताना त्यात प्रमुख भूमिका बँकिंग सेक्टर गाजवणार आहे. सहकारी बँकांनी हे आव्हान पेललेले आहे. जून २०२४ तिमाहीचे निकाल बाहेर आले आहेत आणि ते खूप समाधानी आहेत. ही नवी आशा पल्लवित झालेली आश्वासक आहे. ही भविष्याची नांदी आहे, असे म्हणते.



मागील दहा वर्षांच्या काळात धडाडीने निर्णय घेऊन अनेकविध क्षेत्रात सरकारने केलेले बदल सगळ्यांनी बघितले आहेत. देशाच्या प्रगतीचा ग्राफ चढता ठेवला आहे. आत्ता तिसऱ्यांदा तेच सरकार सत्तेत आलेले आहे. सरकारने एक पाऊल सहकाराचे उचललेले आहे. तेव्हा सरकारकडून नक्कीच सहकार क्षेत्राची भरभराट होईल. कागदावर किती जरी योजना सरकारने मांडल्या तरीपण जनतेच्या अंगणात कशा जातात याला महत्त्व असते. तिथे कसोटी लागते ती काम करणाऱ्या प्रामाणिक माणसांची. परिस्थिती तितकीशी पोषक नाही, पण सगळेच कसे सुरळित होणार? इतिहास नेहमी काहीतरी शिकवण देतो. तेव्हा झालेल्या चुकांची पुनरावृत्ती होऊ न देता सहकारी बँकांनी नव्या जोमाने कामास लागले पाहिजे, असे जाणीवपूर्वक लहान तोंडी मोठा घास असला तरी सांगावेसे वाटते. नव्या व्यवस्थापनातले विविध कार्यप्रणालींसाठीचे सहकार मंत्र्यांनी दिलेले निवेदन सर्वतोपरी बँकिंग क्षेत्राला पूरक आहे, लागू पडते. सहकारचे ब्रीदवाक्य, प्रत्येक सर्वांसाठी आणि प्रत्येकासाठी सर्व होय. 'एक सदस्य एक मत' निर्णयप्रणालीवर आधारित आहे. बँकांसाठी वक्त्यांनी विशेषत्वाने भाषणातून मांडलेले लिखित व मौखिक मुद्दे भविष्याचे चित्र रेखाटणारे होते. त्यावरून भविष्यात सहकार क्षेत्र कसे होईल याची पुसटशी कल्पना जाणकारास नक्कीच आली होती, तसे चित्र बदलत आहे. सरकारकडे पैसा आहे, आणि देशासाठीच तो वापरला जाणार इतका विश्वास सरकारने कमवला आहे. तेंव्हा मंत्रालय स्थापून कामास लागणारे सक्षम देशाप्रती निष्ठा असलेले सरकार कार्यरत आहे.

सहकार मंत्रालय, नागरी सहकारी बँका, पतसंस्था, मर्यादित महासंघ–अम्ब्रेला ऑर्गनायझेशन–नॅफकब–NAFCUB, राज्यवार असलेली सहकारी बँक फेडरेशन्स, राष्ट्रीय स्तरावरील नॅशनल फेडरेशन्स, असा सर्व गोतावळा एकत्रित कामास लागला तर काही अशक्य नाही, यावरील विश्वासदेखील दृढ होताना जाणवते. अम्ब्रेला ऑर्गनायझेशन म्हणजे Cooperation amongst Co-operatives म्हणजेच पुढचे पाऊल होय. आणखीन काही कमी असेल तर कळवा, व्हा पुढे आणि करा नेतृत्व अशाही गोष्टींचे. रिझर्व्ह बँक आणि सरकार खंबीरपणे पाठीशी उभे असल्याने धीर एकवटून कामे करायला आलेला जोम, जिद्द, ऊर्जा होय. हे लक्षात घेऊन सुधारणा करणे आवश्यक आहे.

**※ सर्फेसी कायदा –** २००२ पासून – सर्व बँकांना लागू – सुरवातीला सहकारी बँकांना लागू नसलेला हा कायदा आता त्यांनाही लागू केला असल्याने सहकारी बँकांची वसुली वाढली आहे. त्यासाठी नॅफकबने खूप प्रयत्न केले आहेत. ज्या खात्यात येणे रक्कम एक लाखापेक्षा अधिक आहे अशा एनपीए झालेल्या खात्यातील वसुलीसाठीचा हा कायदा होय. यामध्ये बँकेला तारण मालमत्तेचा सांकेतिक वा प्रत्यक्ष ताबा घेऊन ते विकता येते. कायद्याने बँकेस कर्जदारास ६० दिवसांची डिमांड नोटीस दिली जाते. यामध्ये मालमत्तेचे वर्णन व मूल्यांकन नमूद करावे लागते. त्या काळात त्याने रक्कम भरणे अपेक्षित असते. तसे केले नाही तर बँकांना लिलाव करून ती मालमत्ता विकायचा अधिकार असतो. यामधील बारकावे बँकेने अमलात आणणे बँकेवर बंधनकारक आहे.

भारत देशात अत्याधुनिक टेक्नॉलॉजी वापर मोठ्यांबरोबर छोट्या गावातही वाढला आहे. जगातील काही देश आपल्याकडे नवीन तंत्रज्ञान मागत आहेत. इतकी उंची एकेक नवीन ॲप्स, स्कीम्स यांनी गाठलेली आहे. यूपीआय – Unified Payment System(UPI), भारत बिल पेमेंट सिस्टीम–(BBPS), नॅशनल इलेक्ट्रॉनिक टोल कलेक्शन–(NETC), आधार एनेबल पेमेंट सिस्टीम –(EPS), इंटरनेट सेवांचे विस्तृत नेटवर्क, खेड्यापाड्यात वाड्या वस्तीत असलेली त्याची पोच आणि ग्रामस्थांनी मोठ्या प्रमाणात शिकून सुरू केलेले मोठ्या रकमेचे आणि संख्येनेही भरपूर होत असलेले आर्थिक व्यवहार याचे कौतुक आहे. बरोबरीने समाजात पूर्णत: भिनलेले प्लॅस्टिक कार्ड्स बँकिंग, क्यूआर कोडद्वारे होणारे व्यवहार, आवाजानुसार कामे करणारा मोबाईल, टाईप केलेला छोटामोठा निरोप, सारे काही देशाच्या प्रगतीचे सुसह्य झालेले अधिकांश लोकांच्या पसंतीस आलेले सारे सुधारबोल आहेत. त्याचे कौतुक आहे, अभिमान आहेच. सर्वसामान्यांनी आपली बलस्थाने शोधली आहेत आणि एकूणात जीवन गतिमान झालेले आहे. हे प्रगतीचे लक्षण होय.

सुधारणा नक्कीच आहे. पण, सगळेच कसे सुरळित होणार! बरोबरीने अनेक वाईट प्रकार दिवसा ढवळ्या होतात. सायबर गुन्हे कसे काय केले जातात आणि खाते शून्यावर येते, याचे आकलन त्यातील मुरलेल्यांना देखील कधीकधी होत नाही. असे जर वरचेवर झाले तर सामान्यांची

काय गत. प्रचंड सुरक्षितता दिली जाते तरीही काहीतरी होतेच. गुन्हेगार प्रचंड हुशार असतात, पण विघातक कामे करण्यात ते पुढे असतात. इथे नैतिकता नसते. हे वाईट आहे. तेव्हा, यातही लोकांनी अधिक शहाणे होणे गरजेचे आहे. या गोष्टी खेळायच्या नाहीत, हे लक्षात ठेवून आधुनिक तंत्रज्ञान आधारित व्यवहार पद्धती वापरताना बारीकसारीक काळजी घेऊन शांत चित्ताने ते करावेत असे सांगावेसे वाटते. त्यावरही आधुनिक उपाय आहेत. संशोधन सातत्याने होत असते.

सर्व स्तरांतील सहकारी बँकांना एक सुचवावेसे वाटते. बँकांनी यावर विचार करून संधी घ्यावी आणि आपले रेटिंग पुढे ढकलावे. समस्या आहे असे बोलले जाते की राष्ट्रीयीकृत व खासगी बँकांचा शाखाविस्तार ग्रामीण भागात होत असल्याने सहकारी बँकेचे ठेवीदार, मोठाले कर्जदार तिकडे जातात. तेव्हा यांचा व्यवसाय कमी होतो. वरवर ठीक वाटते, तरीपण खोलवर विचार करता मी बँकांना सांगू इच्छिते की खरं पाहता सर्वतोपरी वस्तुस्थितीत बदल होत आहे. बँक बाहेरच्या वर्तुळात देखील गुंतवणुकीचे यशस्वी प्रकार आहेत. गुंतवणूकदार विविध प्रकारे पैसा गुंतवितात. हे सुचिन्ह आहे, की लोकांकडे पैसा बऱ्यांपैकी असतो. बँक ठेवीला अनेक पर्यायी माध्यमे आहेत. बँक ठेवींवरील व्याजदरही आकर्षक नाहीत. कॅपिटल मार्केटमधील लोकांचा सहभाग वाढला आहे. त्यात भर घातली ती नव्याने जोरात उसळी मारलेल्या स्टार्टअप्सनी. त्यांची आकडेवारी, कामगिरी लक्षणीय आहे. स्टार्टअप्समध्ये सर्वसामान्य व्यक्ती गुंतवणूक करून नफ्यामध्ये आपला भाग मिळवीत आहे. एका स्टार्टअपमागे किमान तीनचार नवीन एसएमई असतात.



चांद्रयान-तीन यशस्वी प्रोजेक्टसाठी मोठ्या संख्येने एमएसएमई युनिट्स कार्यरत होते. या क्षेत्रात नव्याने बरेच काही होऊ घातले असल्याने प्रचंड प्रमाणात लहान व मध्यम उद्योजकांना कामे मिळाली आहेत. असे प्रत्येक स्टार्टअपमध्ये होते, तर किती वाढला असेल आवाका कामाचा आणि अर्थव्यवस्थेच्या भरभराटीचा? १२ नव्हे तर १८ बलुतेदारांना विश्वकर्मा योजनेतून एकदम उचलून घेतलेले आहे. अतिशय आखीवरेखीव योजना आणि उत्तम आर्थिक बळ देऊन आपल्या देशातील कारागिरीला प्रोत्साहित केलेले आहे. त्यासाठी बँकांनी आपल्या गावातील अशा गरजवंतांना शोधून हे समजावून दिले पाहिजे. समज, प्रशिक्षण, मार्गदर्शन, शिकताना आर्थिक मदत, लगेचच आयुधे घेण्यासाठी रु. २०,०००/ मदत देऊ केली आहे. पुढे व्यवसायासाठी कर्ज आहेच की. आहे ना चांगली आपले देशी धंदे पुढे यावेत या भावनेने सुरु केलेली विश्वकर्मा योजना?

आणखीनही वृद्धी होणारे हेच भाकीत आहे. भविष्याची हाक ऐकून सकारात्मक विचारधारा अवलंबली पाहिजे. स्टार्टअप्ससह एमएसएमई कर्जदार म्हणून आपले ॲसेट वाढविण्याची नामी संधी तमाम सर्व प्रकारच्या बँकांना आहे. त्यात सहकारी बँकांचा सहभाग मोठा असायला हवा. जलद गतीने बँकिंग वृद्धिंगत होताना आपण बघत आहोत. बँकांमधूनच सर्व पैशाची चाके फिरवावी लागतात. तेव्हा बँकांनी नवनवीन संधी शोधून त्यानुसार आपली संपत्ती वाढवली पाहिजे, नफा वाढविला पाहिजे. अनेक नवी दालने खुली आहेत, खुणावत आहेत. स्टार्टअप दि बेस्ट! शिवाय असंघटित कमी उत्पन्न ग्रुपला सहाय्य केल्यास तिथे एनपीए कमी होतात, गरजवंतांना मदत हे तर बँकेचे कर्तव्य आहे, त्यांचा दर्जा उंचविण्यात आनंद आहे. करून बघावे.

❊ सहकार मंत्रालय कार्यरत होऊन तीन वर्षे झाली. यामध्ये केलेल्या सुधारणांची थोडीशी किंचित झलक इथे बघू या-

❊ **सहकारी साखर कारखाने** - यांचा आणि आयकर खाते यांच्या नोटिसांची समस्या प्रलंबित होती, त्यावर तोडगा काढून सोडवली. अनेक कारखान्यांनी सुटकेचा नि:श्वास घेतला.

❊ नागरी सहकारी बँकांच्या गृहकर्ज मर्यादेत दुपटीने वाढ केली. ती मर्यादा रुपये ७० लाखांवरून दुप्पट करून १ कोटी चाळीस लाख रुपयांवर आणली.

❊ नागरी सहकारी बँकांचा थोपवलेला शाखा विस्तार परत सुरू झाला.

❊ बँकिंग सुविधा ग्राहकांच्या घरपोच सेवा (Doorstep Banking) देण्याची परवानगी देण्यात आली.

❊ देशातील सर्व सहकारी संस्थांना केंद्र सरकारच्या 'ई-मार्केटिंग प्लॅटफॉर्मवर' खरेदीदार म्हणून नोंदणी करण्यास परवानगी दिली. त्याने अंदाजे ४० लाख विक्रेत्यांना मोठ्या प्रमाणात ग्राहक मिळवून दिले. इथे 'एकमेकां साहाय्य करू' हे ब्रीदवाक्य तंतोतंत लागू पडले. (१ जून, २०२२)

❊ नॉन शेड्यूल्ड नागरी सहकारी, राज्य सहकारी, जिल्हा सहकारी बँकांना 'मेंबर लँडिंग संस्था' म्हणून घोषित करून सरकारच्या 'गॅरंटी फंड ट्रस्ट' योजनेत सामावून घेतले. याने या संस्थांना योग्य वेळेत परवडेल असे वित्तीय सहाय्य पुरविणे शक्य होत आहे. (३ फेब्रुवारी २०२२).

❊ विविध कार्यकारी संस्थाना राष्ट्रीय पातळीवर एकाच व्यासपीठावर तेही आणले. त्या Common National Platform आल्याने त्यांच्याद्वारे अर्थसाक्षरतेचे धडे देणे सोपे झाले. असे हे सर्व काही संगणकीकरण केल्याने करता आले.

❊ वरील सर्व संस्थांना सक्षम बनविताना सरकारी आदर्श उपविधींमध्ये घेतले. हॉस्पिटल, शैक्षणिक संस्था, पेट्रोलपंप, इत्यादीचा यामध्ये अंतर्भाव येतो. त्यांचे नामकरण, बहुउद्देशीय प्राथमिक ग्रामीण को-ऑपरेटिव्ह समिती असे केले.

ही फक्त झलक आहे. आणखीन खूप काही चालूच असणार सरकार दरबारी. इतकी वर्षे राज्य सरकारच्या अखत्यारीत या सर्व बँका येत असल्याने त्यांची दखल केंद्र सरकार पातळीवर दुर्लक्षित ठरत आले. परंतु आता सहकार क्षेत्रात सुधारणा व सक्षमीकरण करण्याचे ठामपणे झाले आणि त्यावर कामही केले जात आहे. एकूणात सहकारी क्षेत्रात सुधारणांची उधळण होताना जाणवते. बरेच आहे, इथे सर्व मांडणे केवळ अशक्य.

सर्व बँका सीबीएस कार्यप्रणालीत.//जीएसटी कलेक्शन वाढ.//फॉरेक्स रिझर्व्हमध्ये वाढ.// भारतीय मालाला जगात वाढती मागणी.//डिजिटल करन्सी//सर्फेसी कायदा//स्मॉल फायनान्स बँक मुळात लहान कर्जाची गरज भागवतात. त्यांची भांडवल स्थिती तसेच तंत्रज्ञानही उत्तम.// हजारोंच्या संख्येने विविध कार्यकारी संस्था आहेत.//देशातील प्रत्येक गावात इन्टरनेट सुविधा उपलब्ध करून देण्याचे काम जोरात चालू आहे.//ज्येष्ठ नागरिक खेडूत देखील सहजगत्या पेटीएम, मोबाईल बँकिंगसह ऑनलाईन योजना वापरतात.//सायबर सिक्युरिटी--ज्ञान, यंत्रणा, जाणकार कर्मचारी वर्ग, माहिती, अचानक लागणारे सहाय्य, यांची जुळवाजुळव बँकांनी सुरू केली आहे. सुधार हवा.//बहुतांशी कामे ऑनलाईन.//डीजिटलायझेशन कामाचा झपाटा लावते//मानव संसाधन, लेखापरीक्षण, विकास, दक्षता इ. सर्वत्र सुधारणा//

एकूणात बँकिंग व्यवस्थापनास शिस्त लावून, योग्य आखणी करणारे, प्रगतीपथावर धावायला लावणारे, सर्व बाजूंनी विस्तारणारे, अल्पावधीत

स्थिरता देणारे, सर्वांची हित जपणूक करणारे, बारीक नजर ठेवणारे, सर्वसमावेशक, सर्वांची काळजीवाहू, असे सक्षम सहकार मंत्रालय आहे. सहकारी बँकांवर खर्च करायला सरकारकडे मोठी रक्कम आहे, त्याबरोबर महत्त्वाची इच्छाशक्ती, कर्तृत्व योजना, रूपरेषा, शिस्त, संख्याबळ, कौशल्य, बुद्धीजीवीवर्ग सर्वकाही जबरदस्त आहे. समाजही आर्थिकदृष्ट्या सधन होत आहे. महत्त्वाचे – देशप्रेमी उत्तम नेतृत्व असल्यावर 'सहकारातून समृद्धी' दारात उभी आहे. देशाच्या प्रगतीबरोबर नेतृत्व यांच्यामुळे जगभराचा भारताकडे बघण्याच्या दृष्टिकोनात झालेला बदल महत्त्वाचा आहे. अभिमान आहे. देशाच्या प्रगतीचे स्वप्न सत्यात उमटताना बघणारे आपण भाग्यवान आहोत.

अखेरीस गोषवारा घेताना नव्याने उदयास येणारे 'सहकार विद्यापीठ' स्वागतार्ह आहे. यात विद्यापीठ, बँक फेडरेशन, सहकार भारती, नॅफकबसह इतर संस्थांचे मोलाचे योगदान आहे. यांच्या समवेत सहकारी क्षेत्राचा भला मोठा रथ सहकार मंत्रालय वेगाने पुढे नेत आहे. सर्वतोपरी सहकारी बँकांसह इतर सहकारी क्षेत्रांचा कायापालट करणारा त्राता म्हणजे सहकार मंत्रालय आहे. त्राता–पालनकर्ता लाभल्यावर पटकन बाळसे धरले जाते. तसेच काहीसे होऊ घातले आहे. बँकांच्या माध्यमातून भरभरून जनतेपर्यंत सोयी सुविधा पोहोचावयाच्या आहेत. लोकांचे दुवे आशीर्वाद शुभेच्छा बँकांनी घ्यायच्या आहेत. घोडदौड सुरू झालेली आहे.



**✻ प्राथमिक कृषी पतसंस्था –** 'सहकारातून समृद्धी' ब्रीदवाक्य घेऊनच केंद्रीय सहकार मंत्रालय उदयास आले. तेव्हा अगदी तळागाळातील शेतकरीवर्गाचे काळजीवाहू सरकार म्हणून या मंत्रालयाचा उदो उदो केला पाहिजे. सहकारी बँकांबरोबर प्राथमिक कृषी पतसंस्था –प्राकृप (PACS -Primary Agriculture Credit Societies) पालकत्व याच खात्याने घेतले. १९०४ साली सुरू झालेल्या या पतसंस्थांचा जोमाने विकास होताना आत्ता दिसत आहे. अगदी दुर्दम्य ठिकाणीचा छोट्यातला छोटा अल्पभूधारक शेतकऱ्याला यामध्ये सामावून घेतले आहे. भारत हा शेतीप्रधान देश आहे हे वाक्य गडद होऊन चमकायला लागले असे म्हणू शकतो. प्राकृप, दुग्धव्यवसाय आणि मत्स्यव्यवसाय अशा तिन्ही क्षेत्रातील मिळून सुमारे २,६४,००० इतक्या प्राथमिक सहकारी संस्था जोमाने कार्यरत आहेत. महाराष्ट्र यामध्ये अग्रस्थानी आहे.

कृषी क्षेत्रात कार्यरत संस्थांची वर्गवारी करताना कृषी पतसंस्था (PACS), मोठ्या क्षेत्रातील बहुउद्देशीय संस्था (LAMPS-Large Area Multi-Purpose Societies), शेतकरी सेवा संस्था(FSS -Farmers Services Societies), राज्य सहकारी कृषी आणि ग्रामीण विकास बँका (SCARDBs-- State Cooperative Agriculture and Rural Development Banks), आणि प्राथमिक सहकारी कृषी आणि ग्रामीण विकास बँका (PCARDBs - Primary Cooperative Agriculture and Rural Development Banks) यांच्या एकत्रित कार्यरत संस्था १००,४२८ आहेत.

वरील सर्व संस्था एकत्रित काम करीत असल्याने नजीकच्या भविष्यात देशाचे शेती उत्पन्न पटीपटीने वाढणार आणि देश समृद्ध होणार आहे. भारत इतरांचा पोशिंदा होणार असे बोलले जाते, त्याची ही नांदी आहे. देशभरात अल्पभूधारक शेतकऱ्यांची संख्या जास्त आहे. अशा तळागाळातील शेतकऱ्यांचे प्रतिनिधित्त्व प्राकृपसह इतर संस्था आहेत. एकमेकांना पूरक अशी यांची कार्यप्रणाली आहे. एकमेकांच्या पाठीशी पाठ लावून कामे होतात. त्याने मिळणारा फायदा विविधांगी आणि भरघोस मिळतो. शेतकऱ्यांना बळकटी देण्यासाठी प्राकृपचे सध्या राबविण्यात येत असलेले अद्ययावत मॉडेल खूप मोठी मजल मारणार असे भाकित याच क्षेत्रातील दर्दी मंडळी करीत आहेत. उगाच कोणी असे म्हणत नाही. याचा अर्थ बऱ्याच विविधतेने अशा जेमतेम उत्पन्न असलेल्या गरीब, छोट्या शेतकऱ्यांपासून सर्वांचा विकास करून त्यांचे राहणीमान उंचावायचा प्रयत्न सहकार क्षेत्राकडून होत आहे. या सर्व संस्थांचे सरकार दरबारी रजिस्ट्रेशन असते,

प्राकृपचे सदस्यत्व अनेक छोटेमोठे शेतकरी घेतात. त्यांचा आधारस्तंभ प्राकृप असते. मुख्य कार्य म्हणजे अडल्या नडल्या गरजवंत शेतकऱ्यांच्या विविध गरजा पूर्ण करणे, त्याच्या अडचणी सोडवणे, सुविधा देणे, त्याला मार्गदर्शन करणे, आणि त्यासाठी आर्थिक पाठबळ देणे. शेती उत्पादन करताना लागणारे सर्वकाही पुरवले जाते. अल्पकालीन कर्ज देणे, पतसंस्थेत खाते काढून देणे. सरकारी अनुदानांचा लाभ मिळवून देण्यासाठी प्राकृप प्रयत्नशील असतात. बियाणे, खते व कीटकनाशके पुरवठा करून सर्वतोपरी सदस्य शेतकऱ्यांची घडी बसवून दिली जाते. माल कुठे कसा विकायचा याचे विपणन सहकार्य दिले जाते. मालाचा भाव ठरवतानाही मध्यस्थी होते. त्याने आपोआप शेतकऱ्याच्या उत्पन्नात वाढ होते. एकूणात सुसूत्रता आल्याने धनधान्य अधिकाधिक येते, नफा वाढतो आणि समृद्धी नांदू लागते.

शेती करताना अनेक अडचणी संकटे यांचा सामना करावा लागतो. म्हणा इतरत्र नाही असे नक्कीच नाही. जीवन हे संकटांशिवाय जगताच येत नाही. तर, सांगायचे असे की शेतकरीदादा वा शेतकरीताई कोणालाही कधीही काही अडचण आली, मार्गदर्शन हवे असेल तर जवळच्या प्राथमिक कृषी क्रेडीट सोसायटीमध्ये जाऊन समजून घेऊन आपले काम करून घ्यावे. आर्थिक मदतही इथे मिळू शकते. तरी आवर्जून क्रेडिट सोसायटीचे सभासदत्व घ्यावे, भविष्यात कधीही त्याची मदत होईल. शिकायला खूप काही मिळेल.

सर्व प्राथमिक कृषी पतसंस्था – प्राकृप वर सरकारी संस्था –नाबार्ड – NABARD - (National Bank for Agriculture and Rural Development.)चे वर्चस्व आहे. सर्व प्राकृप चे कामकाज नाबार्ड च्या तत्त्वांनुसार केलेल्या योजनेप्रमाणे नियमाने आखून दिलेल्या पद्धतीने होते. नाबार्ड संस्था भारतीय रिझर्व्ह बँकेच्या अखत्यारीत येत असल्याने आपोआप प्राकृपला रिझर्व्ह बँकेचे पाठबळ आहे. मोठ्या प्रमाणात यासाठी प्रोजेक्ट्स केले जात आहेत. त्यामध्ये गुंतवणूक होत आहे. तरी सर्वांनी कृषी पतसंस्थेचे सभासदत्व अवश्य घ्यावे. बाकी तिथे गेल्यावर सर्व काही तुम्हाला सांगितले जाईल. जशी समस्या येईल तसेच त्यावरील उपाय देखील पतसंस्थेत सापडेल आणि शेतात पीक तरारून येईल. तेव्हा सहभागी व्हावे, हेच हिताचे आहे.

भारत सुजलाम् सुफलाम् होऊ पहात आहे. त्यामध्ये प्रत्येक नागरिकाने आपले कर्तव्य चोख बजावले पाहिजे.

**– वंदना धर्माधिकारी मो.– ९८९०६२२९१५**

Email: Vandana10dyahoo.co.in

✻✻✻✻✻

# गृहरचना संस्था

# शंका समाधान

## अपार्टमेंट कायदा - १९७०



### अपार्टमेंट संघाचे उपविधी...

### प्रकरण क्र.२

**※ नियम क्र.९ मतदान (व्होटिंग) –**

प्रत्येक अपार्टमेंटधारक सभासद आपल्या घोषणापत्रात उल्लेखल्याप्रमाणे त्याच्या वाट्याला आलेल्या सदनिकेच्या अविभक्त हिश्श्याच्या (अनडिव्हाइड शेअर) प्रमाणातच मतदान करू शकेल.

**※ नियम क्र.१० : गणसंख्या (कोरम) –**

अपार्टमेंटधारक सभासदांच्या एकूण संख्येपैकी जास्तीत जास्त सभासद उपस्थित असल्यास गणसंख्या (कोरम) पूर्ण आहे असे समजण्यात येईल. किंवा याबाबत संघाच्या उप-विधीमध्ये विशेष उल्लेख केलेला असल्यास त्याप्रमाणे गणसंख्या (कोरम) ग्राह्य धरली जाईल. (मेजॉरिटी याचा अर्थ ५० टक्क्यांच्यावर)

**※ नियम क्र.११ :** प्रत्येक अपार्टमेंटधारक सभासदाने स्वत: हजर राहूनच मतदानात (Voting) भाग घेणे आवश्यक. याचाच अर्थ अधिकारपत्र चालणार नाही.



**ॲड. जयंत कुलकर्णी**
९४२२० ०७५१०

### प्रकरण क्र.३ : प्रशासन (ॲडमिनिस्ट्रेशन)

**※ नियम क्र.१२ संघाचे अधिकार व कर्तव्ये –**

प्रत्येक अपार्टमेंट धारकाच्या संघाने वार्षिक सभेमध्ये बहुमताने (मेजॉरिटी) व सर्व अपार्टमेंट धारकांच्या संमतीने ठराव मंजूर करून घेणे आवश्यक आहे.

त्यानुसार देखभाल निधी ठरवणे, दुरुस्तीच्या खर्चास मान्यता/मंजुरी घेणे, वार्षिक हिशोबपत्रके व अंदाजपत्रके सभेपुढे सादर करणे तसेच संघाच्या कामकाजासाठी कर्मचारी नियुक्त करणे, नियम बनवणे इतर प्रशासकीय कामे करणे, यासारखी अन्य कामे पूर्ण कार्यक्षमतेने व कायद्यानुसार करण्याची जबाबदारी प्रत्येक संघाची असेल. वार्षिक सभेने बहुमताने ठरवलेल्या निर्णयावर संघाच्या पदाधिकाऱ्यांनी संघाचे प्रशासन योग्य प्रकारे चालवणे संघाच्या प्रत्येक पदाधिकाऱ्यांचे कर्तव्य आहे, त्यात कसूर करू नये.

**※ नियम क्र.१३ : सभेचे ठिकाण –**

अपार्टमेंट संघाच्या सभेचे ठिकाण हे सर्व सभासदांना सोईचे असेल अशा ठिकाणी ठरवण्यात येईल. (संघाचे आवार किंवा संघाचे सभागृह किंवा जवळील सभागृह, जे सर्वांना सोयीचे असेल.)

**※ नियम क्र.१४ : वार्षिक सभा –**

संघाच्या स्थापनेनंतर घेण्यात आलेल्या पहिल्या वार्षिक सभेनंतर व आर्थिक वर्ष (३१ मार्च) संपल्यानंतर सर्व अपार्टमेंट धारकांची वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) बोलावणे आवश्यक आहे. सदर सभेमध्ये व्यवस्थापक समितीची निवड करणे तसेच इतर कामकाज सर्व सभासदांच्या उपस्थितीत पार पाडावयाचे असते. त्यामध्ये प्रामुख्याने हिशोब पत्रके व अंदाजपत्रक सभेपुढे सादर करणे, इतर धोरणात्मक निर्णय घेणे, मासिक देखभाल निधी ठरविणे, थकबाकी वसुलीसाठी कायदेशीर प्रक्रियेत मंजुरी देणे, यासारखी प्रशासकीय उप-विधीनुसार चालवली जातात. प्रतिवर्षी सर्व अपार्टमेंट धारकांची वार्षिक सभा बोलवणे आवश्यक आहे. (त्याला महिन्याची अट नाही.)

**※ नियम क्र.१५ : विशेष सभा –**

अपार्टमेंट संघाच्या अध्यक्षांनी (चेअरमन) व्यवस्थापन समितीने ठरविलेल्या निर्णयानुसार सर्व अपार्टमेंट धारक सभासदांची सभा बोलावणे आवश्यक आहे. किंवा बहुसंख्य (मेजॉरिटी) अपार्टमेंट धारकांनी (५० टक्क्यांवर) विशेष सभा बोलावण्याची मागणी सचिवांकडे केल्यास संघाच्या अध्यक्षांनी सर्व अपार्टमेंट धारकांना योग्य ती लेखी पूर्व सूचना व सभेचा विषय व ठिकाण आणि वेळ कळवण्याची व्यवस्था करावी. सदर सभेमध्ये विषय पत्रिकेवरील विषयाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही विषयावर चर्चा/निर्णय करता येणार नाही. परंतु उपस्थित असलेल्या सभासद संख्येच्या चार/पाच सभासदांनी अन्य विषयावर चर्चा करण्याची मागणी केल्यास तसा निर्णय मा. अध्यक्ष घेऊ शकतात.

**※ नियम क्र.१६ : सभेची पूर्व सूचना –**

प्रत्येक अपार्टमेंट संघाच्या सचिवाने प्रत्येक अपार्टमेंटधारक सभासदास किमान २ (दोन) व कमाल ७ (सात) दिवस आधी वार्षिक सभा व विशेष सभेची पूर्वसूचना लेखी स्वरूपात किंवा इ-मेलने कळवणे बंधनकारक आहे. त्यामध्ये सभेचा विषय (अजेंडा), ठिकाण, तारीख, वेळ इ. सविस्तर माहिती असणे आवश्यक आहे. नोटिस पाठवण्याची नोंद व त्यांना प्राप्त झाल्याची नोंद सचिवांनी संघाच्या नोंदवहीमध्ये (रजिस्टर) दप्तरी ठेवणे आवश्यक.

**※ नियम क्र.१७ : तहकूब सभा (ॲडजर्नमीटिंग) –**

संघाची वार्षिक सभा गणसंख्येची पूर्तता होऊ न शकल्यास उपस्थित सभासदांच्या संमतीने पुढील ४८ तासांपर्यंत तहकूब करता येईल. मात्र ४८ तासांनंतर परत बोलावण्यात आलेल्या सभेस किमान २ सभासद उपस्थित असले तरी सभेचे कामकाज चालविले जाईल. तहकुबीनंतर बोलावण्यात आलेल्या सभेस जर पुन्हा गणसंख्या नसेल पण २ सभासद तरी किमान असणे आवश्यक.

**※ नियम क्र.१८ : सभेचे कामकाज –**

१) उपस्थित सभासदांची स्वाक्षरी घेणे.
२) मागील सभेचा इतिवृत्तांत वाचणे.
३) व्यवस्थापक समितीचा कार्य अहवाल वाचणे.
४) व्यवस्थापक समितीची निवड करणे.
५) उप-विधीनुसार अन्य कामकाज करणे.
६) आयत्या वेळचे विषय (अध्यक्षांच्या मान्यतेने)

क्रमश:

**ॲड. जयंत कुलकर्णी**
Email - advjgk@yahoo.co.in

*****

सहकार सुगंध मासिकात माहिती देणे, वर्गणी भरणे तसेच जाहिरातींसाठी जिल्हा प्रतिनिधींशी संपर्क साधावा ही विनंती – संपादक

**श्री. संतोष गावंडे : रिजनल हेड (विदर्भ) 9420116337**

| पश्चिम महाराष्ट्र विभाग | | |
|---|---|---|
| रहाटणी, पुणे | श्री. डी. एस. कुलकर्णी | 9420655316 |
| पिंपरी चिंचवड | श्री. शिरीष लिपारे | 9762830555 |
| सातारा | श्री. विनायक भिसे | 9923396312 |
| सांगली | सौ. श्वेता कुलकर्णी | 8830837005 |
| इचलकरंजी | श्री. प्रशांत कुलकर्णी | 9421172965 |
| सोलापूर शहर | सौ. दिपाली कुलकर्णी | 9049785111 |
| सोलापूर जिल्हा | श्री. चंद्रकांत धोंडे | 9881139150 |
| संगमनेर | श्री. विजय भिडे | 9975516360 |
| बेलापूर, जि. नगर | श्री. अरविंद शहाणे | 9922707677 |
| **कोकण विभाग** | | |
| मुंबई-अंधेरी | श्री. रामकृष्ण आवारे | 9619318544 |
| मुंबई-विक्रोळी | श्री. प्रभाकर कांबळे | 9594293734 |
| मुंबई-जोगेश्वरी | श्री. गणेश खिलारे | 9322161526 |
| मुंबई-दहिसर | श्री. हितेश वाघेला | 8828384482 |
| मुंबई-बोरिवली | श्री. केशव खाडे | 9969825835 |
| डोंबिवली | श्री. संदीप गव्हाणे | 7738449033 |
| पालघर | श्री. सदानंद पावगी | 8888880680 |
| वसई | श्री. संतोष शिंदे | 8652415015 |
| मुरूड, जंजिरा | श्री. मेघराज जाधव | 9561710445<br>9421164777 |
| मुंबई-सायन | श्री. भरत चिंचोले | 7021862169 |
| पनवेल | श्री. संजय पावसकर | 8928323997 |

| उत्तर महाराष्ट्र विभाग | | |
|---|---|---|
| जळगाव | श्री. विश्वास कुलकर्णी | 9922653022 |
| चाळीसगाव, जळगाव | ॲड. विकास देवकर | 7588440640 |
| धुळे | श्री. बी. एम. कुलकर्णी | 9420602441 |
| पिंपळनेर, धुळे | श्री. सुर्यकांत जगताप | 9552570515 |
| नंदूरबार | श्री. महादू हिरणवाळे | 9823842991<br>8208147121 |
| नाशिक | श्री. राजीव चंद्रात्रे | 9403261226 |
| **मराठवाडा विभाग** | | |
| छत्रपती संभाजीनगर | श्री. अभय बावस्कर | 9422202569 |
| पैठण | श्री. देवेश इनामदार | 9404981212 |
| लातूर | श्री. शरद दिवे | 8275020460 |
| परभणी | श्री. संतोष पाथरीकर | 9763012439 |
| परभणी | श्री. मंगेश पाठक | 8149355759 |
| जालना | ॲड. दशरथ इंगळे | 9422723784 |
| **विदर्भ विभाग** | | |
| नागपूर | श्री. महेश राव | 9545741474 |
| यवतमाळ | श्री. संतोष गावंडे | 9420116337 |
| भंडारा | श्री. मुकुंदा पांढरीपांडे | 9420514872 |

**सहकारी संस्थांना अत्यंत उपयुक्त खालील पुस्तके सहकार सुगंध कार्यालयात विक्रीसाठी उपलब्ध आहेत.**

| क्र. | पुस्तकाचे नाव | किंमत |
|---|---|---|
| १ | सहकार कायदा व वसुलीची प्रक्रिया | २००/- |
| २ | सहकार बँकांचे कर्ज व्यवस्थापन | ३५०/- |
| ३ | नागरी सहकारी बँकेचे प्रशिक्षण | १२५/- |
| ४ | डिजीटल तंत्रज्ञानाचे धोके व सावध, सुरक्षित वापर | १५०/- |

वरील पुस्तकांसाठी रक्कम तसेच सहकार सुगंधची वर्गणी भरण्यासाठी सहकार सुगंधच्या वरील जिल्हा प्रतिनिधींशी संपर्क साधावा किंवा खालील बँक खात्यात रक्कम जमा करण्यासाठी खालील क्यूआर कोड वापरावा.

सहकार सुगंधची वर्गणी १ जानेवारी २०२५ पासून-
वार्षिक रु. ७००/- त्रैवार्षिक रु. १८००/-

**UPI ID**
SahakarSugandha@DNSbank

A/c Name : Sahakar Sugandha
Bank Name : Dombivali Nagari Sahakari Bank Ltd.
(Sihagad Road, Pune Branch)
Current a/c No. : 078011100000065
IFS Code - DNSB0000078

**UPI ID**
SahakarSugandha@SBI

A/c Name : Sahakar Printing & Publications Pvt. Ltd.
Bank Name : State Bank of India
(Hingne Khurd, Pune Branch)
Current a/c No. : 36931889346
IFS Code - SBIN0007159

कृपया वर्गणी जमा केल्यानंतर आपला नाव व पत्ता पुढील ई मेलवर कळवा. sahakar.sugandha@gmail.com

**महाराष्ट्रात जिल्हा प्रतिनिधी नेमणे आहेत. संपर्क : ८८०५९८१६७३**

24 CARAT SECURITY FOR YOUR VALUABLES

Godrej

# UNMATCHED SECURITY
# UNCOMPROMISED STRENGTH



• Defender Aurum Pro Safe • Anti Intrusion Fogging Device
• Strong Room Door • Defender Prime Safe • Gold Testing Machine

SCAN TO KNOW MORE

For more information contact:

Sibashis Paul ✆ 9954026321

लोकमान्य
# दुर्गाशक्ती योजना

## सुरक्षित गुंतवणूक, उज्वल वाटचाल

## सर्वोत्तम व्याजदर
# 10.25%

किमान गुंतवणूक 10,000/-

महिलांसाठी 0.50% अधिक व्याजदर

कालावधी 18 महिने

ज्येष्ठ नागरिकांसाठी 0.50% अधिक व्याजदर


विनामूल्य व्यक्तिगत अपघाती मृत्यू विमा
(1 लाखाची पॉलिसी कव्हर, वयोमर्यादा 18 - 65)



*फक्त सभासदांकरिता *नियम व अटी लागू

स्थापना 1995
लोकमान्य
मल्टिपर्पज को-ऑप. सोसायटी लि. (मल्टी-स्टेट)
प्रधान कार्यालय - पुणे, महाराष्ट्र

महाराष्ट्र • कर्नाटक • गोवा • दिल्ली
Reg. No. M.S.C.S./C.R./140/2002
संस्थापक - अध्यक्ष : श्री. किरण ठाकुर, सल्लागार संपादक, तरुण भारत, बेळगाव.
Call 1800 212 4050 | lokmanyasociety.org


Janaseva Sahakari Bank Ltd. Hadapsar, Pune
आव्हान ...
ग्लोबल वॉर्मिंगचे,
पर्यावरण संवर्धनासह
लाभ मिळवा सेव्हिंगचे !
रुफटॉप सोलर इलेक्ट्रिक, सोलर वॉटर हिटरसाठी
जनसेवा बँक सोलर कर्ज
अल्प प्रोसेसिंग फी
किफायतशीर व्याजदर
सुटसुटीत कर्ज प्रक्रिया
जनसेवा सहकारी बँक लि., हडपसर, पुणे.
जनसामान्यांची असामान्य बँक, जनसेवेसाठी वचनबद्ध !
www.janasevabankpune.net

## सहकार भारतीचे मुखपत्र सहकार सुगंध निर्मित

# नागरी सहकारी 2025 बँक / पतसंस्था दैनंदिनी

**नागरी सहकारी बँकांसाठी रिझर्व्ह बँकेच्या सर्व परिपत्रकांचा मराठीत संक्षिप्त गोषवारा तसेच QR कोडच्या मदतीने RBI ची सर्व मूळ परिपत्रके उपलब्ध असणारी एकमेव दैनंदिनी व नागरी सहकारी पतसंस्थेच्या दैनंदिनीमध्ये गेल्या तीन वर्षातील सर्व महत्वाच्या परिपत्रकांचा समावेश**

**देशभरातील नागरी सहकारी बँका व पतसंस्थांच्या संख्येनुसार आर्थिक स्थितीच्या उपयुक्त माहितीसह...**




**नागरी सहकारी बँक दैनंदिनी २०२५**

किंमत रु. 500/-

अधिक प्रतींसाठी विशेष सवलत

आजच नोंदणी करा!

किंमत रु. 400/-

अधिक प्रतींसाठी विशेष सवलत

आजच नोंदणी करा!

**नागरी सहकारी पतसंस्था दैनंदिनी २०२५**




**सहकार भारतीचे मुखपत्र 'सहकार सुगंध'**

कार्यालय : ऑफिस नं. 15, विष्णुप्रिया अपार्टमेंट,
गणेशमळा, सिंहगड रोड, पुणे - 411 030
मो. : 8805981673 ईमेल : sahakar.sugandha@gmail.com

# दि यवतमाळ अर्बन को-ऑप.बँक लि., यवतमाळ

## THE YAVATMAL URBAN CO-OP. BANK LTD., YAVATMAL

Regd.No.YML/BNK/114

मुख्य कार्यालय : एल.आय.सी. चौक, गार्डन रोड, यवतमाळ 445001 - **Phone :** 07232 - 244241, 243703, 237442
**E-mail :** ho_adm@yavatmalurbanbank.com - **Website :** www.yavatmalurbanbank.com

**ISO 9001:2015& ISO 27001:2013 CERTIFIED BANK**



**कर्जाचे अत्यंत माफक व्याज दर 8.25%* पासुन सुरू**

**आम्ही जपतो वारसा विश्वासाचा**

| **डॉ. नितीन खर्चे** अध्यक्ष | **अजिंदरसिंह चावला** उपाध्यक्ष | **श्रीधर कोहरे** मुख्य कार्यकारी अधिकारी

**संचालक** - श्री. अजय विठ्ठलदासजी मुंधडा, श्री.आशिष हरिहरराव उत्तरवार, श्री.प्रशांत अरुण माधमशेट्टीवार, श्री.संजय चिंतामणराव डेहणकर, श्री.प्रमोद मधूकरराव धुर्वे, ॲड.श्री.प्रफुल्लसिंह लक्ष्मणसिंह चौहान, श्री.गोवर्धन दयाराम राठोड, श्री.परिमल प्रेमकुमार देशपांडे, डॉ.श्री.महेश दामोधर सारोळकर, श्री.वसंता रामजी सुपारे, श्री.संतोष विष्णूकांत पेन्शनवार, श्रीमती मिरा राजेश घाटे, सौ.शिला राजेश्वर निवल, श्री.प्रविण पांडुरंग खांदवे (तज्ञ संचालक), श्री.पियुष कैलासचंद्र खेतान (तज्ञ संचालक)


AURO®
SINCE 1948
MAHARASHTRA TRADING CO.
Your valuables are safe and secure.
We make it sure!
ISO CERTIFIED
ISO
ISO 9001 : 2008
WE ARE PROVIDED FOR
PHYSICAL SECURITY PRODUCTS SALE'S & SERVICES IN
ALL MAHARASHTRA REGION
CASH SAFE I GOLD SAFE I VAULT I LOCKER CABINET
JEWELLER'S SAFE I PETROL PUMP SAFE
Our trusted partners for 75 years
Union Bank
UCO BANK
HDFC BANK
RBL BANK
Saurashtra Gramin Bank
व्यंकटेश मल्टीस्टेट
IIFL
IndusInd Bank
IDBI BANK
KALYAN
Reliance
Shell
BURGER KING
Fincare
BDCC
Contact : Mrs. Suvarna Kshirsagar
Office Address : 1453, Shop No. 06,shiv Parvati Society, Behind Janata Sahakari Bank. Khadilkar Path, Bajirao Road, Shukrawar Peth, Pune -411002
mtc1506pune@yahoo.com www.aurombica.com
7559283467 I 9685061515 I 9879791521


टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड.
मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक
Bharose ka Bank Bhavishya ka Bank
आता गोल्ड वर लोन मिळविण्याची
सुवर्णसंधी
वैशिष्ट्ये
शून्य प्रोसेसिंग फी
गॅरेंटरची आवश्यकता नाही
कागदपत्रांची सहज व सोपी पूर्तता
त्वरित कर्ज मंजुरी आणि वितरण
दागिन्यांच्या सुरक्षिततेची हमी
प्रीपेमेन्ट शुल्क माफ
*अटी लागू
तुमच्या जवळच्या शाखेला भेट द्या किंवा 1800 223 466 | 1800 266 3466 | www.tjsbbank.co.in

Registered - SAHAKAR SUGANDHA - RNI NO. MAHMUL/2005/16099 (DECL NO. SDM/HAVELI/PUNE/SR/20/2017)
Postal Reg. No. : PCW/161/2023-2025 Licence to Post without Pre-payment of Postage no. WPP-29
(Publication Date - 05/12/2024) Posting on 07/12/2024 at PSO, Pune GPO - 411 001




**प्रेषक :**
**सहकार सुगंध कार्यालय**
ऑफिस नं. १५, विष्णू प्रिया अपार्टमेंट,
५ वा मजला, ईशान रेस्टॉरंटच्यावर, गणेशमळा,
सिंहगड रोड, पुणे - ४११०३०.
मो. : ८८०५९८१६७३

**प्रति,**